

# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय– जयंत पाटील
राज्यघटनेची मूल्ये
तुडवताहेत पायदळी

**5**
प्रबंध संपादकीय– दिलीप वळसे पाटील
हेचि फळ मम काय आले तपाला!

**6**
संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे
अमृतकाळाचे 'हलाहल'

**10**
शरद पवार यांची पत्रकार परिषद,नागपूर
केंद्र सरकार सर्वसामान्यांना
महागाईच्या संकटात लोटतेय

**18**
शरद पवार यांची पत्रकार परिषद,नाशिक
आम्ही बांधलेली राजकीय बांधणी अजिबात
विस्कळीत होणार नाही– शरद पवार

**20**
अजित पवार यांची पत्रकार परिषद,मुंबई
राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा

**28**
संसदेचे महत्त्व नष्ट करण्याचा डाव?
– अगस्त्य दास

**32**
जीएसटी खरंच झाला गब्बरसिंग टॅक्स?
अनंत बागाईतकर

**40**
भाजपकडून प्रादेशिक पक्षांचा शिडीसारखा वापर
– व्यंकटेश केसरी

**46**
असंसदीय शब्द व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
फिरस्ता

**52**
आधुनिक भारत आणि
नवभारत : ग्रँड सिद्धांत
– प्रकाश पवार

**44**
डॉ. सुधीर भोंगळे सत्कार समारंभ,नागपूर
१) वैज्ञानिक आणि शेतकऱ्यांमुळे
शेतीच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन– शरद पवार
२) नदीजोड, अन्नदाता ते ऊर्जादाता
कार्यक्रम भोंगळेंनी हाती घ्यावा– नितीन गडकरी
३) पीक पद्धती बदलली तरच
शेती सुजलाम् सुफलाम्– डॉ. सुधीर भोंगळे

**90**
गुलामगिरीच्या खुणा पुसणार किती?
– हेमन्त टकले

**96**
कानोकानी–
घंटाकर्ण–(राजकीय किस्से)

**102**
शेवटचे पान–
पराभव आणि निष्ठा– –हेमन्त टकले



**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या
मतांशी प्रबंध संपादक,
संपादक व संचालक सहमत
असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया**
**ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने ओम साई मिलन एंटरप्रायझेस
रूम नं. १०९, हाऊस नं. ३२३,
सिद्धीविनायक महिमा सेक्टर १९/बी,
कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला,
वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२०
येथून अंक प्रकाशित केले.


राष्ट्रवादी

अध्यक्षीय



# राज्यघटनेची मूल्ये तुडवताहेत पायदळी

गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्रात मोठी राजकीय अस्थिरता आहे. जनतेची अगदी छोटी देखील कामे निर्णयांअभावी ठप्प आहेत. सरकारी कार्यालयांमध्ये फायलींचा व नस्तींचा ढीगारा लागला आहे. अधिकारी स्वतः निर्णय घ्यायला तयार नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासकांचा मनमानी कारभार सुरू आहे. पण त्याबद्दल जनतेने कोणाकडे दाद मागायची? कारण प्रत्येक अधिकारी फाईल निर्णय व मार्गदर्शनासाठी वरच्या अधिकाऱ्याकडे ढकलतो आहे. त्यामुळे फाईलीचा पाळणा लांबत चालला आहे. कधी आपला बळीचा बकरा होईल आणि मानेवर सुरी कचाकच फिरेल याची भिती असल्यामुळे अधिकारी निर्णय करायला तयार नाहीत आणि त्यांना याबाबतचा जाब विचारणारी यंत्रणा अस्तित्त्वात नाही. 'पिराचे पिराला पडले, फकिराचे बघतो कोण?' अशी स्थिती असल्यामुळे महाराष्ट्राची अवस्था मोठी विचित्र झाली आहे. सगळ्यांच्या नजरा सर्वोच्च न्यायालयाकडे लागलेल्या आहेत. त्यांच्या निकालाची जनतेला मोठी उत्सुकता आहे आणि त्याबाबत प्रत्येकजण आपापल्या कुवतीनुसार चर्चा करतो आहे. यातल्या बऱ्याचशा चर्चा फुटकळ व अर्थहीन असल्या तरी त्यामुळे अनेकांचा टाइमपास मात्र चांगला होतो आहे.

घटनातज्ज्ञ व राज्यशास्त्राचे काही अभ्यासक ''सध्या राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडींमुळे घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. काही घटनांच्या माध्यमातून राज्यघटनेची मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. पक्षांतर करणारा लोकप्रतिनिधी हा लोकशाहीचा गुन्हेगारच असतो. पक्षांतरबंदी कायद्यातील अनुच्छेद दोन आणि चार नुसार १६ आमदारांच्या अपात्रतेच्या कारवाईचा निर्णय निर्णायक ठरणार आहे. त्याबाबत काहीही निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे राज्यातील राजकीय घटनाक्रम उलटाही फिरू शकतो,'' असे मत घटनातज्ज्ञांच्या चर्चासत्रात व्यक्त करीत आहेत. राजकीय दबाव व हस्तक्षेपामुळे न्यायालयांच्या भूमिकेबाबतही आता दबकेपणाने व हळूवारपणे का होईना लोकांमध्ये कुजबूज व चर्चा चालू आहे आणि ती न्यायसंस्थेची विश्वासार्हता व कामकाज पद्धतीला फार पोषक ठरणारी आहे असे म्हणण्याचे धाडस कुणी करू शकणार नाही. न्यायमूर्ती व न्यायालयांबाबत असे वातावरण देशात निर्माण होणे हे राष्ट्राच्या एकसंघतेच्या दृष्टीने फारसे चांगले लक्षण नाही. यातून न्यायालयांनीही काय तो योग्य बोध घेतला पाहिजे अशी जनतेची अपेक्षा आहे.

न्यायालयाचा निर्णय कदाचित आपल्या विरोधी जाईल की काय अशी धाकधूक व भिती मनात असल्यामुळे राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार करायला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धजावत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. फुटीर बंडखोर आमदारांना प्रत्येकाला मंत्री व्हायची आस व हाव आहे. फुटताना व फोडताना त्यांना जी आश्वासने दिलेली आहेत त्यांची पूर्तता करावीच लागेल अन्यथा तापलेल्या बॉयलरचा सेफ्टी व्हॉल्व बराच काळ बंद केला तर त्याचाही स्फोट होतो या न्यायाने आमदारांच्या बंडखोरीचा पुन्हा एकदा भडका होईल की काय हे सांगता येत नाही. त्यामुळे मंत्रीमंडळ विस्ताराच्या वांझोट्या घोषणा रोज शिंदे-फडणवीस करून त्यांच्या गटातील आमदारांना आणि जनतेलाही मूर्ख बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत. शिंदे-फडणवीसांची दिल्ली वारी नित्यनेमाने चालू आहे. मोदी-शहांच्या दरबारी जाऊन कुर्निसात करण्यापलिकडे काही घडतंय असे काही दिसत नाही. महाराष्ट्रात मात्र पुर व अतिवृष्टीच्या संकटाने थैमान घातले आहे. शेतकऱ्यांची शेतातली उभी पिके मातीसह वाहून गेली आहेत. जमिनी नष्ट झाल्या आहेत. लोकांच्या घरादारात पाणी शिरल्याने गावठाणे उध्वस्त झाली आहेत. जनावरे पुरात मृत्यूमुखी पडली आहेत. जिवीतहानीही मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. लोकांना घरात खायला अन्नधान्य राहिलेले नाही. घालायला कपडे नाहीत. पूरग्रस्त जनतेची अवस्था अत्यंत वाईट आहे. पण त्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी मदतीचा हात देणारे सरकारच अस्तित्त्वात नाही. प्रत्येक जिल्ह्याला पालकमंत्री व संपर्कमंत्री असता तर त्याने बैठक घेऊन, पूरग्रस्त भागाची पाहणी करून प्रशासकीय यंत्रणेला मदतीच्या कामाला लावले असते. त्या कामाचा वेळोवेळी आढावा घेऊन देखरेखही केली असती. पण आज निव्वळ घोषणांच्या पलिकडे काहीही चालू नाही. राज्याचा कारभार ठप्प झाला आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते मा. अजित पवार यांनी नुकताच पुरग्रस्त भागाचा दौरा करून तिथल्या जनतेचे प्रश्न समजून घेतले व त्याबाबतचे लेखी निवेदनही राज्यपाल, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची समक्ष भेट घेऊन त्यांना दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही याबाबत स्पष्टपणे आपली भूमिका मांडली आहे इतकेच नव्हे तर पक्षाच्या वतीनेही पूरग्रस्तांना काही मदत केली आहे. पण राज्य सरकारातले दीड मंत्री मात्र अजूनही केंद्राकडेच वाट पाहात बसले आहेत. त्यांचे हे वागणे महाराष्ट्राला आणखीन संकटात नेणारे आहे.

प्रबंध संपादकीय



# हेचि फळ मम काय आले तपाला!

ब्रिटिशांच्या १५० वर्षे गुलामगिरीत राहिलेल्या भारताला स्वातंत्र्य फार मोठ्या महत्प्रयासाने व अविरत कष्टाने मिळाले आहे. यासाठी हजारो-लाखो लोकांनी अनन्वित यातना, त्रास व तुरूंगवास भोगला आहे. कित्येकांनी हसत हसत मरणाला सामोरे जाऊन, ब्रिटिशांची माफी न मागता फास आपल्या गळ्यात घालून घेतला आहे. स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र ठेवून अत्यंत निःस्वार्थी व निरपेक्ष भावनेने पण निधड्या छातीने देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात व्यक्तींना जाणीवपूर्वक आठवण करून सलाम करण्याचा व कृतज्ञ भावनेने त्यांच्या कार्यकर्तृत्वाला मानवंदना देण्याचा महिना म्हणून आपण ऑगस्ट महिन्याकडे पाहतो. ९ ऑगस्ट हा आपला क्रांतीदिन आहे तर १५ ऑगस्ट हा आपला स्वातंत्र्यदिन आहे. या दिवशी लाल किल्ल्यावरचा युनियन जॅक उतरविला गेला आणि त्या जागी आपला तिरंगा ध्वज फडफडला. या तिरंग्यासाठी महात्मा गांधी, पंडीत नेहरू, सुभाषचंद्र बोस, खान अब्दुल गफारखान, दादाभाई नौरोजी यांच्यापासून ते अरूणा असफअली, जयप्रकाश नारायण, यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत लाखो लोकांनी ज्या हालअपेष्टा व लाठ्याकाठ्या झेलल्या, सोसल्या त्यांची आठवण करण्याचा हा महिना आहे. त्यात विशेष हे आहे की आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीला या वर्षी ७५ वर्षे होत आहेत. त्यामुळे संपूर्ण देश मोठ्या आनंदाने व उत्साहाने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहे.

मागील ७५ वर्षात आपल्या देशाने जी प्रचंड व दैदीप्यमान अशी प्रगती केली आहे त्यात काँग्रेस पक्षाचा वाटा खूप मोठा व अनन्यसाधारण अशा प्रकारचा आहे. गांधी-नेहरूंच्या काँग्रेसने या देशाला स्वातंत्र्य तर मिळवून दिलेच पण ज्या देशात टाचणी देखील तयार होत नव्हती तिथे विमाने आणि उपग्रह तयार करण्यापर्यंत मजल मारली आहे. अन्नधान्य उत्पादनात देश स्वावलंबी व्हावा यासाठी १९६५ मध्ये पहिली हरितक्रांती सी. सुब्रमण्यन आणि डॉ. आण्णासाहेब शिंदे यांच्या कारकिर्दीत देशातील शास्त्रज्ञ व शेतकरी यांनी यशस्वी करून दाखविली. तर दुसरी हरितक्रांती २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात केंद्रात कृषीमंत्री असताना मा. शरद पवार साहेबांनी यशस्वी करून दाखविली. त्यामुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर झाला. एवढेच नव्हे तर जगातील २५ देशांना अन्नधान्याची निर्यात करून भारत हा एकेकाळचा धान्य आयात करणारा अशी प्रतिमा असलेला देश धान्याचा निर्यातदार बनला व जगातील अनेक देश धान्य निर्यातीसाठी भारताकडे आशेने बघू लागले. त्याच वेळी भारताने भाजीपाला आणि फळांच्या उत्पादन व निर्यातीतही जगात पहिल्या दोन क्रमांकात स्थान मिळवून आपल्या कार्यकर्तृत्वाचे निशाण जगाच्या नकाशावर रोवले. गेल्या ७० वर्षात काँग्रेसने काय केले असा प्रश्न विचारणाऱ्यांना ही झालेली प्रगती व विकास दिसत नाही का? डोळ्यावर पट्टी बांधून, झापडं लावून ते हिंडताहेत की काय असे वाटण्यासारखी आरोप करणाऱ्यांची परिस्थिती आहे. अर्थात खोटं बोल पण रेटून बोल हाच त्यांचा जीवनसिद्धांत असल्यामुळे त्यांच्याकडून खऱ्या व प्रामाणिकपणाची अपेक्षाच करता येत नाही. २०१४ पासून आपण त्यांच्या जुलमेबाज खोटेपणाचा व जनतेला तद्दन मूर्ख बनविण्याच्या घटनांचा आणि कारवायांचा अनुभव घेत आहोत.

जे हिंदुत्ववादी कधी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले नाहीत, लाठ्याकाठ्या झेलल्या नाहीत, तुरूंगवास सोसला नाही उलट सतत माफीनामा लिहून देण्यातच धन्यता मानली ते आज सत्तेवर आल्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचा डंका पिटून उपदेशाचे बोधामृत जनतेला पाजत आहेत हा केवढा विरोधाभास आहे! जणू काही यांच्यामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि इतका प्रचंड विकासही झाला असे आभासी चित्र उभे करण्यासाठी हिंदुत्ववादी संघटना व भाजपसारखा जातीयवादी धर्मांध पक्ष वेगाने पाऊले पुढे टाकतो आहे हा देशाच्या एकात्मतेला, अखंडतेला व लोकशाही स्वातंत्र्याला मोठा धोका आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात आपण हा धोका वेळीच ओळखून या धर्मांध शक्तींना रोखले नाही तर पुन्हा एकदा देशाची फाळणी होण्याचा मोठा धोका आवासून उभा राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण सर्वांनी वेळीच सावध होऊन राष्ट्रीय एकात्मतेसाठी एकजुटीने व मजबुतीने पाऊले टाकण्याची आवश्यकता आहे. भारतीय राज्यघटना बदलण्याचा मनसुबा रचला गेला असून त्या दृष्टीने सत्ताधाऱ्यांकडून पाऊले टाकली जात आहेत. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेली राज्यघटना मोडून ती अस्ताव्यस्त करण्याचे व लोकशाही आणि कायदा धाब्यावर बसवून मनमानी पद्धतीने दडपशाही करण्याचे काम देशात चालू आहे. ज्यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी अहोरात्र मेहनत केली ते स्वातंत्र्यसैनिक 'हेचि फळ मम काय आले तपाला,' असे म्हणून धाय मोकलून रडत असतील. या स्वातंत्र्य सैनिकांच्या आत्म्याला शांती लाभावी असे वाटत असेल तर आपण सर्वांनी एकजुटीने व एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून निर्धाराने हुकूमशाही प्रवृत्तीविरूद्ध लढण्यासाठी सज्ज होऊया! तिच स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाची खरी पूजा असेल !

संपादकीय



# अमृतकाळाचे 'हलाहल'

स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी ! आपण काहीतरी जगावेगळे करीत असल्याचा नेहमीच आव आणणाऱ्यांनी याला 'अमृतकाळ' असे नामकरण करुन स्वातंत्र्योत्सव जोरदार पध्दतीने साजरा करण्याची तयारी केली आहे. देशभरातील जनतेने १३, १४ व १५ ऑगस्ट असे तीन दिवस आपापल्या घरांवर तिरंगा उभारुन हा अमृतकाळ सार्थ करावा असे आवाहन साक्षात विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी देशाला केले आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात झेंडे शिवण्यात आले आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भाजपच्या कार्यालयात हे झेंडे विक्रीला ठेवण्यात आल्याची बातमी काहीठिकाणी प्रसिध्द झाली. त्याचे लगोलग खंडन करुन भाजपतर्फे लोकांना झेंड्यांचे वाटप करण्यात येत असल्याचा खुलासा करण्यात आला. पण बातम्या उगाच येत नाहीत. कुठेतरी काहीतरी गडबड झालेली असणार. अशीही एक बातमी आली की झेंड्यांची मागणी एवढी वाढलेली आहे की देशातील उत्पादन कमी पडू लागल्याचे लक्षात येताच चिनी निर्मात्यांकडे धाव घेण्यात आली. यात कितपत तथ्य आहे हे सरकारच जाणो. परंतु चीननिर्मित भारतीय राष्ट्रध्वज बाजारात आल्याच्या बातम्या आलेल्या आहेत. ते काही असो. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी काहीजणांसाठी एक 'उत्सव' किंवा 'इव्हेंट' असेल. परंतु कोट्यवधि भारतीयांसाठी तो एक अभिमानाचा प्रसंगही आहे हे विसरुन चालणार नाही. लोकांनी भरभरुन, उत्साहाने ही पंच्याहत्तरी साजरी करावी असेच आमचे मत आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळालेले स्वातंत्र्य कुणा एका पक्षाला किंवा राज्यकर्त्यांना मिळालेले नव्हते. ते जनतेला मिळाले होते आणि भारतातल्या गोरगरीबांनी, वंचितांनी त्यासाठी जगावेगळा असा अहिंसक लढा दिला होता. हिंसा व साहसवाद, नायकवाद कादंबरीमय व नाट्यमय असतो. परंतु तो क्षणिक असतो. निःशस्त्रपणे व अहिंसक मार्गाने साम्राज्यवाद्यांच्या गोळ्या खायला फार मोठे नैतिक सामर्थ्य लागते व हे सामर्थ्य सामान्य जनतेने दाखवले होते. हे सामर्थ्य त्यांना मोहनदास करमचंद गांधी नावाच्या महात्म्याने दिले होते. म्हणून या पंच्याहत्तरीनिमित्त स्मरण त्या लाखो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे करायचे आहे कारण त्यांच्या आहुतीमुळे आज आपण येथपर्यंत पोहोचलो आहोत. या स्वातंत्र्यलढ्याचा गौरवशाली इतिहास, त्यामधील हुतात्मे, त्यांचा त्याग, बलिदान याचे स्मरण सर्वांनी करायचे आहे. हा अभिमानास्पद व गौरवशाली इतिहास नाकारणारे काही नतद्रष्ट या देशात निपजले आहेत. परंतु त्यांच्या अभद्र आठवणी काढून आपण या पंच्याहत्तरीच्या महोत्सवाला गालबोट लावायला नको.

पंच्याहत्तरीचा प्रसंग अभिमानास्पद का आहे ? याचे कारण एवढी विविधता असलेला हा देश भारतीयत्वाच्या एकसूत्राने बांधलेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाने संसदीय लोकशाही प्रणाली का स्वीकारली ? तर, या विविधतेला सामावून घेणारी ही एकमेव व्यवस्था आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या लढ्याचे नेतृत्व करणारे नेते देशात कमालीचे लोकप्रिय होते. त्यांना वाटले असते तर ते हुकुमशहा होऊ शकले असते किंवा अध्यक्षीय प्रणालीही देशात लागू करु शकले असते. परंतु ते विवेकी नेते होते. त्यांनी स्वतःपेक्षा किंवा व्यक्तिवादापेक्षा देशहिताला प्राधान्य दिले आणि सर्वसमावेशक अशी संसदीय लोकशाही व्यवस्था अमलात आणली. भारताने लोकशाहीचा स्वीकार केला होता आणि हुकुमशाहीपेक्षा लोकशाहीची गति मंद असते हे त्रिकालाबाधित सत्य आहे. परंतु लोकशाही मार्गानेच भारताने प्रगती व विकास केला आणि जगातल्या अग्रगण्य अर्थव्यवस्थांमध्ये स्वतःचे स्थान प्राप्त केले. ही प्रगती किंवा विकास हा गेल्या आठ वर्षात झालेला नाही. तर, त्यापूर्वीपासून सुरु करण्यात आलेल्या प्रक्रियेचा भाग आहे. त्यामुळे 'आधीच्या राज्यकर्त्यांनी काही केलेच नाही' असे म्हणणे हा शुध्द करंटेपणा आहे. परनिंदेने स्वतःचा मोठेपणा सिध्द करता येत नाही. स्वतःचे देखील काही मोठेपण असावे लागते. याच राज्यकर्त्यांनी विविधतेच्या सर्वसमावेशकतेसाठी संघराज्य पध्दती देखील स्वीकारली. याचे कारण भारतासारख्या देशात प्रत्येक राज्याची स्थिती वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या आणि देशाच्या घटनेच्या चौकटीत पुरेशी स्वायत्तता देणेही आवश्यक होते. ती बाब लक्षात घेऊनच देशाने संघराज्य पध्दती स्वीकारली. यामागे व्यापक देशहित तसेच सर्वांना त्यांचे स्थान, त्यांची ओळख व अस्मिता देऊनही भारतीयत्वाच्या सूत्रात समाविष्ट करण्याचा तत्कालीन दूरदृष्टीच्या नेत्यांचा हेतु होता. त्यांच्या दूरदृष्टीची अनेक उदाहरणे देता येतील. परंतु तो आजचा विषय नाही. पंच्याहत्तरीच्या निमित्ताने देश आज कुठवर आला आहे याचे स्मरण करण्याची ही वेळ आहे.

पंच्याहत्तरी किंवा 'अमृतकाळा'चा आढावा घेण्यासाठी काहीतरी आधार घ्यावाच लागेल. त्यासाठी राज्यघटना हा आधार होऊ शकतो. परंतु भारताच्या राज्यघटनेचे सार ज्यामध्ये सामावलेले आहे त्या उद्देशपत्रिकेचा किंवा प्रस्तावनेचा (ज्याला इंग्रजीत प्रिअँबल म्हणतात) आधार घेणे अधिक अर्थपूर्ण होईल. या उद्देशपत्रिकेतच संघराज्याची संकल्पनाही समाविष्ट करण्यात आली आहे. प्रथम तिचाच विचार करु. सध्या या संकल्पनेवर पध्दतशीर आघात करुन ती अधिकाधिक कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विशेषतः या प्रक्रियेला २०१४ पासून विशेष जोर व गति प्राप्त झाली आहे. इतिहासात नंतर जाऊ. तूर्तास वर्तमानातील स्थितीचा आढावा घेऊ. नुकतीच एक बातमी प्रसिध्द झाली. छत्तीसगढ सरकारला केंद्र सरकारकडून इशारा ! इशारा कशा बद्दल ? पंतप्रधान आवास

योजनेची छत्तीसगढमधील गति समाधानकारक नसल्याचे कारण देऊन केंद्राने छत्तीसगढ सरकारला तंबी दिली आहे की केंद्राला अपेक्षित गति धारण न केल्यास या योजनेला दिल्या जाणाऱ्या केंद्रीय अर्थसाह्याबाबत फेरविचार करावा लागेल. याच्याच जोडीला इतरही केंद्र सरकार पुरस्कृत योजनांच्या निधिबद्दल विचार करावा लागेल असेही या इशारेवजा धमकीत म्हटले आहे. असे गृहीत धरु की छत्तीसगढमध्ये पंतप्रधान आवास योजनेची गति समाधानकारक नाही. परंतु त्याचा अर्थ हा नव्हे की अर्थसाह्य थांबविण्याची धमकी दिली जावी. राज्यांना आर्थिक हालाखीची स्थिति असेल तर योजनांच्या अंमलबजावणीत चालढकल होऊ शकते. जीएसटीच्या नुकसानभरपाईबाबत केंद्र सरकारने अक्षम्य दिरंगाई केली होती आणि जीएसटी कौन्सिलमध्ये राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी जेव्हा निर्वाणीचे इशारे दिले तेव्हा केंद्र सरकारने ते हप्ते देण्याचे मान्य केले. परंतु त्यातील काही भाग त्यांनी चक्क राज्यांना कर्जाच्या द्वारे प्राप्त करण्यास सांगितले. म्हणजेच राज्यांनी कर्जबाजारी होण्याचा हा मार्ग होता. त्यावेळी राज्यांनी धमक्या दिल्या नव्हत्या. जीएसटी जमा कोण करते ? केंद्र सरकारला हवेतून आकाशातून तो मिळत नाही. राज्य सरकारे तो जमा करुन केंद्राकडे वर्ग करतात आणि मग केंद्र सरकार ठरलेल्या सूत्रानुसार त्याचे वाटप करते. जीएसटीचे पैसे केंद्राला परस्पर खर्च करण्याचा किंवा वापरण्याचा अधिकार नाही. परंतु याच केंद्र सरकारने करोना काळात जीएसटीची रक्कम थेट केंद्राच्या खजिन्यात जमा करुन टाकली होती. हा प्रकार शुध्द व निव्वळ घटनाबाह्य व घटनाविरोधी होता. 'सीएजी' म्हणजेच देशाचे महालेखानियंत्रक यांनी त्यांच्या अहवालात केंद्राच्या या प्रकारावर टीका केली आणि ही कृति घटनाबाह्य व अनुचित ठरवली. हे उदाहरण देण्याचे एवढेच कारण की चालढकल, दिरंगाई सर्वच पातळीवर असते. पण त्याचा अर्थ लगेच एकमेकाच्या विरोधात तीरकमठा घेऊन उभे राहणे हा होत नाही. आणखीही एका गोष्टीकडे दिशानिर्देश करावाच लागेल. छत्तीसगढमध्ये कॉंग्रेस पक्षाचे सरकार आहे. निर्विवाद बहुमताचे सरकार आहे आणि ते अस्थिर करण्याचे अनेक प्रयत्न असफल ठरले आहेत. बहुधा त्याच प्रयत्नांचा हा आणखी एक नवा अध्याय असावा की जेणेकरुन त्या सरकारला सळो की पळो करुन सोडणे शक्य होईल. यातूनच उपस्थित होणारा मुद्दा म्हणजे भेदभावाचा. केंद्र सरकार हे सर्व देशाचे असते आणि त्या सरकारने राज्यांमध्ये वेगवेगळ्या आणि अगदी विरोधी पक्षांची सरकारे असली तरी निधिवाटप आणि इतर आर्थिक मदतीबाबत भेदभावाची भूमिका घेणे अपेक्षित नसते. परंतु वर्तमान राजवटीत विरोधी पक्षांच्या सरकारांना त्राहीत्राही करुन सोडले जात आहे. जणूकाही भाजपची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये नंदनवनच अवतरले आहे. मानवविकास निर्देशांकाच्या आकडेवारी व क्रमवारीत भाजप-शासित उत्तर प्रदेशाचा कितवा नंबर लागतो ? आरोग्य असो किंवा शिक्षण असो या क्षेत्रात या प्रदेशाचे स्थान शेवटाकडेच आढळून येते. तेव्हा केंद्र सरकारतर्फे उत्तर प्रदेशाला असे इशारे दिले जातात काय हा सवाल आहे. थोडक्यात, केंद्र सरकारतर्फे केला जाणारा भेदभाव आणि विशिष्ट राज्यांना दिली जाणारी सावत्र वागणूक व स्वपक्षाच्या राज्यांना झुकते माप व 'सारे गुन्हे माफ'ची वागणूक हा भेदभाव सर्रासपणे दिसून येतो.



संघराज्य प्रणालीतूनच निर्माण होणारा मुद्दा विकेंद्रीकरणाचा आहे. विकेंद्रीकरण हा संघराज्य पध्दती व संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात याच्या बरोबर विरुध्द कृति सुरु आहे. ही कृति आताच नव्हे तर २०१४ पासून सुरु आहे. जीएसटीचा विषयच घ्या. ही प्रणाली एका पातळीवर संघराज्य व्यवस्थेच्या विरोधात जाणारी आहे. अण्णा द्रमुकने याच मुद्यावर विरोध केला होता. या प्रणालीमध्ये केंद्राला वाढीव व राज्यांवर हुकमत गाजवता येतील असे अधिकार मिळणार असल्याने आणि ही(जीएसटी) प्रणाली संघराज्य पध्दतीवर व त्याद्वारे मिळणाऱ्या राज्यांच्या स्वायत्ततेवर आघात करणारी असल्याचे अण्णाद्रमुकने म्हटले होते. संसदेत यासंबंधीचा कायदा संमत होताना त्यांनी ही भूमिका मांडली होती आणि या कायद्याला विरोध केला होता. त्यावेळी ते एकाकी पडले होते. परंतु आता पाच वर्षांनंतर त्याचे प्रत्यंतर येताना दिसत आहे. जीएसटी करप्रणालीच्या अंमलबजावणीसाठी 'जीएसटी कौन्सिल'ची स्थापना करण्यात आली. सर्व राज्यांचे अर्थमंत्री याचे सदस्य आहेत. परंतु या कौन्सिलची रचना अशी आहे की ज्यामध्ये केंद्र सरकारच्या प्रतिनिधींना निर्णायक अधिकार देण्यात आलेले आहेत. अलीकडेच सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन गरजेच्या काही वस्तुंवर करवृध्दी करण्याचा निर्णय जीएसटी कौन्सिलने केला. त्यामध्येही केंद्राचीच भूमिका प्रमुख होती.

महाराष्ट्राचे अर्थमंत्री(तत्कालीन) अजित पवार यांनी एक पत्र लिहून जीएसटीचे दर वाढविण्यास विरोध करणारे पत्रही दिले. म्हणजेच राज्यांचा विरोध असतानाही केंद्र सरकारने ही दरवाढ केली. यामुळे सामान्य माणसावरचा बोजा वाढणार आहे परंतु केंद्र सरकारने हा निर्णय करताना मागेपुढे पाहिलेले नाही. विकेंद्रीकरणात अधिकारांचे वितरण आणि स्वायत्तता (राज्यघटनेच्या चौकटीत) हे दोन घटक महत्वाचे असतात. परंतु सध्या याच्या उलट काटे फिरविणे सुरु आहे. पंतप्रधान कार्यालयास अनन्यसाधारण महत्व दिले जात आहे. जवळपास सर्व निर्णायक अधिकार हे या कार्यालयात एकवटण्यात आले आहेत. कोणत्या मंत्रालयात कोणता निर्णय करायचा हे पंतप्रधान कार्यालयात ठरविले जाते. तशी नोट किंवा प्रस्ताव तयार होऊन संबंधित मंत्रालय व मंत्र्याकडे पाठविणे आणि कॅबिनेटमध्ये त्याचा औपचारिक उल्लेख करुन अंतिम मंजुरी देणे असा प्रकार चालू असल्याचे सांगण्यात येते. पूर्वी आपल्या मंत्रालयात कोणते निर्णय करायचे किंवा कोणत्या नव्या योजना राबवायच्या याचे अधिकार संबंधित मंत्र्यांना असत. त्यांचे मंत्रालय तसे प्रस्ताव तयार करुन कॅबिनेटपुढे ठेवत व त्यावर चर्चा होऊन निर्णय होत असे. म्हणजेच मंत्रालयांची स्वायत्तता व मंत्र्यांना कामाची मोकळीक असे. आता तशी स्थिति उरलेली नाही. आता निर्णय पंतप्रधान व त्यांचे कार्यालय करते. याचे आणखी एक मोठे उदाहरण आहे. २०१४ मध्ये सत्तेत आल्याआल्या वर्तमान पंतप्रधानसाहेबांनी पहिला निर्णय केला तो योजना आयोगाच्या

बरखास्तीचा ! या साहेबांनी योजना आयोगाचे अस्तित्व संपवून टाकले. त्याच्या जागी 'नीती आयोग' नावाची संस्था जन्माला घातली. सरकारला धोरणात्मक दिशानिर्देशन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. योजना आयोगाच्या बरखास्तीचे परिणाम जाणून घेण्यापूर्वी योजना आयोगाचे काम व स्वरुप समजावून घेणे आवश्यक आहे. देशासाठी पंचवार्षिक योजना तयार करणे, निधी वाटपाबाबत शिफारशी करणे, विकास व प्रगतीसाठी प्राधान्यक्षेत्रांची निवड करणे असे योजना आयोगाचे स्वरुप होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सर्वप्रथम नियोजनबध्द विकासाची कल्पना मांडली होती. त्यासाठी त्यांनी काँग्रेस पक्षातर्फे १९३९ मध्ये एक नियोजन मंडळही स्थापन करुन त्याचे अध्यक्षपद पं. नेहरू यांच्याकडे दिले होते. (सध्याचे पंतप्रधान नेताजींबद्दल फार आदर बाळगत असल्याचे दाखवतात व प्रत्यक्षात नेताजींच्या योजना आयोगावरच कुऱ्हाड चालवतात यावरुन त्यांचे नाटक लक्षात यावे). कालांतराने योजना आयोगाकडे विकास व प्रगतीच्या योजनांच्या प्रस्तावांच्या छाननीची जबाबदारीही आली. एखाद्या राज्याला राज्यात एखादी मोठी योजना राबवायची असल्यास ते तसा प्रस्ताव योजना आयोगाकडे पाठवत.

योजना आयोगातर्फे त्याची छाननी होत असे. त्यानंतर ती योजना प्रस्तावाच्या स्वरुपात केंद्रीय मंत्रिमंडळासमोर सादर होऊन त्यावर मंजुरी किंवा नामंजुरी होत असे. आता योजना आयोगाचे अस्तित्वच संपलेले असल्याने राज्यांना कोणत्या यंत्रणेसमोर प्रस्ताव सादर करावयाचा हे माहिती नाही. एकदा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या संदर्भात नाराजी व्यक्त करताना सांगितले होते की आता स्थिती अशी आहे की राज्यांच्या विकास योजनांचे प्रस्ताव कुणापुढे सादर करायचे हे कळेनासे झाले आहे. राज्यांना आता थेट पंतप्रधान कार्यालयासमोरच हजर व्हावे लागते. याचाच अर्थ राज्यांना पंतप्रधान कार्यालय म्हणजेच साक्षात पंतप्रधानसाहेब यांच्यासमोर येऊन झुकून त्यांच्यापुढे आपापले विकासयोजनांचे प्रस्ताव सादर करायचे आणि मग त्यांच्या परवानगीची प्रतीक्षा करीत बसायचे असा हा प्रकार झाला आहे. राज्यांना केंद्रापुढे गुडघ्यावर टेकायला लावण्याचा हा पूर्णपणे लोकशाहीविरोधी प्रकार आहे. विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरणावर आधारित राज्यव्यवस्थेत परिवर्तन करण्याचा हा प्रकार आहे.

राज्यघटनेच्या मूळ गाभ्यावरच कसे आघात करणे सुरु आहे याची काही उदाहरणे वर दिली. राज्यघटनेने स्वातंत्र्य, बंधुता व समभावाचे तत्व अधोरेखित केले आहे. सामाजिक समानता व सलोख्यावर भर दिलेला आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या पसंतीच्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार देतानाच सर्व धर्मांना समान वागणूक देण्याचा संकल्प व हमीही देण्यात आली आहे. प्रश्न असा आहे की यापैकी कोणत्या संकल्पनेची तंतोतंत अंमलबजावणी वर्तमान राजवटीतर्फे केली जात आहे. प्रश्न पडावा अशीच सद्यःस्थिती आहे. २०१४ पासून बहुसंख्यकवादाला नियोजनबध्द रीतीने खतपाणी घातले जात आहे. त्यातून निर्माण बहुसंख्यकवादी कट्टरतेला प्रोत्साहन व पाठबळ दिले जात आहे. अल्पसंख्यक समाजाला दहशत घालून रहायचे असेल तर दुय्यमतेने रहा अथवा परिणामांना तयार रहा अशा रीतीने उघड किंवा छुप्या पध्दतीने धमकावले जात आहे. अल्पसंख्याकांना 'टार्गेट' करण्यासाठी गाय आणि गायरक्षणासारखी प्रतीके निर्माण केली जात आहेत. कट्टरपंथीयांना तर आता उघडपणे पाठीशी घातले जाऊ लागले आहे. दहशतवाद हे असेच एक प्रतीक निर्माण करण्यात आले आहे. अल्पसंख्यक म्हणजे दहशतवादी व देशद्रोही असे समीकरण रूढ करण्याचे पध्दतशीर प्रयत्न चालू आहेत. नुकतेच घडलेले नुपूर शर्मा प्रकरण सर्वांच्या मनात ताजे आहे. ही महिला भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्तेपदावर होती. या महिलेने अल्पसंख्य समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारे विधान केले. त्याचा पुनरुच्चार येथे करण्याची आवश्यकता नाही. परंतु अल्पसंख्यक समाजात त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. परंतु सध्याच्या निष्ठूर व विधिनिषेधशून्य राज्यकर्त्यांवर त्या प्रतिक्रियेचा परिणाम झाला नाही. परंतु या महिलेची टिप्पणी एवढी गंभीर होती की त्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर इस्लामी देशांनी घेतली. आपण तेल आयात करतो ते आखाती देश इस्लामी आहेत. त्यांनी भारतीय मालावर बहिष्कार टाकणे, आखाती देशात लाखो भारतीय काम करायला व पैसे मिळवायला गेलेले आहेत. त्यांना नोकऱ्यांवरुन काढण्याचे इशारे काही देशांनी दिल्यावर या प्रकरणी सोयीस्कर मौन पाळून घुमेपणा करणारे हे सरकार जागे झाले. पण या महिलेविरुध्द पोलिस कारवाई दूरच पण उलट तिच्या जिवाला धोका असल्याचे निमित्त करुन तिला व्हीआयपींना देतात तशी सुरक्षा व्यवस्था देण्यात आली. थातूरमतूर कारवाई म्हणजे या महिलेस केवळ पक्षाच्या प्रवक्तेपदावरुन दूर करण्यात आले. खरेतर सरकारने पोलिसी कारवाई करणे अपेक्षित असताना सरकारने तसे काहीही न करणे याचाच अर्थ त्यांचा या महिलेच्या विधानाला विरोध नसल्याचे लक्षात आल्याखेरीज रहात नाही. या महिलेचेच दुसरे भाऊ व भाजपचे दिल्लीतले स्थानिक नेते नवीनकुमार यांनीही अशीच इस्लामविरोधी मुक्ताफळे झाडल्यावर त्यांना पक्षातून काढून टाकण्यात आले. यामध्ये देखील भाजपचा दुटप्पीपणा लक्षात यावा. त्यामुळे वर्तमान राजवटीत राज्यघटनेने बहाल केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या कशा चिंध्या होत आहेत हे ध्यानात यावे. सर्वधर्मसमभाव किंवा राज्यकर्ते धर्मनिरपेक्ष असले पाहिजे या राज्यघटनेतील मूल्याला हरताळ फासण्याचे काम सातत्याने सुरु आहे.

राज्यकर्त्यांच्या बहुसंख्यकवादाला खतपाणी घालण्याचे आणखी एक मोठे उदाहरण म्हणजे 'सीएए' उर्फ नागरिकत्व दुरुस्ती कायदा. हा कायदा उघडउघडपणे अल्पसंख्यक व त्यातही ख्रिश्चन व मुस्लिम समाजाच्या विरोधात करण्यात आलेला आहे. परदेशात राहणारे हिंदू, जैन, बौध्द यांना काही कारणाने देश सोडावा लागल्यास त्यांना आपोआप भारताचे नागरिकत्व मिळण्याची सोय या कायद्यात करण्यात आलेली आहे. मुख्यतः पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगला देशातील नागरिकांसाठी तो करण्यात आला आहे. यावरुनच या कायद्याचा अर्थ स्पष्ट होतो. असा कायदा करुन धार्मिक भेदभाव केला जाऊ नये असे सांगूनही विरोधी पक्षांच्या नाकावर टिच्चून हा कायदा करण्यात आला. द्वितीय पोलादी पुरुष उर्फ प्रति सरदार पटेल उर्फ देशातले क्रमांक दोन उर्फ देशाचे गृहमंत्री यांनी सांगितले की फाळणीनंतर पं.नेहरू व पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अलि यांच्या करारात उल्लेखित अपूर्ण काम या कायद्याद्वारे पूर्ण करीत आहोत. यामध्ये परदेशातील हिंदूंना व निर्वासितांना आपोआप नागरिकत्व देण्याची कल्पना मांडलेली होती असे त्यांनी सांगितले. प्रत्यक्षात हे धादांत असत्य आहे. या करारात कोणत्याही धर्माचा उल्लेख नाहीच

पण आपापल्या देशातील अल्पसंख्यक समाजाचा यथोचित व पूर्ण सन्मान करण्याची हमी देण्याचा उल्लेख त्यामध्ये आहे. संसदेच्या पटलावर असत्यकथन अमान्य आहे. परंतु नेहरू-लियाकत अलि करारामधील अर्धसत्य किंवा जवळपास असत्यकथन करण्यात आले आणि जणू काही स्वातंत्र्यानंतरचे एक फारमोठे अनिर्णित काम आपण करीत असल्याचा आव आणण्यात आला.

याचा दुसरा भागही तेवढाच मनोरंजक आहे. या कायद्याचा संबंध आसाममधील परकी नागरिकांच्या प्रश्नाशी जोडलेला आहे. रा.स्व.संघ परिवार आणि भाजपने आसाममधील मुस्लिम हे भारतीयच नाहीत आणि ते बांगला देशी म्हणजे परकी नागरिक आहेत आणि म्हणून त्यांना पुन्हा बांगला देशात घालवून दिले पाहिजे अशी भूमिका घेतलेली आहे. प्रत्यक्षात यासंदर्भात आसाम करारानुसार छाननी झाल्यावर बिगरमुस्लिम म्हणजे हिंदूंची संख्याच अधिक असल्याचे आढळून आले होते. यामुळे झाली पंचाईत. आता हिंदूंना पुन्हा बांगला देशात पाठवावे लागले म्हणजे हिंदू व्होटबँकवरच गदा आली असती. त्याचेवेळी आसाममध्ये विधानसभा निवडणूकही होती. त्यामुळे संसदेने हा कायदा संमत केल्यानंतरही त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी जी नियमावली तयार करावी लागते ती तयार करण्याचे काम स्थगित करण्यात आले. अजुनही या कायद्याची नियमावली तयार करण्यात आलेली नाही. आता पुन्हा जाग आल्यानंतर द्वितीय पोलादी पुरुषांनी लवकरच ती नियमावली तयार करण्यात येईल अशी घोषणा केली आहे. कायदा संमत होऊन राष्ट्रपतींची सही झाल्यानंतर सहा महिन्यात ही नियमावली तयार करावी लागते. पण ते होऊ शकले नाही. प्रकरण कोर्टात गेल्यावर काहीतरी वेळ मारुन नेत सरकारने 'तारीख पे तारीख' ही मधली वर्षे हे प्रकरण ढकलत आणले आहे. या सर्व तपशीलांवरुन एकच बाब स्पष्ट होते की केंद्रीय पातळीवर सुरु असलेली मनमानी आणि 'हम करे सो कायदा'ची प्रवृत्ती. जम्मू-काश्मीरच्या विभाजनाचा निर्णय देखील परस्पर, एकतर्फी पध्दतीने करण्यात आला. त्यासंबंधी कुणालाही विश्वासात न घेता संसदेतील बहुमताच्या बळावर आणि बळजबरीने हे करण्यात आले. यावेळी घटनेची पूर्ण वासलात लावण्यात आली. जम्मू-काश्मीर राज्यात केंद्रीय राजवट होती, स्थानिक प्रादेशिक पक्षांचे नेते अटकेत होते आणि राष्ट्रीय पातळीवरील विरोधी पक्षांना देखील विश्वासात न घेता किंवा लोकशाहीत अपेक्षित असलेली सल्लामसलत, विचारविनिमय प्रक्रिया न करता हा प्रकार करण्यात आला. हे कोणत्या लोकशाहीला आणि राज्यघटनेला धरुन होते हा अनुत्तरित सवाल असला तरी त्याचे उत्तर न देण्याचा बेमुर्वतखोरपणा कायम आहे.

धार्मिक स्वातंत्र्य आणि धार्मिक सलोखा, सामाजिक सौहार्द हे सर्व केवळ राज्यघटनेच्या प्रतीमधील छापील शब्द राहिले आहेत. गोरक्षणाच्या नावाखाली निरपराध मुस्लिमांची केवळ संशयावरुन हत्या करण्याचे प्रकार या देशाने अनुभवले आहेत. याविरुध्द पोलिसी व कायदेशीर कारवाई नाममात्र होऊन गोरक्षकांना उघडपणे पाठीशी घालण्याचे उद्योग झालेले आहेत आणि चालूही आहेत. कर्नाटकासारख्या प्रगतीशील म्हणविणाऱ्या राज्यात देखील हिंदू कट्टरपंथीयांकडून अल्पसंख्याक समाजाला 'टार्गेट' करण्याची कारणे सातत्याने शोधली जात आहेत. भाजप आणि योगी आदित्यनाथशासित उत्तर प्रदेशात तर मुस्लिमांना पध्दतशीरपणे लक्ष्य करण्यात येत आहे. एखाद्या प्रकरणात संशयावरुन जरी कुणी मुस्लिम नागरिक पकडला गेल्यास त्याचे घरदार, मालमत्ता उद्ध्वस्त करण्याचे कंत्राट मिळाल्यासारखी कारवाई केली जात आहे.

हा प्रकार रूढ करण्याचे प्रयत्न सुरु असतानाच सुप्रीम कोर्टाने तो कायद्याच्या दृष्टीने पूर्णपणे अमान्य असल्याचे सांगून तीव्र नापसंती व्यक्त केली. मुळात हे प्रकार घडतात कसे आणि लोकनियुक्त व घटनेनुसार सत्तेत आलेले सरकार असे घटनाबाह्य प्रकार करते कसे हा प्रश्न आहे. त्याचे उत्तर आहे सत्तापक्षाची धार्मिक ध्रुवीकरण नीती, त्याद्वारे आपला बहुसंख्यकवाद प्रोत्साहित करण्याचे धोरण आणि त्यातून 'व्होटबँक' अधिक बळकट करणे. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी हा निश्चितच उत्सवाचा प्रसंग आहे. परंतु तो साजरा करतानाची देशाची सद्यःस्थिती काय आहे याचे आकलनही तेवढेच महत्वाचे आहे. आर्थिक आघाडीवरील आव्हाने चिंताजनक झालेली आहेत. रुपयाची घसरण सुरु आहे. आयात-निर्यातीतील तफावत वाढत आहे. परकी कर्जाचा बोजाही वाढत आहे. जागतिक स्तरावर अस्थिर व अनिश्चिततेची परिस्थिती निर्माण झाली आहे. आर्थिक महासत्तांमध्ये साठमारी व परस्परांवर कुरघोडी करण्याची स्पर्धा सुरु झालेली आहे. यामध्ये सरळमार्गी देश भरडले जाणार आहेत. या परिस्थितीत समतोल आणि कोणत्याही जागतिक गटबाजीत सामील न होता संतुलित परराष्ट्रधोरण अंगिकारण्याची गरज आहे. प्रत्यक्षात चित्र वेगळे घडते आहे.

कळत-नकळत भारताचा समावेश अमेरिकेच्या गटात झाल्यासारखे चित्र निर्माण झाले आहे. त्याचे स्पष्टीकरण होण्याची आवश्यकता आहे. साहसवादी परराष्ट्र धोरणाचा परिणाम लडाखमध्ये भोगत आहोत. अनेक दशके शांत व स्थिर असलेली भारत-चीन सीमा धगधगून उठली आणि त्यात वीस जवानांचे प्राण गेले. अद्याप लडाखमधील परिस्थिती सुरळीत झालेली नाही. राज्यकर्ते सोयीस्कर मौन बाळगून आहेत. संसदेचे महत्व नगण्य करण्यात आले आहे. माध्यमांचे व विशेषतः पत्रकारांच्या तसेच वृत्तपत्र आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणली जात आहे. संसदेत माध्यमांना प्रवेश मर्यादित करण्यात आला आहे. पारदर्शकता लोप पावून सरकारी गोपनीयतेच्या नावाखाली संसदेच्या नव्या वास्तूच्या बांधकामाचे फोटो काढण्यावर देखील बंदी करण्यात आली आहे. सरकार किंवा पंतप्रधानांवर टीका करणाऱ्यांच्या विरुध्द सरळ सरळ देशद्रोहाचे खटले भरले जात आहेत. नागरिकांवर दबाव वाढत आहे. विरोधाचा स्वर काढणाऱ्यांना ईडी, सीबीआय यासारख्या तपाससंस्थांच्या माध्यमातून सळो की पळो करुन सोडले जात आहे. या सर्व कृतींमध्ये विधिनिषेधशून्यता आणि कोडगेपणाचा मिलाफ झालेला आहे. ही एकचालकानुवर्तित्वाच्या दिशेने वाटचाल आहे. हे सर्व प्रकार अराजकाला निमंत्रण देणारे आहेत ! स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीचा हा अमृतकाळ असला तरी दुर्दैवाचा भाग हा आहे की ज्या राजकीय विचारसरणीने भारतीय स्वातंत्र्य कधीच मनापासून, अंतःकरणापासून मान्य केले नाही, स्वीकारले नाही आणि राज्यघटनेला स्वीकारले नाही, तिरंग्याला मानले नाही व ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भागही घेतला नाही अशी मंडळी या अमृतकाळाच्या आघाडीवर आहेत. हे हलाहल देशाला पचवावे लागत आहे !



# मध्यावधी निवडणुका होतील असे मी म्हणालोच नाही...

**प्रश्न : कार्यकर्त्यांना संबोधित करताना आपण निवडणुकीच्या तयारीला लागा असे म्हणलात. म्हणजे राज्यात मध्यावधी निवडणुका होणार का.**

**शरद पवार :** मध्यावधी निवडणुका असं मी म्हणालोच नाही. मी असं म्हणालो, की राज्यात असलेले सरकार हे केवळ अडीच वर्षाचे आहे. त्यामुळे पुढील तयारीसाठी आतापासूनच सुरुवात करायला हवी. प्रत्यक्ष निवडणुका येतात त्याआधी सहा महिने वेगळे वातावरण असते. त्यामुळे आपल्या हातात साधारण दोन वर्षे आहेत. या काळात आपली पूर्ण तयारी असली पाहिजे. ते लक्षात घेऊन आपण कामाला लागा असं सुचवलं होतं.

**प्रश्न : शिवसेनेतून बाहेर पडलेले आमदार राष्ट्रवादीला दोष देत आहेत. निधी कमी दिला असं म्हणतात. त्यावर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी निधीच्या वाटपाचे आकडेही जाहीर केले. त्यानंतरही आता बंड केलेले आमदार कधी हिंदुत्त्वाचा मुद्दा तर कधी राष्ट्रवादीचा मुद्दा पुढे करत आहेत.एकूणच गोंधळाचे वातावरण आहे. तुम्ही याकडे कसे बघता.**

**शरद पवार :** शिवसेनेतून बंड केलेल्या सदस्यांना सांगायला काही निमित्त नाही. काही निश्चित सांगण्यासारखी स्थिती नव्हती. म्हणून कोणी हिंदुत्वाचा विषय सांगतं, कोणी राष्ट्रवादीचा विषय सांगतं, कोणी निधी मिळाला नाही, असं सांगतात. या सगळ्या गोष्टी सूड घेण्याचा निर्णयानंतर सुरू झाल्या. त्याच्याआधी असं काही माझ्या कानावर आलेलं नव्हतं. शिवसेनेतील काही सदस्यांनी जो काही निर्णय घेतला त्याला काही आधार नाही. त्यामुळे लोकांच्यासमोर काहीतरी स्पष्टीकरण केलं पाहिजे याशिवाय दुसरा कुठलाही मुद्दा नाही. मला एक आठवतोय, की हे सरकार झाल्यानंतर पहिले वर्ष, सहा महिने अनेक लोक हे सांगायचे, की या मंत्रीमंडळामध्ये राष्ट्रवादीचे मंत्री अधिक काम करतात अधिक प्रश्न सोडवतात, असा आमचा अनुभव आहे. अशी वक्तव्य मी आघाडीच्या अनेक आमदारांकडून ऐकली आहेत. त्यामुळे आता जे काही सांगितलं जातंय, याचा अर्थ त्यांनी हा राजकीय निर्णय काही अन्य कारणाने घेतला आहे. त्या निर्णयासंबंधीची सक्षम भूमिका लोकांसमोर मांडायला



# केंद्र सरकार सर्वसामान्यांना महागाईच्या संकटात लोटतेय

**शरद पवार**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी जुलै महिन्यात औरंगाबाद आणि नागपूर दौरा केला. या दौऱ्या दरम्यान आयोजित पत्रकार परिषदांमध्ये त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर आपली मते मांडली.**

काही नाही, त्यामुळे हा गोंधळ होतोय.

**प्रश्न : याला आपण बंड की उठाव म्हणणार.**

**शरद पवार :** याला मी काहीच म्हणणार नाही. कारण असं आहे, की काहीतरी प्रभावशाली निर्णय किंवा आधार हा पदरात पडल्याच्यानंतर असे निकाल घेतले जातात. आता ते प्रभावशाली काय मिळालं याची माहिती माझ्याकडं नाही.

**प्रश्न : महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे पक्ष शिवसेनेच्या मतदारसंघातील पक्षाचे वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न करत होते, असं बंडखोर सांगतात.**

**शरद पवार :** तुम्हाला जर राष्ट्रवादीची माहिती असेल तर आम्ही कधी हा विचारसुद्धा केला नाही. आम्ही जो विचार केला होता, तो येणाऱ्या विधानसभेला तिघांना मिळून एकत्र जाण्यासाठीची प्रक्रिया सुरू करावी. केलेली नव्हती. तिघांनी मिळून हा विचार आमचा होता. मात्र याबद्दल शिवसेना अथवा काँग्रेसशी कोणतीही चर्चा झाली नाही. मात्र आमचा तो विचार निश्चित होता.

**प्रश्न : २०२४मध्ये तिन्ही पक्ष मिळून एकत्र लढणार का?**

**शरद पवार :** असं आहे, की आम्ही २०२४ ला एकत्र लढावे हे माझे व्यक्तिगत म्हणणे आहे. पण मी अजून माझ्या पक्षात बोललेलो नाही, शिवसेनेशी बोललेलो नाही आणि काँग्रेसशीही बोललेलो नाही. असे निर्णय एकट्याने घ्यायचे नसतात. सगळ्यांनी बसून घ्यायचे असतात. ही प्रक्रिया आमची सुरू झालेली नाही.

**प्रश्न : बंडखोर गट आणि शिवसेनेच्या याचिकांवर सुप्रिम कोर्टात काय निकाल लागू शकतो.**

**शरद पवार :** अलीकडे देशात आणि राज्यात काही गोष्टी घडत आहेत. म्हणजे आमच्याही ज्ञानात भर आहे. म्हणजे महाविकास आघाडी सरकारने विधानसभा अध्यक्षांची जागा भरण्यासाठी निर्णय घेतला असताना राज्यपाल महोदयांना अधिक कष्टदायी काम असल्यामुळे या निर्णयापर्यंत त्यांना जाता आले नाही. मात्र दुसरे सरकार आल्याबरोबर ४८ तासांपेक्षा कमी वेळात राज्यपालांनी

आपल्या कामाची एफिशियन्सी दाखवली. यापूर्वी अनेक मान्यवर त्या जागेवर येऊन गेले आहेत त्यांनी त्या पदाची प्रतिष्ठा उंचावण्याचे काम केले आहे. या पार्श्वभूमीवर सध्या जे काय आम्ही पाहतो आहोत ते अतिशय चमत्कारिक आहे. पण राज्यपाल आहेत त्याच्यामुळं मी काही बोलत नाही.

**प्रश्न : ऑलरेडी या सगळ्या कहाणीची स्क्रीप्ट लिहिली गेली होती असं वाटतं का.**

**शरद पवार :** राज्यात घडलेल्या घडामोडी या एका




दिवसात होत नाहीत. या सगळ्याची पूर्वतयारी व्यवस्थित कुठेतरी केलेली असणार.

**प्रश्न : महाविकास आघाडी बनवताना किमान समान कार्यक्रम ठरवलेला होता. त्यामध्ये औरंगाबादचे संभाजीनगर नामांतर करण्याचा मुद्दा नव्हता. मग त्याला मंजुरी देण्यासंबंधीची माहिती तुम्हाला होती का.**

**शरद पवार :** असं आहे, की औरंगाबादचे नामांतरण हा विषय तीनही पक्षाने बसून तयार केलेल्या किमान समान कार्यक्रमात नव्हता. त्यासंबंधीचा निर्णय जो शेवटच्या कॅबिनेटमध्ये घेण्यात आला त्यासाठी आमच्याशी कोणताही सुसंवाद करण्यात आलेला नाही. हा निर्णय घेतल्याच्यानंतरच आम्हाला कळले. आम्ही जो कार्यक्रम ठरवला. त्यामध्ये हा विषय नव्हता. त्याला आमची सामूहिक संमती नव्हती. पण, हा निर्णय घेतल्याच्यानंतर मला माहिती मिळाली. मंत्रीमंडळाच्या कामाची एक पद्धत असते. मंत्रिमंडळ बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांचा निर्णय हा अंतिम असतो. त्यावर कोणतेही मतदान नसते. त्यावर मतं व्यक्त केली जातात. मात्र ते मुख्यमंत्र्यांसाठी बंधनकारक नसते. काही लोकांनी मतं व्यक्त केली. पण प्रत्यक्ष माहिती अशी आहे, की हा निर्णय मुख्यमंत्र्यांचा अंतिम निर्णय असतो तसा त्यांनी तो जाहीर केला. शेवटी तो मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून जाहीर करावा लागतो. असा निर्णय घेतला जाणार आहे याची यत्किंचितही माहिती आम्हाला नव्हती. अशा प्रश्नांपेक्षा औरंगाबादच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या काही गोष्टी केल्या असत्या, तर इथल्या जनतेला त्याचा आनंद झाला असता. हा भावनेचा प्रश्न उपस्थित झाला नसता तर मला आनंद झाला असता. या शहरातील ज्या मूलभूत समस्या आहेत त्यात अधिक लक्ष देण्याची गरज होती.

**प्रश्न : बाळासाहेबांच्या काळातली शिवसेना तुम्ही पाहिली. त्यावेळी बंड करणाऱ्याला पळता भुई थोडी व्हायची. पण एवढे मोठे खिंडार पडले असताना शिवसेनेने लवकर शस्त्र खाली टाकलंय असं वाटतं का.**

**शरद पवार :** असं आहे, की तुम्ही म्हणता ही गोष्ट खरी आहे. यापूर्वी असं घडल्याच्यानंतर एक वेगळी स्थिती असायची. आज त्याला कदाचित कारण असं असेल म्हणजे मी समजतो तसं की मी मुख्यमंत्र्यांचं भाषण ऐकलं टीव्हीवर. त्या भाषणामध्ये त्यांनी कार्यकर्त्यांना एक आवाहन केलं, त्यामध्ये त्यांनी रस्त्यावर येऊ नका, कुठेही रक्तपात होऊ देऊ नका. शांततेने या प्रकाराकडे बघा असा आदेशवजा सल्ला त्यांनी दिला. त्यामुळं ही स्थिती असावी असं माझं मत आहे.

**प्रश्न : उद्या जर शिवसेनेच्या बाजूनं निकाल आला, तर सध्याच्या सरकारवर काय परिणाम होईल.**

**शरद पवार :** जर आणि तर...कोर्टाचा निकाल तर येऊ द्या. असं आहे, की या देशातील न्यायव्यवस्थेवर माझा विश्वास आहे. त्यावर आज मी काही भाष्य करू इच्छित नाही. न्यायालयाच्या काही गोष्टींचे निकाल चिंताजनक आहेत असे काही लोकांचे मत आहे. निष्णात वकील

कपिल सिब्बल यांनी न्यायालय ज्या पद्धतीने निर्णय घेतायत त्यातून आम्हाला धक्का बसतो, असे मत मांडले. याचा अर्थ प्रत्यक्ष न्यायालयीन क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे असे दिसते. पण त्याच्या खोलात जाऊन माझ्याकडे माहिती नाही.

**प्रश्न : महाराष्ट्रातील पक्षफुटीची लाट आता गोव्यातही दाखल होत असल्याची चिन्हे दिसत आहेत. त्याचा पुढे काय परिणाम होईल.**

**शरद पवार :** तुम्ही पत्रकार आहात, एवढ्या लवकर कसे विसरता. कर्नाटकात काय झालं, मध्य प्रदेशात काय झालं. महाराष्ट्रात घडलं. आता गोवा आपल्याजवळ आहे. त्यामुळं एक एक करत या सगळ्या गोष्टीवर कुठूनतरी लक्ष केंद्रीत करून एका वेगळ्या दिशेला आपण चाललेलो आहोत. या ज्या लोकशाहीच्या संस्था आहेत, त्या उद्ध्वस्त

आम्हाला असं काहीतरी प्रेम प्रकरण सुरू होतं असं समजलं.

**प्रश्न : राष्ट्रपतिपदाची निवडणूक एकतर्फी होणार असं दिसतंय. आपण जर रिंगणात असता तर यामध्ये रंग भरला असता का.**

**शरद पवार :** भाजप सोडून देशातील सर्व राजकीय पक्षांनी मला राष्ट्रपतिपदासाठी आग्रह केला होता. पण माझे व्यक्तिगत मत स्पष्ट होते, की ही जबाबदारी किंवा हे काम स्वीकारू नये. यात यश येण्याची स्थिती नव्हती. मात्र यदाकदाचित यश आले असते तर माझ्यासारख्या माणसाला अखंड एका ठिकाणी जाऊन बसणे, कुठेही बाहेर न जाणे, जास्तीत जास्त लोकांशी सुसंवाद न ठेवणे या सगळ्या गोष्टी त्रासदायक झाल्या असत्या. म्हणून त्यासाठी हा आपला रस्ता नाही हा विचार असल्याने त्यासाठी मी नाही म्हणून सांगितले.



करण्याच्यासंबंधीचं काम याच्यात असावं अशी वस्तुस्थिती दिसते. खरं म्हणजे गोवा इतकं जवळ होतं, पण इतका उशीर का लावला हे कळलं नाही.

**प्रश्न : महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षात आपल्याला अशा प्रकारच्या काही ऑफर्स होत्या का.**

**शरद पवार :** आम्हाला तर कुणाला असायचं कारणच नाही. सत्ता आपल्या हातातनं गेली म्हणून जे अस्वस्थ होते, असे काही लोक होते आणि त्यांची अस्वस्थता आता काही प्रमाणात दूर झाली असेल असं मी समजतो.

**प्रश्न : शिंदे आणि फडणवीस यांच्या रात्री भेटीगाठी होत होत्या, याविषयी आपल्याला काही माहिती होती का.**

**शरद पवार :** त्यांनीच स्वत: सांगितल्याच्यानंतर

**प्रश्न : उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री म्हणून आणि दुसऱ्या बाजूला पक्षप्रमुख म्हणूनही न्याय देता आला नाही, अशी शिवसैनिकांची भावना आहे. तुम्हाला काय वाटतं?**

**शरद पवार :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना त्यांच्या शारीरिक प्रश्नांमुळे कामात काही मर्यादा आल्या होत्या, ही गोष्ट खरी आहे. मात्र ते आजारी असताना सुद्धा राज्याची जबाबदारी आहे ही गोष्ट लक्षात घेऊन त्यांनी बैठका घेतल्या. पण याचा गाजावाजा कधीही केला नाही.


**प्रश्न : खरी शिवसेना कोणाची?**

**शरद पवार :** आता कोर्टच उद्या ठरवेल ना. शिवसेनेचा प्रश्न हा न्यायप्रविष्ट आहे. मीदेखील या संकटातून गेलो आहे. काँग्रेसचे विभाजन जेव्हा झाले तेव्हा अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी आमची

खूण बैलजोडी होती. त्यानंतर हात मिळाला. दुसरी काँग्रेस जी होती त्यांची खूण चरखा होती. पण शेवटी विभाजन झाल्यामुळे दोन भाग झाले. अशा गोष्टी राजकीय पक्षात होत असतात. याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग घेते. असा निर्णय शिवसेनेच्या बाबतीतही होईल अशी अपेक्षा आहे.

**प्रश्न : शिवसेना भाजपशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत आहे का. त्यांची युती होईल का?**

**शरद पवार :** माहिती नाही, ही माहिती कुठून आहे. माझ्या माहितीप्रमाणे अशी स्थिती कोणतीही नाही.




**प्रश्न : खाद्यपदार्थांवर पाच टक्के जीएसटी लावण्याचा विचार केंद्र सरकार करत आहे.**

**शरद पवार :** देशात अन्नधान्य व खाद्यपदार्थांवर पाच टक्के जीएसटी आकारण्यात येणार आहे. सामान्य माणसाला पुन्हा एकदा महागाईच्या संकटात लोटण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे. असे एकामागोमाग एक निर्णय घेतले जातात ही चिंताजनक बाब आहे. संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर विरोधकांकडून हा प्रश्न संसदेत उपस्थित केला जाईल.

**प्रश्न : ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटेल का.**

**शरद पवार :** ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटेल का यावर काही सांगता येत नाही. निवडणुका जाहीर केल्या आहेत. निवडणुका जाहीर केल्यानंतर काही निर्णय कुठपर्यंत घेता येतात याची शंका काही लोकांनी उपस्थित केली आहे. यावर आजचे राज्य सरकार कशा पद्धतीनं पावलं टाकतंय यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.

**प्रश्न : नव्या सरकारचे भवितव्य काय असेल.**

**शरद पवार :** दोन अडीच वर्षांत नवे सरकार कशा प्रकारे निर्णय घेतंय ते बघूया. कशा पद्धतीने निर्णय घेतात बघूया. सध्या तरी विरोधी पक्षांच्या लोकांनी एकत्र येऊन चर्चा केली तर सर्वप्रथम राष्ट्रपती निवडणुकीसाठी जास्तीत जास्त मतदान कसे मिळेल याची काळजी आम्ही घेत आहोत. त्यानंतर संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर अत्यावश्यक वस्तूंचा प्रश्न आक्रमकपणे मांडण्याचा प्रयत्न करून सरकारला यात फेरविचार करायला लावावा असा आग्रह आमच्याकडून धरला जाईल.

**प्रश्न : २०२४ मध्ये भाजपविरूद्ध लढण्यासाठी विरोधकांसमोर कोणते आव्हान असेल.**

**शरद पवार :** २०२४ मध्ये निवडणुका लढण्यासाठी राज्यांमधली जी सरकारे पाडली याचा अर्थ जाणीवपूर्वक केंद्राची सत्ता या कामासाठी वापरण्याचे चित्र बघायला मिळतंय. हे आमच्यासाठी आव्हानात्मक आहे.

**प्रश्न : पाऊस उशीरा आला. पेरण्या नुकत्याच झाल्या होत्या. अतिवृष्टीमुळे पिके वाहून गेलीत. सरकारचे लक्ष नाही असं वाटतंय का.**

**शरद पवार :** राज्यात मागील काही दिवसांपासून पाऊस सुरू झालाय. त्याआधी पाऊस नाही म्हणून चिंता होती. आता झालाय तर अतिवृष्टीमुळे काही भागात नुकसान झाले आहे. या सगळ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. आता नवे सरकार आले

आहे ते पुढील काही दिवसात काय करते ते बघूया. मंत्रिमंडळ तयार करायला उशीर होतोय कदाचित उद्याच्या निर्णयासाठी थांबले असावे अशी शक्यता आहे. दोन दिवसांत काहीतरी होईल. कोण नेमकी जबाबदारी घेतंय आणि कसे प्रश्न सोडवतात याकडे आमचे लक्ष राहील.

**प्रश्न : यावेळच्या पंढरपूरमधील महापुजेबाबत वेगवेगळ्या चर्चा होताना दिसतात.**

**शरद पवार :** मी स्वतः मुख्यमंत्री म्हणून आषाढी एकादशी महापूजेला चारवेळा गेलो आहे. राज्यातील सर्वसामान्य माणूस हा उन्हातान्हाचा, दगडाधोंड्याचा विचार न करता पंढरपूरला दर्शनासाठी जातो. त्याची नाळ त्यामध्ये आहे. त्यात कोणतीही चुकीची भूमिका नसते. पंढरीच्या पोटी त्याचे असलेले प्रेम त्याचा आदर राखला पाहिजे. त्यामुळे मी विचाराने वेगळा असलो तरी या वारकऱ्यांचा सन्मान ठेवायचा, त्यांच्या भावनेचा आदर करायचा त्यासाठी मी पूजेला गेलो आहे. मात्र त्याचे राजकारण केले नाही किंवा प्रसिद्धीही केली नाही.

**प्रश्न : राज्यपालनियुक्त १२ आमदारांच्या नियुक्तीचा निर्णय होणार का?**

**शरद पवार :** राज्यात आतापर्यंत जे सरकार होते त्याचे केंद्र सरकारसोबत अत्यंत प्रेमाचे संबंध होते. ते प्रेम अधिक फुलविण्यासाठी कोश्यारींसारखे व्यक्ती इथे ठेवण्यात आली होती. आता तो कालखंड संपला. आता नवे राज्य आले. शिंदेशाहीमध्ये राज्यपालांच्या बाबत केंद्र सरकार काय निकाल घेतंय हे पाहूया. आता राज्यपाल प्रलंबित १२ आमदारांच्या जागेवर निश्चित निर्णय घेतील. त्यांचा याविषयी संवाद सुरू आहे.

**प्रश्न : एकनाथ शिंदेंनी विधानसभेत पहिलं भाषण केलं. त्याविषयी काय वाटतं.**

**शरद पवार :** राज्यकर्ता जो होतो तो संपूर्ण राज्याचा मुख्यमंत्री असतो. तो कोणत्या एका पक्षाचा किंवा संघटनेचा नसतो. त्यामुळे राज्याचा प्रमुख म्हणून राज्याचा विकास आणि प्रश्न या गोष्टींवर चर्चा करावी किंवा मांडणी करावी, यावर लोकांना संबोधित करावे असा अनुभव आजवर होता. हल्ली नवीन मार्गदर्शन एखाद्या सूत्रांनी दिले असेल तर त्याच्याशी सुसंगत नवनियुक्त मुख्यमंत्री बोलत आहेत.

**प्रश्न : बेरोजगारी, महागाई हे मुद्दे सध्याच्या घडीला आहेत का.**

**शरद पवार :** हेच मुद्दे महत्त्वाचे आहेत. पण, दुर्दैवानं यावर कोणतीही प्रतिक्रिया येत नाही. ही अस्वस्थता आहे आमच्या मनात.



**ओबीसींच्या आरक्षणासंबंधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका निश्चित करण्यासाठी शरद पवार यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये राष्ट्रवादीच्या मंत्र्यांची बैठक घेतली.**

**प्रश्न : वयाच्या ८२व्या वर्षी आपण एवढे सक्रीय आहात, याविषयी लोकांमध्ये उत्सुकता आहे, की यामागे काय गमक आहे.**

**शरद पवार :** याचं कारण लोक. महाराष्ट्रातला सर्वसामान्य माणूस. मी अनेकदा गाडीनं प्रवास करतो मुद्दाम. गाडीनं येण्याचा फायदा असा असतो, की पिकं कशी आली आहेत हे बघता येतं. सरकारमध्ये असताना आपण अनेक निर्णय घेतलेले असतात. ते खालपर्यंत पोहोचले की नाही, हे समजतं. कुठेतरी लोक गाडी थांबवतात. निवेदनं देतात. त्या निवेदनात त्यांच्या काय यातना किंवा तक्रारी आहेत, त्या कळल्याच्यानंतर सत्तेचा सुद्धा आपण वापर चांगल्या भावनेनं केला तो खाली कितपत पोहोचलांय, याची जाण त्याच्यातनं येती. आणि म्हणून लोकांशी सुसंवाद हा राजकारणामध्ये



काम करणाऱ्या माणसानी ठेवला पाहिजे. आणि त्याच्यात दोन गोष्टी आहेत. एक दुरूस्त करायची संधी आणि आनंद, त्याच्यात आनंदही मिळतो. काही चांगल्या गोष्टी घडल्याचं पाहून. हे करणं मला आवडतं म्हणून याच्यात अधिक लक्ष घालतो.

**प्रश्न : संसद किंवा संसदेच्या बाहेर खासदारांच्या बोलण्यावर मर्यादा आणल्या आहेत. हे योग्य आहे का.**

**शरद पवार :** संसदेत नवीन स्टेटमेंट काढण्यात आले आहे. या स्टेटमेंटमुळे सभागृहाच्या बाहेर शांततेने आपले मत प्रदर्शित करण्याच्या किंवा निदर्शने करण्याच्या अधिकारावर बंदी आणली आहे. या गोष्टी सहन होणार नाहीत. एखाद्या प्रश्नावर मत मांडले, मागणी केली आणि ती सभागृहात मान्य झाली नाही तर अनेकवेळा लोक सभात्याग करतात. त्यानंतर संसदेबाहेर महात्मा गांधीजींच्या पुतळ्यासमोर शांततेच्या मार्गाने निदर्शने करतात. हा अधिकार त्यांना आहे. उद्या दिल्लीत विरोधी पक्षांची बैठक होणार आहे. त्यामुळे हा निर्णय घेताना कोणाशी चर्चा केली आहे? देशातील अन्य





राजकीय पक्षांमधील एकाही नेत्याला विश्वासात घेतले होते का? या सगळ्या गोष्टी आम्हाला उद्या मांडाव्या लागतील. आज जो निर्णय घेण्यात आला आहे त्यासंबंधीची एकत्रित दिशा उद्याच्या त्या बैठकीत ठरेल.

**प्रश्न : राज्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार लांबत**

**चालला आहे. त्याबद्दल काय सांगाल.**

**शरद पवार :** मागील १०-१२ दिवस राज्यात दोनजण सरकार चालवत आहेत आणि मंत्रिमंडळाची निर्मिती अद्याप झालेली नाही. इतके दिवस लागणे हे योग्य नाही. राज्यात अतिवृष्टी आणि अन्य प्रश्न लोकांपुढे असताना त्याबाबत निर्णय घेऊन कामाची जबाबदारी घेणारी जी मंत्रिमंडळाची




यंत्रणा आहे तीच राज्यात नाही. त्याला विलंब लागत असेल तर हे राज्यातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत नुकसानकारक आहे. नवीन सरकार आल्यानंतर नवीन काही केले असते तर त्यांचे मी अभिनंदन केले असते. परंतु पूर्वीच्या सरकारने घेतलेले एक-एक निर्णय रद्द करणे, यावरच आपण फार मोठं काम करतोय असे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे, जो राज्याच्या दृष्टीने चांगला नाही.

**प्रश्न : ओबीसी आरक्षणाचा निर्णय मार्गी लागेल का.**

**शरद पवार :** बांठिया समितीचा अहवाल आमच्या कोणाच्या हाती आलेला नाही. तो रीतसर बघून त्यानंतर त्यावर मते मांडावी लागतील. मात्र जर कुठे चुकीचे असेल, एखादा दृष्टिकोन त्यांनी योग्यरीतीने स्वीकारला नसेल आणि त्याचा ओबीसी समाजावर वाईट परिणाम होणार असेल तर फेरविचार करावा लागेल.

**प्रश्न : देशाच्या अर्थव्यवस्थेविषयी तुमचे मत.**

**शरद पवार :** देशाची अर्थव्यवस्था संकटात आहे. केंद्र सरकारची जबाबदारी आहे की देशाची अर्थव्यवस्था नीट कशी राहील हे पाहणे. त्या दृष्टीने योग्य पावले टाकली नाहीत ही विरोधकांची तक्रार आहे. रुपयाची होणारी घसरण पाहता विरोधकांची तक्रार योग्य होती. हा विषय संसदेमध्ये आम्ही आग्रहाने मांडणार आहोत.

**प्रश्न : चीनबरोबरचे संबंध सुधारत आहेत का.**

**शरद पवार :** चीनने भारताच्या काही भागात जवळपास आक्रमण केले आहे अशी अवस्था आहे. असे असतानाही आजच्या राज्यकर्त्यांनी या संबंधीची नेमकी भूमिका देशासमोर मांडलेली नाही.

काही ठिकाणी चीनने केलेल्या गोष्टींचे वास्तव चित्र केंद्र सरकारने काही लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये मी स्वत: व ए.के. अँटनी होते.याचे कारण आम्ही दोघेही एकेकाळी देशाचे संरक्षण मंत्री होतो. त्यामुळे माजी संरक्षण मंत्र्यांसमोर आजच्या संरक्षण मंत्र्यांनी कुठे आणि कधी आक्रमण होत आहे यासंबंधीचे चित्र मांडले. हा देशाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न असल्याने इथे आम्ही राजकारण आणू इच्छित नाही. देशाची इंचभर जमीन सुद्धा कुणाकडे जाता कामा नये. संपूर्ण देश एकसंध राहायला हवा ही आमची भूमिका आहे. ▪▪

## शरद पवार यांची नाशिक येथील पत्रकार परिषद

# आम्ही बांधलेली राजकीय बांधणी अजिबात विस्कळीत होणार नाही

"मध्यावधी निवडणुका होतील अशा चर्चेला उधाण आले असताना उद्या जरी निवडणुका लागल्या तर आम्ही तयार आहोत असे सांगतानाच निवडणुका होणार नसतील तरी राज्य एकंदर कोणत्या परिस्थितीत चाललं आहे त्यावर आम्ही बारकाईने लक्ष ठेवून आहोत. काही कमतरता आणि चुका असतील त्यासंबंधीची भूमिका त्या-त्या वेळी घेतली जाईल त्यामुळे आम्ही बांधलेली राजकीय बांधणी अजिबात विस्कळीत होणार नाही'', असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शरद पवार यांनी नाशिक येथील पत्रकार परिषदेत व्यक्त केला.



दरम्यान ज्यावेळी लोकांना कौल देण्याची संधी मिळेल त्यावेळी हे चित्र बदलेल असे स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले.

राज्यकर्त्यांनी प्राधान्य कशाला द्यायचे हा विचार करायला हवा. राज्यकर्त्यांनी संकटग्रस्त लोकांच्या वेदना जाणून घेण्याची आवश्यकता असते, मात्र आजच्या राज्यकर्त्यांचे प्राधान्य दुसरेच आहे असे मतही शरद पवार यांनी नोंदवले.

शरद पवार हे आज नाशिक दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार ज्या परिसरात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे, लोक संकटात आहेत अशा ठिकाणी दौरे करत आहेत. स्वागतासाठी, सत्कारासाठी विरोधी पक्ष नेत्यांचे दौरे नाहीत. यातून कोणी काय बोध घ्यायचा हा सर्वस्वी त्यांचा प्रश्न आहे, असा टोलाही शरद पवार यांनी लगावला.

ओबीसी आरक्षणाबाबतचा निर्णय हाती आल्याशिवाय भाष्य करणे योग्य नाही. परंतु प्रथमदर्शनी वाचनानंतर परिस्थिती चिंताजनक आहे. ओबीसी हा मोठा वर्ग या संबंध सत्तेच्या आणि प्रशासनाच्या बाहेर फेकला जाईल अशी चिंता शरद पवार यांनी व्यक्त केली.

आगामी निवडणुकांसंबंधीचे स्पष्ट चित्र समोर येण्याची गरज आहे. आमची इच्छा आहे की सहकारी पक्षांशी एकत्रित लढण्याच्या मुद्द्यावर चर्चा करावी, चर्चा करून एकत्रित लढण्याचा निर्णय झाला तर चांगले होईल, असेही शरद पवार म्हणाले.

नव्या सरकारच्या स्थापनेनंतर अजूनही खातेवाटप होत नाही, असा प्रश्न माध्यमांकडून विचारला असता, नव्या सरकारचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना ते काम समर्थपणे चालवू शकतील असा आत्मविश्वास आहे, त्यामुळे काम चालू आहे, असा टोलाही शरद पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारला लगावला.

दरम्यान, ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर ज्येष्ठ नेते छगन भुजबळ म्हणाले की, सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर आम्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली आहे. या निर्णयाविरोधात आम्ही रिव्ह्यू पिटिशन टाकू असे मला सांगण्यात आले आहे. ज्यामध्ये सुप्रीम कोर्टात भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि वकील मनवेंद्र सिंह नव्हते. त्यामुळे रिव्ह्यू पिटीशनच्यावेळी त्यांनाही घेऊन जा, अशी मागणी आम्ही केली आहे.




धुळे येथील इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ग्रंथालय व संशोधन मंडळाच्या कार्यालयाला शरद पवार यांनी भेट देऊन जुन्या दुर्मिळ ग्रंथांची व हस्तलिखितांची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत हेमंत टकले, अर्जुन टिळे, रविंद्र पगार व इतर मान्यवर.

यावेळी छगन भुजबळ यांनी राज्यकर्त्यांच्या कारभारावर बोट ठेवत विकासकामांवर आणलेल्या स्थगितीवरही आपले मत मांडले.

कोणीही सत्तेत आल्यावर आपल्या धोरणांनुसार निर्णय घेतात, यावर कोणताही आक्षेप नाही. पण जे प्रकल्प सुरु आहेत, जिथे कामे सुरु झाली, ज्याला मान्यता आहे, टेंडर काढले आहेत, त्या सगळ्या गोष्टी थांबणे म्हणजे प्रत्यक्ष या प्रकल्पांना विलंब लावण्यासारखे आहे. हे योग्य नसल्याचे छगन भुजबळ म्हणाले.

■■

# राज्यपालांच्या टोपीचा रंग व अंत:करणात फारसा फरक नाही

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याबद्दल काय बोलायचे हे सांगणे कठीण झालंय. याआधीही एकदा महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल भयानक स्टेटमेंट त्यांनी केलं. आताही त्यांनी वेगळ्या पद्धतीने पुनरावृत्ती केली. मुंबई आणि महाराष्ट्र बाकी जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या लोकांना घेऊन जाणारे राज्य आहे. इथे जी मुंबईची प्रगती झाली ती सर्वसामान्य माणसाच्या कष्टातून झाली, घामातून झाली. असे असताना अशा प्रकारची विधान करणे हे शहाणपणाचे लक्षण नाही. मी त्याच्या फार खोलात जात नाही, कारण राज्यपालांच्या डोक्यावर जी टोपी आहे, त्या टोपीचा रंग आणि त्यांचे अंत:करण त्याच्यात काही फारसा फरक दिसत नाही, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी राज्यपालांच्या मुंबईतील भाषणावर व्यक्त केली.



# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा

**अजित पवार यांची मागणी**



**विधानसभेचे विरोधी पक्ष नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मा. अजित पवार यांनी २५ जुलै रोजी मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन पत्रकार मित्रांशी संवाद साधला. यामध्ये त्यांनी राज्यातील सरकारला धारेवर धरताना अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करण्याची जोरदार मागणी केली. या पत्रकार परिषदेचा सविस्तर वृत्तांत....**

जनतेला, लोकांना काय तरी सांगावं या दृष्टीकोनातूनच मी तुम्हाला बोलावलेलं आहे. खरं तर आपल्याला सगळ्यांना माहिती आहे, की गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्रामध्ये, विशेषत: विदर्भ-मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर त्या ठिकाणी पाऊस पडतोय. पाऊस पडत असताना ताबडतोब राज्य सरकारनी, आज जे राज्याचे मुख्यमंत्री आहेत, उपमुख्यमंत्री आहेत, त्यांनी या अतिवृष्टी झालेल्या राज्यातील किंवा विदर्भ-मराठवाड्याबरोबरच इतर पण काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे रोपं जी भाताची होती, ती कुजून गेली. दुबार पेरणी करण्याची वेळ त्या ठिकाणी आली आहे. पण अशा सगळ्या गोष्टी होत असताना गेले काही दिवस मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचं, दोघांचंच मंत्रिमंडळ अस्तित्वात आलेलं असताना मंत्रिमंडळाचा विस्तार केला जात नाही, हा खरं तर महाराष्ट्रातल्या १३ कोटी जनतेचा अपमान आहे. तुम्हाला बहुमत आहे तर तुम्ही त्या ठिकाणी ताबडतोब मंत्रिमंडळ अस्तित्वात आणा. ते अस्तित्वात आणून आज आमचा जो शेतकरी त्रासून गेलेला आहे. तुम्हाला एक अधिकची माहिती देतो, की अतिवृष्टी सुरू झाल्यापासून कित्येक भागांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. त्या मराठवाड्यामध्ये पण पाहायला मिळतात विदर्भामध्ये पण पाहायला मिळत आहेत, इतर भागात पण पाहायला मिळतायंत. हे अतिशय या सरकारच्या दृष्टीने ती शरमेची बाब आहे. या शेतकऱ्यांना आणि त्या भागांमध्ये अडचणी मध्ये असणाऱ्या नागरिकांना, ग्रामस्थांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून ताबडतोब अधिवेशन बोलवलं पाहिजे.

खरं तर आपल्याला पावसाळी अधिवेशनात, आम्ही

लोकं सरकारमध्ये असताना उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली १८ तारखेला ठरलेलं होतं. परंतु काही राजकीय घडामोडी घडल्या. १८चं २५ला घेणार म्हणून सांगितलं होतं. म्हणजे आजच पंचवीस तारीख आहे. परंतु २५ ला घेतलं नाही. आता म्हणतात, की ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात घ्यायचे अशा बातम्या आहेत. मुख्यमंत्री पण दौऱ्यावर जाणार आहेत नाशिकमध्ये. मुख्यमंत्र्यांनी कुठे दौरा करावा हा त्यांचा वैयक्तिक अधिकार आहे. पण या सगळ्या महाराष्ट्रामध्ये अडचणीत असणाऱ्या माझ्या शेतकऱ्यांना, आमच्या तिथल्या ग्रामस्थांना, नागरिकांना, लोकप्रतिनिधींना, मग भलेही ते कुठल्याही पक्षाचे आमदार असुद्यात, फिरल्यानंतर, पाहणी केल्यानंतर जे काही निदर्शनास आले, पाहायला मिळाले ते मांडण्याचं महत्त्वाचं माध्यम म्हणजेच विधिमंडळ आहे. वेगवेगळ्या आयुधांचा वापर करून, आपले आपले प्रश्न तिथं मांडता येतात. परंतु हे सरकार मात्र अधिवेशनच घेत नाही. आता एवढे जर तुम्हाला बहुमत आहे तर अधिवेशन घ्यायला तुम्हाला कुणी अडवलंय. तुम्हाला मंत्रिमंडळाचा विस्तार करायला अडवलंय कुणी. याच्याबद्दलचं पण उत्तर त्यांनी दिले पाहिजे.

आपण जर बघितलं तर राज्यात झालेल्या नुकसानीची गंभीरता याकरता मी एक पत्र देखील तयार केलं. मधल्या काळामध्ये आम्ही सगळ्यांनी, त्याच्यामध्ये मी होतो, जयंत पाटील होते, हसन मुश्रीफ होते, धनंजय मुंडे होते, जितेंद्र आव्हाड होते, भुजबळ साहेब होते, आणखीन वळसे पाटील होते. ज्या दिवशी राष्ट्रपती महोदयांचं, उमेदवारांचे मतदान होतं त्याही वेळेस दोघांना भेटून लोकशाही मार्गाने विरोधी पक्षाच्या वतीने भूमिका मांडली आणि तातडीने लक्ष घाला म्हणून सांगितलं आणि आज पण मी मुख्यमंत्र्यांना विरोधी पक्षनेता या नात्याने आमच्याकडनं पत्र दिलेलं आहे, की विदर्भ-मराठवाडा आणि राज्याच्या इतर भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करा.



**अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पूरग्रस्त जनतेसाठी मदतीचे निवेदन दिले, यावेळी त्यांच्यासमवेत छगन भुजबळ, दत्तामामा भरणे, नितीन पवार, अनिल पाटील व सुनिल भुसारा हे आमदार होते.**

कारण ती गरज आहे. आज धरणाची परिस्थिती बऱ्यापैकी सुधारलेली आहे. पत्रकार मित्रांनो मी पण महाराष्ट्रामध्ये अनेक वर्ष सरकारमध्ये काम केले. विरोधी पक्षात काम केले. इतक्या जुलै महिन्यातच धरणाची पाण्याची परिस्थिती सुधारलेली कधी पाहायला मिळाली नाही. आपल्याकडे नेहमी ऑगस्टमध्ये परिस्थिती सुधारते. आज उजनी धरण, कधी जुलैमध्ये भरलं नव्हतं. ते ६५ टक्के झाले. उजनी धरण, वरसगाव, पानशेत, खडकवासला, टेमघर, चासकमान, भामा आसखेड धरण, ही सगळी धरणं त्याठिकाणी ओव्हरफ्लो होतील की काय अशा प्रकारची परिस्थिती, काही ओव्हरफ्लो झालीत. तीच गोष्ट तिकडच्या बाजूला देखील आमच्या कोयनेच्या वरच्या भागामध्ये पाऊस पडत असल्यामुळे, कोयनेचे पाणी तर वीज निर्मितीकरता आम्ही मागच्या वेळेस काढून घेतलं होतं. पाणी बरंच कमी केलेलं होतं. परंतु ती पण भर भरून निघाली. एवढे पाणी कोयनेच्या परिसरामध्ये त्या ठिकाणी आलेले आहे.

एक गोष्ट चांगली झाली. आमच्या चिपळूण, महाड या भागांमध्ये पाऊस पडल्यानंतर मोठ्या प्रमाणावर शहरे पाण्याखाली





जायची. मी तिथे आमचे शेखर निकम, आदिती तटकरे या सगळ्यांची संपर्क साधून, काही कार्यकर्त्यांशी संपर्क साधून त्यावेळेस मात्र नदीचा गाळ काढल्यामुळं पाण्याचा फुगवठा हा इतका वाढला नाही. आता राहिलेला पण जो गाळ आहे, तोही आपल्याला पावसाळा संपल्याच्यानंतर काढण्याच्याकरता आम्ही आग्रही भूमिका सरकारच्यासमोर मांडणार आहे आणि त्याची पण मागणी आम्ही करू. त्याचबरोबर हा जो काय पाऊस पडतोय, मी पण काही भागात पाहणी केलेली आहे. अजूनही काही भागामध्ये पाहणी करण्याच्याकरता मी आणि माझे सहकारी जाणार आहोत. सततच्या पावसामुळे पंचनामे अजूनपर्यंत होऊ शकले नाहीत. पूर्वीच या दोन्ही विभागांमध्ये शेतकरी अडचणीत आहे आणि त्यातून शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचा दिलासा मिळत नाही. त्याच्यावर तातडीने दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून ओला दुष्काळ जाहीर केला पाहिजे. त्याला तिथं मदत, या ठिकाणी दिली गेली पाहिजे आणि नेहमीचे एनडीआरएफचे जे नॉर्म्स आहेत, त्या नॉर्म्सप्रमाणे मदत करून चालणार नाही. मागे तोक्ते वादळ आलं, चक्रीवादळं किंवा वेगवेगळी निसर्ग चक्रीवादळ आलं किंवा मागे अशाच प्रकारची अतिवृष्टी, गेल्या वर्षी या काळामध्ये झाली त्यावेळेस जे काही नॉर्म्स आहेत ते बाजूला ठेवून त्याच्या अडीच पट, तिप्पट अशा पद्धतीने मदत त्यावेळच्या सरकारने त्या ठिकाणी केली आणि त्या अडचणीतल्या शेतकऱ्याला बाहेर काढण्याच्या करता पुढाकार घेतलेला होता. तशा पद्धतीने आज, आता दिल्लीला जाणं, आता ठीक आहे, दिल्लीला पण जाणं, राष्ट्रपती महोदयांचा काल शपथविधी होता, त्याच्यामुळं ती गोष्ट महत्त्वाची होती. त्याच्या आदल्या दिवशी मावळते राष्ट्रपती, त्यांची मुदत संपणार होती. त्यांचा काही कार्यक्रम ठेवलेला होता. त्याच्यामुळं प्रत्येक स्टेटच्यावतीने प्रमुख लोक जातात, त्याबद्दल दुमत नाही. परंतु हे होत असताना आपल्या भागातली जनता एवढ्या मोठ्या प्रमाणावर अडचणीत असताना आपण त्यांना मदत करायची नाही का.

नेहमी हे दोघे सांगतात की आम्ही आता असे करणार



वर्धा जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची अजित पवार पाहणी करताना शेजारी सलिल देशमुख,

आहे आणि तसं करणार आहे. आपल्या सगळ्यांच्या समोर मोठ्या प्रमाणावर प्रसंग आलेला आहे. त्या प्रसंगाचा कसा मुकाबला करायचा या संदर्भामध्ये तातडीने निर्णय घेऊन ताबडतोब अधिवेशन बोलावलं पाहिजे आणि त्याचबरोबर





ओला दुष्काळ देखील या निमित्तानं जाहीर केला पाहिजे. तसेच एक बातमी सातत्याने येतीय. तिरुपती देवस्थानच्या संदर्भामध्ये एक व्हिडिओ व्हायरल झालेला आहे आणि छत्रपती शिवरायांची प्रतिमा त्याच्याबद्दल, तिथं प्रवेश नाकारला त्याबद्दल राज्याच्या



संजय खोडके, रणजित कांबळे, समीर देशमुख, ॲड. सुधीर कोठारी, श्री. गमे

वतीने आपण मागे मिलिंद नार्वेकर यांचं नाव दिलेलं होतं. मी मिलिंद नार्वेकरांशी संपर्क साधला. त्यांच्या आईचं मध्ये दुःखद निधन झाले. त्याच्यामुळं तेरावा आज का उद्या आहे. ते आता त्याच्याबद्दलचं स्टेटमेंट करतील. मी म्हटलं, की ताबडतोब तुम्ही त्या बाकीच्या ट्रस्टींशी, कारण ते स्वतः ट्रस्टी आहेत. त्याच्यामध्ये कारण नसताना जनतेच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे आणि उभ्या महाराष्ट्राचं छत्रपती शिवाजी महाराज हे दैवत आहे. त्याच्यावर त्या दैवताच्या बद्दल कशा पद्धतीचे वक्तव्य किंवा बातम्या पसरवणे, पसरणे किंवा सोशल मीडियामध्ये वेगळ्या पद्धतीच्या बातम्या येणंदेखील चुकीचे आहे. आजच त्यांना मी सांगितलं आहे, की तुम्ही स्टेटमेंट करा. त्यांनी सांगितलं, की दादा, त्याच्यामध्ये कुठली पण अडचण नाही. मी सांगितलं, की तसं नको. भाविकांच्या भावना भडकवल्या जातायंत. लोकांना त्याच्याबद्दल माहिती नाही. आम्हाला पण विचारतायंत, की दादा नक्की तिथं काय झालेलं आहे. आपल्या मुख्यमंत्र्यांनी पण त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधून ताबडतोब असं तिथं काय घडलंय का आणि त्याबद्दल त्या सरकारची भूमिका काय आहे, हे सरकारच्या भूमिकेच्याबद्दल राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी पण तिथं संपर्क साधून जी काय चर्चा सुरू झालेली आहे त्याला कसा पायबंद बसेल आणि त्यातली वस्तुस्थिती महाराष्ट्रातल्या जनतेच्या समोर कशा पद्धतीने येईल याहीबद्दल त्या ठिकाणी ताबडतोब झालं पाहिजे.

तशाच पद्धतीने आपल्याला सगळ्यांना माहिती आहे की मधल्या काळामध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारला आणि ओबीसी आरक्षण, याच्याबद्दल अतिशय सकारात्मक निर्णय जो आम्हाला सगळ्यांना हवा होता. महाराष्ट्रातल्या जनतेला हवा होता. सरकारमध्ये आम्ही असताना आम्ही सगळेजण अतिशय सकारात्मक होतो. आम्ही विरोधकांना पण त्यावेळी विश्वासात घेतले आणि त्यातूनच बांठिया आयोगाचा आयोग नेमला गेला. त्यांचा अहवाल घेऊन ग्रामविकास खाते काम करत होतं, नगर विकास काम करते. मुख्यमंत्री, आम्ही सगळेजण भुजबळ साहेब, त्याच्यामध्ये



**चाकूर तालूक्यातील सुगाव, देवंग्रा, मुरंबी व लिंबाळवाडी आदि परीसरात दि. ३० जुलै २०२२ रोजी रात्री ७ ते ८.३० दरम्यान ढगफूटी सदृष्य मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या परिसरातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यासाठी व ढगफूटी पाऊसामुळे पडझड झालेल्या घरांचेही पंचनामे करण्यासाठी शासकीय यंत्रणेस आदेशीत करावे, असे निवेदन आमदार संजय बनसोडे व आमदार बाबासाहेब पाटील यांनी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना दिले.**

हसन मुश्रीफ, त्याच्यामध्ये धनंजय मुंडे, जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार सगळे जण त्यांना लागेल तेथे पूर्तता करण्याकरता काम करत होतो आणि हा सगळा जो आपण डाटा गोळा करत होतो, तो इम्पिरिकल डाटा आपण तिथे दिला आणि सुप्रीम कोर्टाने पण त्याही वर्गाला समाजात प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली पाहिजे. याच्यात सगळ्यांच्या प्रयत्नामुळे हे सगळं घडलेलं आहे आणि त्यातूनच ११ मार्चला या बांठिया, २०२२ मध्ये आपण या आयोगाची स्थापना केली. ७ जुलै २०२२ला अहवाल सादर त्या ठिकाणी केला. ३० जून २०२२ला त्याच्यात मध्ये शपथविधी झाला आणि २२ जुलैला सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. वास्तविक आता अशा प्रकारचा प्रसंग झाल्याच्यानंतर वेगवेगळे राजकीय पक्ष काही आमच्यामुळे घडलं असं सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. पण मागणी सर्वांचीच होती. सर्व राजकीय पक्षांची होती. सर्व लोकप्रतिनिधींची होती. यात आमचा कुणाचाही वाद नव्हता आणि म्हणूनच या सगळ्याला यश मिळावं व मध्य प्रदेशच्या धर्तीवर, त्याकरता आपण पण आपल्या अधिकाऱ्यांची टीम मध्यप्रदेशला पाठवलेली होती. तिथून पण माहिती आणली आणि याचे साक्षीदार स्वतः मुश्रीफ साहेब आहेत. कारण त्यांच्या विभागानी तर सर्वच्या सर्व जिल्ह्यातील माहिती गोळा करण्याचे काम, हे प्राधान्याने कुठे झालं तर ते पहिले ग्रामविकास खात्याकडे झालं आणि नंतर नगरविकास खात्यात. पण आपण करून घेतलं, प्रश्न मार्गी लागला त्याचं समाधान निश्चितपणे आम्हाला सगळ्यांना आहे.

त्याचबरोबर एकंदरीतच या सगळ्या गोष्टी होत असताना अलिकडं आपल्याला सगळ्यांना माहिती आहे, की सध्या अजूनही हवामान खात्याचा अंदाज तर असे चुकायला लागलेत, त्याच्याबद्दल सभागृहात आम्ही बोलू पण सांगितलेलं होतं चार दिवस रेड अलर्ट. कशाचा रेड अलर्ट. कुठे पाऊस पण पडेना, होतंय काय, त्यांनी रेड अलर्ट दिला की त्या त्या भागातले जिल्हाधिकारी हे शाळांना देतायंत सुट्ट्या. उदाहरणच द्यायचं झालं तर, पिंपरी-चिंचवडचं द्यायचं झालं तर दोन-तीन दिवस दिल्या सुट्ट्या. पाऊस पडला नाही. पालक पण चिंतेत आहेत. पालक म्हणतात, ते कोरोना होता त्यावेळेस व्यवस्थितपणे शाळा भरल्या गेल्या नाहीत आणि आता पाऊस येणार, पाऊस येणार, अतिवृष्टी होणार, रस्ते तुंबणार, पाणी तिथेच थांबणार आणि म्हणून सुट्ट्या द्यायच्या. हवामान खात्याच्याबद्दल, काय केंद्रांनी खर्च करायचा तो करावा, राज्यांनी काय खर्च करायचा तो करावा, त्याला आम्ही सगळे पाठिंबा देऊ. परंतु हवामान खात्याचा अंदाज अचूक मिळाला पाहिजे. पत्रकार मित्रांनो, आपण परदेशात जर कधी गेलो, लंडनला जर फिरत असताना ते सांगतात, की २५ तारखेला ४ वाजता पाऊस पडणार आहे. त्यावेळेस चारच्या दरम्यान जे बाहेर जातात ते छत्र्या घेऊन जातात. रेनकोट घेऊन जातात आणि तेव्हा पाऊसही पडतो.हे आपलं तर उलटंच झालंय. ते हवामान खात्याने सांगितलं

की ते पडतच नाही. अशा वेळी करायचं काय. म्हणजे त्यांना अपमानित करायची भावना माझी अजिबात नाही. पण ही वस्तुस्थिती आहे. कारण शाळांना सुट्ट्या देण्याचा अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांच्या हातात आपण ठेवतो. की बाबा असे काही प्रसंग असतात की त्यांना काही अधिकार ठेवण्याची गरज असते. सरकारच्यावतीन तो निर्णय आपण दिलेला असतो आणि त्याच्या पद्धतीने केलेले.

एकंदरीतच आपण पाहत आहे. परंतु अजूनपर्यंत फक्त आणि फक्त एकनाथराव शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सर्वांनाच माहिती आहे की त्या दोघांना असं वाटते की आपण सरकार चालवत आहे, बरे बाकीचा त्रास नाही म्हणून त्यांचं चाललंय का, आणखीन काय चाललंय. वास्तविक डेमोक्रसीमध्ये अशा पद्धतीने वागून चालत नाही. कारण असे प्रसंग येतात, त्या वेळेस पालकमंत्र्यांची जबाबदारी फार महत्त्वाची असते. आम्ही अनेक जण, बीडचे पालकमंत्री, पुण्याचा पालक पालकमंत्री, नगरचा पालकमंत्री म्हणून काम केलेले. अशा पद्धतीने पालकमंत्री आढावा घेतात. स्वतः मंत्री आढावा घेत असताना यंत्रणेला कामाला लावायला सोपं जातं. बऱ्याच ठिकाणी लाईटचे खांब पडलेले आहेत. अनेक ठिकाणी ब्रिज वाहून गेलेत, रस्ते वाहून गेलेत, अक्षरशः दुर्दशा झालेली आणि त्याच्यात ज्या एकनाथ शिंदे यांनी आमच्या सगळ्यांच्या बरोबर सरकारमध्ये काम केले ते मागच्याच कामाला स्थगिती देण्याचा डंका सुरू केला आहे. असा डंका सुरू करायचं काहीच कारण नव्हतं. वास्तविक ही प्रक्रिया आहे. सरकार येत असतात, सरकार जात असतात आता हे दोघे आलेत, कायमचं सरकार आहे का, ताम्रपट घेऊन आलेत का काय. तेव्हा हेही पुढं कधी तरी जाणारच आहेत. यांनी त्याचा विचार करायचाय की नाही. २०१९-२०२१ पर्यंतचे त्या पद्धतीने हे बंद करणं, ते काम बंद करणं बरोबर नाही. विकासाचीच कामे आहेत. महाराष्ट्रातली कामं आहेत. ही काही वैयक्तिक कामे नाहीत. ही काय कोणाच्या दारातली किंवा घरातली कामं नव्हती. आणि हे सगळं करत असताना आम्ही छत्रपती संभाजी महाराजांच्याबद्दलचं वढूच्या परिसरामध्ये अतिशय चांगलं भव्यदिव्य स्मारक करण्याकरता २६५ कोटीचा आराखडा तयार केला. त्याचा निधीही रद्द झाला. राजश्री शाहू महाराजांच्याकरता त्या ठिकाणी निधी दिलेला होता. काही महाराष्ट्राची परंपरा, या थोर व्यक्ती होऊन गेलेल्या आहेत. आज सगळ्यांच्या भावना त्यांच्या एकंदरीत इतिहास जो काही त्यांनी महाराष्ट्राला दिला, त्याच्याबद्दल सगळ्यांच्या शौर्य गाजवणारा राजा म्हणून छत्रपती संभाजी महाराजांच्याकडे त्या ठिकाणी बघतो. स्वराज्य रक्षक म्हणून आपण त्यांच्याकडे बघतो आणि अशा पद्धतीने ते अष्टविनायक वगैरे, याचे अनेक महत्त्वाचे निर्णय हे खरे तर थांबायचं काहीच कारण नाही.

आम्ही मधी त्याकरता देखील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटलो आणि सांगितले की मुख्यमंत्री महोदय, उपमुख्यमंत्री महोदय असं खालच्या पातळीवरचं राजकारण महाराष्ट्रामध्ये कधीच झालं नव्हतं. हे ताबडतोब आपण त्याठिकाणी थांबवा तसंच सहकारातल्या निवडणुका. सहकारातल्या निवडणुकामध्ये पत्रकार मित्रांनो इतकी गंमत आहे, की काही जणांचा पंधरा तारखेपर्यंत प्रचार झाला, १७ला मतदान होतं आणि निवडणूक पुढे गेला आमच्या दिलीप वळसे-पाटील यांच्या कारखान्यात यांच्या नेतृत्वाखाली चालतो तो भीमाशंकर सहकारी साखर कारखाना, त्याठिकाणी चार उमेदवार होते, तीन उमेदवार निवडून द्यायचे. ती पण पुढे ढकलली. आम्ही त्यांना सांगितलं की ह्याच्या मध्ये तुम्ही घाईगडबडीत निर्णय घेतला आहे. निवडणूक प्रक्रिया चालू असणाऱ्या संस्थांच्या निवडणुका चालू ठेवा आणि प्रक्रिया चालू झाली नाही अशा मात्र निवडणुका तुम्हाला सप्टेंबरपर्यंत पुढे जायचे असेल तर आमची काही ना नाही, त्या पद्धतीने पुढे ढकलायला. कारण कधी कधी अशा प्रकारचे प्रसंग येतात.

आता आज पण आपल्या महाराष्ट्राच्या निवडणूक आयोगाची आज प्रेस आहे म्हणून कानावर आलेले. आता ते पण ओबीसीचा मुद्दा निकाली निघालेला असल्यामुळे काही भागांमध्ये मात्र प्रश्न येणार आहेत. साधारण नंदुरबारमध्ये येईल, गडचिरोलीमध्ये, जिथं ५० टक्केपेक्षा जास्त एसटीचं आरक्षण आहे, तिथं तर सुप्रीम कोर्टाच्या डायरेक्शन आहेत की तुम्हाला तिथे देता येणार नाही. कारण त्यांनी आरक्षणाची जी काय मर्यादा आहे ते ५० टक्केच टाकलेली आहे. जिथे २७%, टक्के आहे तिथं आपल्याला २३ टक्के देता येतील. आता होईलच सुप्रीम कोर्टाने सांगितल्यामुळे आणि आमची पण तशाच पद्धतीने मागणी आहे आणि या पद्धतीने एकंदरीत गोष्टी चाललेल्या आहेत. हे आपल्या सगळ्यांच्या लक्षात आणून द्यायच्या होत्या परंतु ताबडतोब अधिवेशन बोलावले पाहिजे आणि ओला दुष्काळ अशा ठिकाणी जाहीर झाला पाहिजे आणि त्या अडचणीतल्या माणसाला पुन्हा ताठ मानेने जगण्याचा करता जे काही त्यांना आर्थिक मदत पाहिजे असे असेल तर देण्याची गरज असेल, बियाणे देण्याची गरज असेल, रोपं देण्याची गरज असेल, ते पण कृषी विभागानं ताबडतोब त्या ठिकाणी केलं पाहिजे. सरकारने ताबडतोब केले पाहिजे.

**प्रश्न : आमदारांबाबतचे प्रकरण कोर्टामध्ये प्रलंबित असल्यामुळं की राजकीय कारणामुळं मंत्रिमंडळ विस्तार लांबला आहे.**

**अजित पवार :** तसं काही वाटत नाही. यांच्या दोघांच्या हातात जास्त काही दिसतच नाही यांना दिल्ली मध्ये जाऊन तिकडनं जोपर्यंत हिरवा झेंडा मिळत नाही तोपर्यंत हे काही करू

शकत नाही असं साधारण चित्र दिसतंय

**प्रश्न : चंद्रकांत पाटील म्हणतात, की मनावर दगड ठेऊन एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री बनवले.**

**अजित पवार :** आता कशावर दगड ठेवला ते त्यांचे त्यांनाच माहिती आहे. फक्त मी आज त्या विषयावर जास्त बोलत नाही. कारण त्यांच्या आईंचं दुःखद निधन झालंय, मी त्याच्याबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही सगळेजण त्यांच्या दुःखामध्ये सहभागी आहोत. मी त्याच्याबद्दल थोडे दिवस जाऊद्या किंवा सभागृहात सांगतो, की कुठे दगड ठेवला, कुठे धोंडा ठेवलं ते.

**प्रश्न : बबन दादा शिंदे आणि राजन पाटील यांनी दिल्लीत मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याची बातमी आहे.**

**अजित पवार :** आत्ता बातमी तुम्ही सगळ्यांनी चालवली. आमची इथं एक मिटींग चालू असतानाच बबन दादांचा फोन आला या संदर्भामध्ये जयंत पाटील साहेबांना, की काही कामाच्या संदर्भात आम्ही दिल्लीत भेटायला आलो होतो. बबन दादांचे साखर कारखाने आहेत. त्या कारखान्यांबाबत किंवा इतर महत्वाची कामं असतात आणि अनेकदा पत्रकार मित्रांनो मी पण उपमुख्यमंत्री होतो मला पण मी मंत्रालयात असताना एखाद्या काही खासदार व भाजपचे खासदार भाजपचे आमदार येते पण खूप जण भेटायचे शेवटी कुणी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री झाले तर ते राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री असतात त्यामुळे लोकप्रतिनिधी या नात्याने काम करत असताना आम्ही पण भेटायला जातो मग आम्ही काय भेटायला गेलोतर काय झालं का सगळं. तो कामाचा भाग होता.

**प्रश्न : गडकरी म्हणतायंत, की आता राजकारण कुठंतरी सत्ताकारण झालंय.**

**अजित पवार :** आता गडकरी साहेब, त्यांच्यासारखी व्यक्ती, ते भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. त्यांचं काम मंत्री म्हणून खासदारांच्या मध्ये खूप ते लोकप्रिय आहेत. त्यांचा अनुभव फार मोठा आहे. त्यांच्यावर, त्यांच्या मनामध्ये अशा प्रकारची भावना येते आणि सत्ताधारी पक्षात असताना ती येते हे सगळ्यांनी महाराष्ट्रातल्या जनतेला देशातील जनतेने विचार करण्याची बाब आहे. आता ते त्याच्याबद्दल बोलले आपण त्यांना विचारून घ्यायला कोण जबाबदार आहे. मी तर काय बोललेला नाही.

**प्रश्न : दादा, मागच्या सरकारच्या कामांना स्थगिती दिली जातेय. हा नवीन पायंडा पडतोय का.**

**अजित पवार :** हो शंभर टक्के. तातडीचे जे काही निर्णय असतात ना, ज्यावेळेस एकनाथराव शिंदे बाहेर गेले म्हणजे सुरतला नंतर गुवाहाटीला आणि नंतर गोव्याला, त्या काळातील शेवटची कॅबिनेट झाली त्याबाबत निर्णय स्थगित ठेवले तर आम्ही समजू शकतो की ते फेरआढावा घेता येतो आणि त्यांनी तो घेतला परंतु मागच्या काळातील म्हणजे डीपीडीसी मध्ये घेतलेली काम गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात घेतलेली कामं व्हाईट बुक मध्ये आलेली काम विधान सभेत बहुमताने मंजूर केलेली भूमिका मांडतात. विधिमंडळाने चे काही गोष्टी असतात त्या सगळ्याच्या नियमाच्या अधीन राहून त्याला मान्यता दिली होती आणि या गोष्टी थांबवल्या जातात ते अक्षरशः महाराष्ट्रामध्ये कदापि कधी घडले नव्हतं.

**प्रश्न : रोहित पवार यांनी सांगितलं, की २०२४च्या निवडणुकीसंदर्भात पवार साहेब आणि अजितदादा मार्गदर्शन करणार आहेत. त्यानुसार निर्णय घेतला जाईल.**

**अजित पवार :** आता मार्गदर्शन तर करणारच. मार्गदर्शन करणारे सांगतील ना कोणी कुठे कसे जायचे ते. मार्गदर्शन तर करणार एवढं तर त्यांनी सांगितलं आहे. मग मार्गदर्शन करताना आम्ही नेहमीच  तरुणांना संधी देण्याचे काम केलेलं आहे. तरुणांना वाव देण्याचा प्रयत्न केलेला आहे. उद्याच्याला २०२४ मध्ये काही अनुभवी आणि मोठ्या प्रमाणावर तरूण चेहरे देण्याचा प्रयत्न निश्चितपणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष करेल, ही एक प्रक्रिया प्रत्येक निवडणूकीतली असतेच

**प्रश्न : मंत्रिमंडळ विस्ताराबाबत तुम्ही राज्यपालांची भेट घेणार आहात का.**

**अजित पवार :** राज्यपालांची भेट घेतली तर ते सांगतील, की त्यांची यादी आली की मी लगेच त्यांना मंत्रिमंडळाची शपथ देतो. तरीदेखील म्हणजे आता अधिवेशनाच्या तोंडावर मी विरोधी पक्षनेता म्हणून भेटायला गेलो होतो आणि मी मागे अडीच वर्ष पण सरकारमध्ये होतो तेव्हा त्यांच्याकडे जायचो आणि आताही जाईन. शेवटी राज्यपाल हे सगळ्या राज्याचे आहेत.

**प्रश्न : राष्ट्रवादीमध्येही काही भूकंप घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

**अजित पवार :** हे बघा, मी आपल्या सगळ्यांना सांगतो आमच्यामध्ये काही भूकंप त्या ठिकाणी होणार नाही. आता भूकंप भूकंप करणाऱ्यांनी पहिल्यांदा आता राज्य ताब्यामध्ये घेतले तर ते व्यवस्थितपणे चालवा ना. समस्या आहेत त्या सोडवा ना. आता एवढे बहुमत, एकनाथराव शिंदे यांना घेऊन पण समाधान नाही झालं का. अजून भूक किती मोठी आहे ती तरी एकदा कळू द्या. सरकारमध्ये येण्यापुरती भूक होती ती आता भागवली. धोंडा, दगड छातीवर घेऊन कुठे ठेवला माहिती नाही. बरं मोठा दगड ठेवला नाही, नाहीतर जीवच गेला असता. म्हणजे झेपेल असाच दगड ठेवला.

**प्रश्न : आगामी काळात महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणुकांना सामोरे जाणार आहे का.**

**अजित पवार :** त्याबद्दलचा निर्णय आमच्या पक्षाचा पवार

साहेब सांगतील. काँग्रेसचा सोनियाजी सांगतील आणि शिवसेनेचा उद्धवजी सांगतील. या तिन्ही नेत्यांनी एकत्र येऊनच महाविकास आघाडी स्थापन केलेली होती. आम्ही आमचे नेते सांगतील तसं वागू. काँग्रेस काँग्रेस नेत्यांच्या बाबतीत सांगेल आणि शिवसेना उद्धवजींच्या सांगण्याप्रमाणे वागतील.



**प्रश्न : विधान परिषदेतील नेता निवडीसंदर्भात काय भूमिका आहे.**

**अजित पवार :** विधान परिषदेमध्ये साधारण पद्धत कशी असते, ज्या विरोधी पक्षाकडे सदस्य संख्या जास्त त्या पक्षाचा विरोधी पक्ष नेता होतो. मागच्या वेळेस आम्ही ४१ होतो आणि काँग्रेस ४२ होते त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे बाबासाहेब देशमुख, पंडित पाटील आणि धैर्यशील पाटील हे आमचे सहयोगी होते. नाही, आम्ही एकत्रपणे निवडणुकीला सामोरे गेलो होतो आणि शेतकरी कामगार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस त्यावेळी भाजप शिवसेनेच्या विरोधात लढली होती आणि आम्ही एकत्रपणे निवडणुकीला सामोरं जाऊन आमची निवडणूकपूर्व आघाडी होती तरी ४४ संख्यांचे पत्र सभापतींना दिलं. ते म्हणाले, की नाही सिंगल लार्जेस्ट पार्टीला दिलं पाहिजे. मग त्यानंतर काँग्रेसनं राधाकृष्ण विखे पाटलांना विरोधी पक्ष नेते केलेलं पाहिलं. वरच्या सभागृहामध्ये तिथं आमच्या पक्षाकडे आमदारांची संख्या जास्त होती, तिथं आम्ही धनंजय मुंडेंना विरोधी पक्ष नेते केलेलं होतं. अशा पद्धतीने आता तिथं सदस्य संख्या शिवसेनेची १२ आहे. काँग्रेसची दहा आणि राष्ट्रवादीची दहा आहे. पण कपिल पाटील, बाळासाहेब पाटलांनी आणि शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील या तिघांचा पाठिंबा जर राष्ट्रवादीला मिळाला तर राष्ट्रवादीची संख्या तेरा होऊ शकते. पण साधारण तुम्ही पार्लमेंटमध्ये पण बघितलं, की जेवढी संख्या विरोधी पक्ष नेता होण्याकरता तुमच्या खासदारांची लागते, तिथं तेवढी नाही म्हणून कुणाला मागच्याही पाच वर्षात दिलं नव्हतं आणि आताही दिलं नव्हतं. आपल्या इथं २९च्यापेक्षा जास्त संख्या लागते. आम्ही तर सगळे मिळून ५३ आहोत. आणि दोन आमचे संजय मामा शिंदे आणि देवेंद्र भुयार हे आमच्याबरोबरच आहेत. असे आम्ही ५५ आहोत.

**प्रश्न : महाविकास आघाडी सरकारच्या काळात अजितदादांनी आम्हाला निधी दिला नाही, असं शिवसेनेतील बंडखोर आमदार सांगत आहेत.**

**अजित पवार :** आता त्याच्याबद्दल सभागृहामध्ये यादी वाचून दाखवली सारखं तेच तेच तेच जुन्या कढीला ऊत आणण्याचा कशाला काम करताय. यामध्ये आपल्याला सगळ्यांना. पत्रकार मित्रांनो, माहिती कोणीही अर्थमंत्री राज्याचा असला, तरी अर्थसंकल्प तो सादर करतो. त्याला मान्यता कॅबिनेट देते. त्याच्याबद्दल कुठल्या एकंदरीत तुमच्याकडे किती पैसे जमा होणार आहेत, किती खर्च करायचा हे संपूर्ण ताळमेळ त्याच्यात. आता सरकार म्हणून मुख्यमंत्र्यांची सही असते त्याच्यावर. वेगवेगळ्या विभागाचे मंत्री आम्हाला, अर्थमंत्र्यांना येऊन भेटतात. त्यांना प्लॅन साईज दिलेली असते. त्याच्या काही परसेंटेज सामाजिक न्यायला पैसे दिले जातात बारा टक्के की अकरा पॉइंटवर काही टक्के आणि ९ पॉइंटवर काही टक्के पैसे आपण आदिवासीला देतो ही वस्तुस्थिती आहे आणि त्यांच्या मंत्र्यांना आणि मग निधी जातो. आता काय नाचता येईना अंगण वाकडं त्याच्यातला हा प्रकार झाला.

दुसरं एक तुम्हाला मला सांगायचं होतं, पाठीमागच्या काळामध्ये आम्ही सगळ्यांनी मागणी केली होती की जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी लावू नका. पाच टक्के परंतु उशिरा सुचलेलं शहाणपण अशा पद्धतीने त्यांनी पाच टक्के जीएसटी कमी केलाय. पण कशावर केलाय. किरकोळ धान्य, सुटं धान्य घेणाऱ्याला. आता आम्ही सगळे तीन-चार जण दुकानात एका गेलो आणि आता मी सुटा गहू घेतला, यांनी सुटी ज्वारी घेतली आणि यांनी पॅकिंग केलेलं पाच किलोचं घेतलं आणि त्यांनी पॅकिंग केलेलं सात किलोचं घेतलं, कोण हिशोब ठेवणार आहे, की पॅकिंग केलेलं आहे, का सुट्टं आहे. वास्तविक जीवनावश्यक वस्तू, पॅकिंगमध्ये असू किंवा कसेही असू दे, त्याबद्दल खरं तर संपूर्ण जीएसटी काढला गेला पाहिजे, आम्ही आमच्या खासदारांना, सुप्रिया सुळे, आमचे डॉ. अमोल कोल्हे, आमचे सुनील तटकरे आणि श्रीनिवास पाटील यांना सगळ्यांना सांगितले की तुम्ही अशा पद्धतीने तिथं मागणी करा आणि आज तुम्ही पहा दुग्धजन्य, दुधावर प्रक्रिया करून, म्हणजे चितळे असतील, वारणा असेल, अमूल असेल, गोकुळ असेल हे सगळे जण जे बायप्रोडक्ट तयार करतात त्याला पाच टक्के जीएसटी लावल्यामुळे ह्या सगळ्याच्या किमती वाढल्यात. सगळ्यांचे किमती वाढल्या म्हणजे एकीकडे महागाई प्रचंड वाढत चाललेली आहे आणि केंद्र सरकार मात्र गरिबाला मदत होणार आहे, मध्यमवर्गीयाला मदत होणार आहे अशाच ठिकाणी जीएसटी मात्र लावतंय हे दुर्दैव आहे. ही गरिबांची थट्टा आहे. ही गरिबांची चेष्टा आहे. ही कुठेतरी थांबवा आणि महागाई कमी करा आणि सर्वसामान्य माणसाला नीटपणे जगता येईल अशा प्रकारची परिस्थिती ही केंद्रानं निर्माण करावी आणि तशा पद्धतीने जीएसटीवर देखील बंधनं आणावी.

■■

# संसदेचे महत्व नष्ट करण्याचा डाव?

अगस्त्य दास



संसदेत गेल्या काही अधिवेशनांपासून कोंडी निर्माण करण्याचे पध्दतशीर प्रयत्न होताना आढळतात. ही शंका येण्यासही काही कारणे आहेत. संसदेचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वीच विरोधी पक्षांना जाणीवपूर्वक डिवचणे आणि त्याचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षांनी संसदेत गोंधळ केला की पुन्हा तेच कामकाज चालू देत नसल्याचा ओरडा करायचा व त्यांना बदनाम करायचे अशी एक नवी कार्यशैली राज्यकर्त्यांनी आत्मसात केलेली आढळते. पावसाळी अधिवेशन त्याला अपवाद ठरले नाही. प्रथेप्रमाणे संसद अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक झाली. त्यामध्ये कोणकोणत्या विषयांना प्राधान्य द्यायचे ते ठरविण्यात आले. अधिवेशन प्रत्यक्षात सुरु झाल्यानंतर पंतप्रधानांनी नेहमीप्रमाणे सरकार सर्व विषयांवर चर्चा करण्यास तयार आहे ही रेकॉर्ड वाजवली. त्यांची री संसदीय कामकाज मंत्र्यांनी ओढली. प्रत्यक्षात, अधिवेशन सुरु झाल्यानंतर, 'नेमेचि येतो मग पावसाळा' प्रमाणे सभागृहात पहिल्या दिवसापासून गोंधळ सुरु झाला आणि त्यात पहिले दोन आठवडे तर पार धुऊन निघाले. महागाईच्या विषयाला प्राधान्य देऊन विरोधी पक्षांनी त्यावर चर्चेची मागणी केली.

सरकारच्या धोरणांवर ठपका ठेवण्याच्या हेतुने विरोधी पक्षांनी स्थगन प्रस्तावाच्या आधारे चर्चेची मागणी केली. त्या मागणीला दोन्ही सभागृहात कचऱ्याची टोपली दाखवण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षांनी गोंधळ घालणे अपेक्षितच होते. महागाईच्या विषयावर सर्वसाधारण चर्चा करा कारण त्यामध्ये सरकारवर ठपका ठेवण्याचा मुद्दा नसतो. केवळ सभागृहात सरकारवर टीका करणे यावरच विरोधी पक्षांना समाधान मानावे लागते. स्थगन प्रस्तावावरील चर्चेच्या अखेरीस संबंधित सदस्य मतविभागणीची मागणी करु शकतात. थोडक्यात केवळ 'चर्चा करुन विषय संपवा'(टॉक इट आऊट) एवढेच महत्व सरकार या ज्वलंत प्रश्नांना देऊ इच्छिते. त्यांच्या दृष्टीने बहुधा या लोकहिताच्या चर्चा म्हणजे एक निव्वळ उपचार राहिला आहे. सरकारची ही लबाडी बाहेर सर्वसामान्यांना कळून येत नाही आणि विरोधी पक्ष गोंधळ करुन कामकाज चालवू देत नसल्याबद्दल त्यांना बदनामीचेही धनी व्हावे लागते. त्यामुळे सरकार व सत्तापक्षाची ही लबाडी जनतेसमोर येणे महत्वाचे आहेच पण जनतेला देखील सरकारचा दुटप्पीपणा समजून घेण्याची वेळ आली आहे.

स्थगन प्रस्तावावर सरकारला चर्चा का नको असते ? याचे कारण त्या प्रस्तावाला संसदीय प्रक्रियेत विशेष महत्व व

प्राधान्य असते. स्थगन प्रस्ताव मान्य केल्यानंतर सभागृहाच्या विषयपत्रिकेवर त्या दिवशी असलेल्या विषयांवरील कामकाज तत्काळ थांबवून संबंधित विषयावरील चर्चा सुरु करावी लागते. यामध्ये अट अशी आहे की विषय हा ताजा आणि लोकहिताच्या दृष्टीने अतिमहत्वाचा असणे अनिवार्य असते. एखादा जुनापुराणा विषय उकरुन त्यावर स्थगन प्रस्तावाची सूचना देता येत नाही. महागाईचा विषय या व्याख्येत चपखल बसत असल्याने त्यावर स्थागन प्रस्तावाच्या आधारे चर्चा शक्य आहे. परंतु विरोधी पक्षांनी स्थगन प्रस्तावाच्या आधारे चर्चेच्या नोटिसा देऊनही दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी अज्ञात कारणांमुळे त्या सर्व नोटिसांना कचऱ्याची टोपली दाखवली. हे प्रथमच घडलेले नाही.

२०१४ पासून हा प्रकार सुरु झालेला आहे. सरकारकडे बहुमत असूनही स्थगन प्रस्तावाला तोंड देण्याचा भ्याडपणा या सरकारमध्ये का आहे हे अनाकलनीय आणि न उलगडलेले रहस्य आहे. या सरकारचे नेतृत्व जगातल्या सर्वशक्तिमान व महासामर्थ्यशाली नेत्याकडे आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकणारे त्यांचे द्वितीय क्रमांकाचे महापराक्रमी नेते व गृहमंत्री करीत असताना हे सरकार स्थगन प्रस्तावावर शेपूट का घालते याचा छडा लावण्याची गरज आहे. स्थगन प्रस्ताव नामंजूर करण्याची ही कृति म्हणजे संसदीय कोडगेपणाचा अत्युच्च नमूना आहे. अनेक विरोधी सदस्यांनी कंटाळून लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींना अनेक वेळेस स्थगन प्रस्तावाचा नियम संसदीय नियमावलीतून काढूनच का टाकत नाही अशी आगतिक पण संतप्त विचारणाही केली. जर या नियमाखाली विरोधी पक्षांना चर्चेची संधीच दिली जात नसेल तर त्या नियमाचा उपयोग काय असा उद्विग्न प्रश्नही त्यांनी उरपस्थित केला. पण त्यांना उत्तर मिळाले नाही. कदाचित संबंधितांची आगतिकता असावी. यापूर्वी किंवा अगदी पंतप्रधानसाहेबांच्या भाषेतच सांगायचे झाल्यास २०१४ पूर्वी म्हणजेच गेल्या सत्तर वर्षात असे प्रकार संसदेने कधीच अनुभवला नव्हता. संसदीय नोंदीनुसार लोकसभेत २०१४ पासून एकाही स्थगन प्रस्तावाला मान्यता देण्यात आली नाही. राज्यसभेत वेंकय्या नायडू हे सभापति झाल्यानंतर त्यांनी एकाही स्थगन प्रस्तावाला मान्यता दिली नाही. वर नमूद केल्याप्रमाणे या नकारात्मकतेची कारणे अनाकलनीय आहेत. २०१७ पर्यंत राज्यसभेचे संचालन हमीद अन्सारी करीत होते. त्यांनी कशीबशी दोन स्थगन प्रस्तावांना मंजुरी दिली होती. परंतु अन्सारी यांच्या विरुध्द वर्तमान राज्यकर्ते किती विखाराने बोलत असतात याचे अनेक दाखले आहेत.

थोडक्यात वर्तमान राज्यकर्त्यांच्या लेखी संसदेचे अस्तित्व केवळ त्यांना पाहिजे ते कायदे कसेबसे, गोंधळात, विरोधी पक्षांना न जुमानता मंजूर करवून घेणारी यंत्रणा एवढेच मर्यादित आहे. बाकी लोकमहत्वाच्या मुद्यांवर चर्चा नाही झाली तरी त्यांनी त्याची पर्वा नाही. ही त्यांची संसदीय बेपर्वाई लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. महागाईच्या मुद्यावर सोमवारी चर्चा झाली. पण सरकारला हवी तशी, म्हणजे फक्त चर्चा आणि भाषणे. विरोधी पक्ष अल्पमतात आहे म्हणून त्यांना साधी एका स्थगन प्रस्तावाद्वारे देखील चर्चेची संधी न देणे ही बहुमताची हुकुमशाही आहे. ही शुध्द दादागिरी आणि सत्तेने आलेला उद्दामपणा आहे. सरकारकडे पूर्ण बहुमत असताना त्यांना स्थगन प्रस्तावाला घाबरण्याचे कारण काय आहे, हे न उलगडलेले कोडे आहे. एकीकडे क्षुल्लकशा मुद्यावरही छात्या पिटणाऱ्या सरकारला हा भ्याडपणा का करावासा वाटतो याचे कारण न समजणारे आहे.




सध्या देशापुढे महागाईसारखे संकट उभे आहे. केवळ महागाईचा मुद्दा नसून त्याच्या अन्य कारणांचीही चर्चा संसदेने करण्याची गरज आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास घसरणाऱ्या रुपयाचे द्यावे लागेल. एका डॉलरला जवळपास ऐंशी रुपये मोजायला लागणे ही फारशी अभिमानाची बाब नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महागाईवरील चर्चेत भाग घेताना या मुद्याला स्पर्श करताना दिवंगत भाजप नेत्या सुषमा स्वराज जेव्हा विरोधी पक्षनेत्या होत्या तेव्हा त्यांनी 'रुपयाची किंमत घसरणे म्हणजे देशाची प्रतिष्ठा घसरण्यासारखे' असते असे तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांना सुनावले होते. पण सुषमा स्वराज यांच्यापुढे जाऊन तत्कालीन गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी मनमोहनसिंग यांच्या वयाचा उल्लेख करुन त्यांच्या वाढत्या वयानुसार रुपयाचा भाव घसरत चालला आहे अशी अत्यंत हीन, हलक्या व सवंग दर्ज्याची टिप्पणी करुन असंस्कृतपणाचा परिचय दिला होता. आता हे महोदय देशाचे पंतप्रधान असताना रुपयाची अभूतपूर्व घसरण झाल्यावर काय टिप्पणी करावी लागेल याची जाणीव त्यांना करून देण्याची आवश्यकता आहे. सांगण्याचा

मुद्दा हा की घसरणाऱ्या रुपयावर संसदेत गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे आणि वित्तीय व मुद्राविषयक धोरणातील दुरुस्त्यांवर विरोधी पक्षांच्या काही सूचना असतील तर त्यांची दखलही घेऊन सरकारने लोकशाहीतील समन्वय, सहकार्य व सामंजस्याची परिचय देण्यास हरकत नसावी. परंतु ही प्रक्रिया २०१४ पासून थांबलेली आहे. सरकारचे(ज्याला घटनात्मक भाषेत कार्यपालिका म्हणतात) महत्व व वरचष्मा अशा पध्दतीने वाढविण्यात आलेला आहे की त्यापुढे कायदेमंडळ म्हणजेच संसदेचे महत्व जवळपास नाकारण्यात आल्याचे चित्र दिसू लागले आहे. घटनेनुसार सरकार हे संसदेला जबाबदार असते पण प्रत्यक्षात सरकारने संसदेला वेठीस धरल्याचे चित्र आहे. सरकारने संसदेचे अस्तित्वच नगण्य करण्याचा जणू विडा उचलला आहे असे चित्र आहे.



गेल्या काही अधिवेशनातील परिपाठी पाहता पहिले दोन आठवडे हे गोंधळातच संपलेले आढळतात. विरोधी पक्षांनी महत्वाच्या लोकहिताच्या मुद्यांवर स्थगन प्रस्तावाच्या आधारे चर्चा मागायची आणि लोकसभा अध्यक्ष किंवा राज्यसभा सभापतींनी त्यास केराची टोपली दाखवायची आणि मग विरोधी पक्षांनी त्यावरुन गोंधळ घालायचा, कामकाज बंद पाडायचे, सरकारने सर्वसाधारण चर्चेचा निर्णय सभापति किंवा अध्यक्षांनी दिल्याचे सोयीस्करपणे सांगायचे आणि स्वतःची सुटका करुन घ्यायची. आठदहा दिवसांनी गोंधळ करुन करुन थकलेल्या विरोधी पक्षांना सर्वसाधारण चर्चेची मागणी मान्य करण्यास भाग पाडणे व मग विजयोन्मादी मुद्रेने सत्तापक्ष, सरकार चर्चेत सहभागी होऊन काहीबाही उत्तरे देऊन सहीसलामत सुटणे असा हा काहीसा प्रकार आहे. स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली आहेत, 'अमृतकाळ' म्हणून त्याला संबोधण्यात (खरे तर ढोंग) येत असताना संसदेच्या प्रतिष्ठेची घसरण व्हावी हा भारतासाठी दैवदुर्विलास आहे.

सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनावर नजर टाकल्यास वरील मुद्याचा प्रत्यय येईल. पहिला आठवडा विरोधी पक्षांच्या गोंधळात पार पडला. तर दुसऱ्या आठवड्यात काँग्रेसचे लोकसभेतील गटनेते अधीररंजन चौधरी यांनी राष्ट्रपति द्रौपदी मुर्मु यांना 'राष्ट्रपत्नी' म्हणून संबोधून वाद उत्पन्न केला. महागाईच्या मुद्यावर बचावात असलेल्या सरकारला आयते कोलीत चौधरी यांनी दिले. चौधरी यांनी पूर्वीही असेच गोंधळ करुन पक्षाला अडचणीत आणले आहे. लोकसभेसारख्या सर्वोच्च सभागृहात त्यांच्यासारख्या फारशी संसदीय पात्रता नसलेल्या सदस्याला गटनेता म्हणून नेमणे ही नेमणाऱ्यांची चूक आहे आणि किमान त्यांनी आता तरी ती सुधारावी ही अपेक्षा आहे. परंतु चौधरी यांनी तत्काळ याबाबत चूक कबूल करुन माफी मागितली. खरेतर विषय तेथे संपणे अपेक्षित होते. पण भाजपच्या सध्याच्या प्रभावळीतील एक महिलानेत्या व केंद्रीय मंत्री स्मृति इराणी यांनी महिलांच्या प्रतिष्ठेचा मुद्दा उपस्थित करुन अत्यंत मोठे अकाडतांडव केले. पार सोनिया गांधी यांनाही जाब विचारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या मुद्यावरुनही गोंधळ होऊन कामकाज चालू शकले नाही. अखेर सोमवारी ते सुरु झाले. कोंडीचे किंवा अनुदार उद्गाराचे असंख्य प्रसंग पूर्वी घडलेले आहेत. परंतु त्यावेळच्या नेत्यांनी प्रसंगावधान दाखवून वाद न वाढवता तो लगेचच कसा संपवायचा हे पाहिले होते. एकदा लालकृष्ण अडवानी यांनी युपीए सरकारचा उल्लेख 'इललेजिटिमेट गव्हर्नमेंट' म्हणजे अवैध सरकार असा केला. त्यावर सोनिया गांधी व इतर काँग्रेसनेत्यांनी तीव्र हरकत घेतल्यावर त्यांनी ते शब्द तत्काळ मागे घेऊन वाद तेथल्यातेथे मिटवला. तो वाढू दिला नाही. मनमोहनसिंग यांच्यावेळी मंत्री असलेल्या बेनीप्रसाद वर्मा यांनी वाजपेयींना उद्देशुन 'नीच आदमी अशी टिप्पणी केल्यावरही असाच गदारोळ झाला होता. त्यावेळी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी स्वतः उठून माफी मागितली व त्यावर पडदा पाडला. तर एकदा काँग्रेसचे सदस्य अवतारसिंग बढाना यांनी प्रमोद महाजनांना उद्देशुन बोलताना त्यांचा बाप काढला होता. त्यावर काँग्रेसचे नेते असलेल्या शिवराज पाटील यांनी तत्काळ उभे राहून माफी मागितली व पुढील गोंधळ टाळला.

ही उदाहरणे देण्याचे कारण एवढेच की सरकार व विरोधी पक्ष यांच्यात सामंजस्य, सलोखा, समन्वय, सहकार्य आणि

संवाद आवश्यक असतो. संसदीय लोकशाही व्यवस्थेचे ते सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. बोफोर्ससारख्या मुद्यावर विरोधी पक्ष संघर्ष करीत व त्यावेळीही गोंधळ, कामकाज बंद पाडण्याचे प्रकार होत. परंतु पीठासीन प्रमुख आणि सरकारतर्फे विरोधी पक्षांशी संवाद केला जात असे. ही परंपरा मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारपर्यंत चालू होती. त्यावेळी लोकसभेचे नेते असलेले प्रणव मुखर्जी हा संवाद व समन्वय करीत असत आणि संसदेचे कामकाज सुरळीतपणे चालत असे. वर्तमान सरकारमध्ये केवळ दोनच नेते सर्वेसर्वा असल्याने बाकीच्या मंत्र्यांच्या हातात कोणतेही अधिकार नसताना ते विरोधी पक्षांबरोबर कोणत्या अधिकाराने व कशाच्या आधारे संवाद साधणार हा प्रश्न विरोधी पक्षांपुढे असतो.

जे पंतप्रधान संसदेच्या उंबरठ्यावर डोके ठेवण्याचा



प्रकार करतात परंतु प्रत्यक्षात त्यांनी संसदेत एका प्रश्नालाही उत्तर दिलेले नाही. परराष्ट्रांचे दौरे करुन आल्यानंतर त्याबद्दलचे निवेदन संसदेला करण्याचा रिवाज असताना त्याचे पालन त्यांनी २०१४ पासून एकदा देखील केलेले नाही. याला संसदप्रेम किंवा संसदेचा सन्मान करणे म्हणत नाहीत तर संसदेला तुच्छ व कस्पटासमान लेखणे म्हणतात. महत्वाच्या विधेयकांची मंत्रालयांशी निगडित स्थायी संसदीय समित्यांच्या द्वारे निःपक्ष छाननी करण्याची पध्दत देखील या राजवटीत बंद करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ संसदेबद्दल फार प्रेम असल्याचे निव्वळ ढोंग रचले जात आहे.

स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने 'अमृतकाळ' म्हणून सर्वत्र टिमकी वाजवली जात आहे. परंतु संसदेच्या वाढत्या घसरणीबद्दल कुणी चिंता करताना आढळत नाही. संसदेचे अधिवेशन बोलाविण्याचा अधिकार सरकारचा असतो. त्यामुळे संसदेचे कामकाज सुरळीत चालविण्याची प्रथम जबाबदारी सरकार म्हणजेच सत्तापक्षावर असते. परंतु संसदेचे कामकाज सुरळीत चालविण्यासाठी विरोधी पक्षांचे म्हणणेही ऐकून घेणे, त्यांनाही संसदीय कामकाज सुरळीत चालविण्याच्या प्रक्रियेत सामावून घेणे अपेक्षित असते. परंतु उलट विरोधी पक्षांनी त्यांचे म्हणणे ऐकले जात नसल्याबद्दल निषेध केला आणि गोंधळ केला तर त्यांना निलंबित करण्याचा प्रकार सर्रास रूढ करण्यात आला आहे. म्हणजेच विरोधी पक्षांना सामावून घेणे दूर त्यांना संसदेबाहेर काढण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे आढळून येते. यासंदर्भातील माहितीनुसार २०१४ पूर्वीच्या तुलनेत सदस्यांना निलंबित करण्याचे प्रकार गेल्या आठ वर्षात(२०१४-२०२२) तिपटीने वाढल्याचे सांगण्यात येते. केवळ सरकारच्या निषेधाचे फलक सभागृहात दाखवले म्हणून सदस्यांना निलंबित करण्याचे प्रकार या अधिवेशनात घडले आहेत. सध्या सुरु असलेल्या गोंधळापेक्षा भयंकर गोंधळ संसदेने अनुभवलेला आहे परंतु अशा कठोर व टोकाच्या कारवाया सदस्यांविरुध्द कधीच करण्यात आल्या नाहीत. किरकोळ गुन्ह्याबद्दलही फाशीची शिक्षा देण्यासारखा हा प्रकार आहे आणि तो सध्याच्या संसदेत रूढ होताना दिसत आहे. असे सांगितले जाते की सध्याचे पंतप्रधान गुजरातचे मुख्यमंत्री असताना गुजरात विधानसभेत हीच युक्ति किंवा चलाखी अमलात आणली जात असे.

विरोधी पक्षांना कोणत्यातरी कारणावरुन अधिवेशनासाठी निलंबित करायचे आणि मग सरकारला पाहिजे ते कायदे संमत करणे आणि लोकशाही अधिकारांचा दुरुपयोग करण्याची संधी मिळवायची असे या कार्यपध्दतीचे स्वरुप होते. बहुधा ते 'गुजरात मॉडेल' आता राष्ट्रीय पातळीवर म्हणजे संसदेतही लागू करण्यात येत असावे. जाणीवपूर्वक, योजनाबध्द रीतीने संसदेच्या प्रतिष्ठेचे आणि स्थानाचे हनन करणे, तिचे महत्व खतम करणे हे प्रयत्न सुरु आहेत. अजुनही करोनाचे कारण सांगून माध्यमांच्या संसद प्रवेशावर मर्यादा घालण्यात आलेली आहे यावरुन सरकारला संसदीय कामकाज देखील जनतेसमोर पूर्णत्वाने व वास्तव पध्दतीने जनतेसमोर येऊ द्यायचे नाही हे स्पष्ट होते. ही वाटचाल एकचालकानुवर्तित्वाकडे आहे. अघोषित एकाधिकारवादी व्यवस्थेच्या दिशेने हा प्रवास आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातील ही बाब उबग आणणारी व उद्विग्न करणारी आहे.

■■

अनंत बागाईतकर

# जीएसटी खरंच झाला गब्बरसिंग टॅक्स?

‘गरीबांना बांधील असलेले सरकार’ अशा गगनभेदी घोषणा करणाऱ्या राज्यकर्त्यांनी या गरीबांवरच आघात केला आहे. जुलै महिन्याच्या प्रारंभीच झालेल्या ‘जीएसटी कॉन्सिल’ (वस्तु व सेवा कर परिषद)च्या बैठकीत गरीब व मध्यमवर्गीयांना थेट फटका बसेल अशा वस्तु व सेवांवरील जीएसटी करांमध्ये वाढ करण्यात आली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही घोषणा करताना सर्व राज्यांची या वाढीस मान्यता असल्याचा दावा केला. जीएसटी कौन्सिलमध्ये सर्व राज्यांचे अर्थमंत्री सदस्य आहेत. त्यांनी अद्याप या कर(दर)वाढीविरुध्द विरोधी मत नोंदविलेले नसल्याने त्यांनी हा दावा केला असावा. मात्र या परिषदेत निर्णायक अधिकार केंद्र सरकारचाच राहील अशी तिची रचना आहे. त्यामुळे महान अर्थशास्त्री असलेल्या अर्थमंत्र्यांचा वरील दावा कितपत खरा आहे याबाबत शंका राहणार आहेत. सर्वसामान्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तुंवरील कर सहा ते सात टक्क्यांनी वाढवताना पैलू पाडलेले हिरे आणि पॉलिश केलेले हिरे यांच्यावरील करात केवळ एक टक्क्याने वाढ करण्यात आली आहे. सर्वसामान्य लोक हिरे खरेदी करीत नाहीत व त्यामुळे या वाढीचा फटका त्यांना बसणार नाही. परंतु भारतातून हे हिरे निर्यात होतात व सरकारला त्याद्वारे परकी चलन मिळते. त्यामुळे हिरे निर्यातीला फटका बसू नये या हेतुने केवळ एक टक्का करवाढ करण्यात आली असावी. परंतु याचा अर्थ सर्वसामान्य लोकांवर कराचा बोजा वाढवणे हा होत नाही. त्यामुळेच या सरकारचा प्रभावी कल कोणत्या बाजुने आहे हे लक्षात यावे. हे सरकार ‘बड्या’ लोकांना खूष करणारे आहे. पुन्हा एकदा या राजवटीने व राज्यकर्त्यांनी त्यांचे सरकार



**जीएसटी कर प्रणाली २०१७ मध्ये सुरु करण्यात आली. जूनमध्ये त्यास पाच वर्षे पूर्ण झाली. जीएसटी प्रणाली लागू केल्यानंतर ज्या राज्यांचे महसुली नुकसान होणार होते त्या राज्यांना पाच वर्षांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय करण्यात आला होता. आता जून महिन्यात ही मुदत संपली आहे. त्यामुळे आतापर्यंत भरपाईची रक्कम मिळणाऱ्या राज्यांना येणाऱ्या आर्थिक वर्षात महसुल आघाडीवर नवे आव्हान उभे राहणार आहे. त्यामुळेच भरपाई योजना आणखी काही काळ सुरु ठेवावी अशी राज्यांनी मागणी केली होती. अपेक्षेप्रमाणे मोदी सरकारने ती मान्य केली नाही. याचे कारण राज्यांना केंद्र सरकारसमोर गुडघे टेकायला लावण्याची येणारी संधी ते हुकवू इच्छित नाही. जी राज्ये भरपाईसाठी पात्र होती त्या राज्यांना मोदी सरकारने भरपाईची रक्कम देताना भरपूर छळले होते.**



'सूटबूटवाल्यांसाठी' असल्याचे या निमित्ताने सिध्द करुन दाखवले आहे.

यासंदर्भातील काही पार्श्वभूमि लक्षात घेण्याचीही आवश्यकता आहे.जीएसटी किंवा वस्तु व सेवा-कर प्रणाली लागू होण्यापूर्वी त्यावर खूप ऊहापोह करण्यात आला होता. वर्तमान राज्यकर्त्यांचे सुरुवातीचे आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रह्मणियन यांना यासंदर्भात अहवाल तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी १५ ते साडेपंधरा टक्क्यांचा दर सुचविला होता. 'एक देश, एक बाजारपेठ आणि एक कर' ही जीएसटीची मूलभूत संकल्पना किंवा हेतु मानला जातो. मुळातच विशालकाय देशात वेगवेगळ्या करांची संख्या मोठी असल्याने आणि त्यातून करचुकवेगिरी आणि करव्यवस्थापनात येणाऱ्या प्रचंड अडचणी टाळणे आणि त्यातील गुंतागुंत दूर करुन एक सुटसुटीत व सर्वांना सोयीस्कर व सोपी अशी करप्रणाली स्थापित करणे हा जीएसटीमागील मूलभूत हेतु होता. परंतु ही प्रणाली सुरु करताना करांचे विविध दर कमी केले होते तरी त्यांची संख्या चार ते पाच होती. नंतर त्यात वाढही करण्यात आली. त्यामुळे करांची संख्या कमी करण्याच्या हेतुला सुरुवातीलाच सुरुंग लावला गेला. मधला मार्ग म्हणून काही तज्ज्ञांनी सुरुवातीस दोनच दर ठेवावेत आणि नंतर एकच दर कायम करण्यात यावा असे सुचवले होते. सरकारने करांचे चार दर हे टप्प्याटप्प्यांनी कमी करण्यात येतील अशी भूमिका घेतली आणि ही करप्रणाली लागू केली. त्यातून असंख्य अडचणी निर्माण झाल्या. घरगुती व लहान उद्योगधंदे व व्यवसाय धुळीस मिळाले. त्यातून अद्याप अर्थव्यवस्था सावरलेली नाही. या फेरबदलाचे समर्थन करताना सरकारने असे म्हटले आहे की एखादी वस्तु किंवा सेवा यांच्या विक्रीवरील कर हा संबंधित सेवा किंवा






वस्तुच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या अनिवार्य कच्च्या मालावरील(इनपुट कॉस्ट) हा कमी असेल तर हे फेरबदल अत्यावश्यक ठरतात. याला इंग्रजीत किंवा तांत्रिक भाषेत 'इन्व्हर्टेड ड्यूटी स्ट्रक्चर'









म्हणतात. तसेच महसुल किंवा प्राप्तीमध्ये घट होण्याचा कल आढळून आल्यासही या करविषयक दुरुस्त्या कराव्या लागतात असा सरकारचा दावा आहे. वरील पार्श्वभूमीवरच या फेरबदलांचा आढावा घ्यावा लागेल.

प्रथम गरीब व कनिष्ठ मध्यमवर्गीयांना कोणत्या वस्तु व सेवांमुळे फटका बसणार आहे हे पाहू. सर्वप्रथम एका मुद्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. आताच्या करवाढीत सुट्या स्वरुपात विक्री केल्या जाणाऱ्या वस्तुंना समाविष्ट करण्यात आलेले नाही. म्हणजेच तुम्ही कणीक(आटा), कोणतेही पीठ, साखर, तांदूळ अशा वस्तु सुट्या स्वरुपात खरेदी केल्यास त्यावर करवाढ लागू नसेल. मात्र पॅकबंद वस्तु घेतल्यास त्यावर आता पाच टक्के जीएसटी लागू होणार आहे. यामध्ये दूध, दही, पनीर यासारख्या वस्तुंचाही समावेश असेल. आधुनिकतेचा पुरस्कार करण्याची एकीकडे भाषा करताना दुसरीकडे सुट्या मालाच्या विक्रीला प्रोत्साहन देणे कोणत्या आधुनिकतेत बसते या प्रश्नाचे उत्तर राज्यकर्त्यांनी देणे आवश्यक आहे. हल्ली ग्रामीण भागात देखील दुकानदार त्यांच्या साठवणीसाठी तसेच ग्राहकांच्या सोयीसाठी देखील अर्धा किलो, एक किलो, पाच किलो अशा पध्दतीने दैनंदिन घरगुती आवश्यक वस्तुंची पाकिटे तयार करुन ठेवत असतात.

यामुळे भेसळीला आळा बसतो आणि ग्राहक व दुकानदार यांचीही सोय होते. आता जर ग्राहक जीएसटीची करवाढ वाचविण्यासाठी सुटा माल खरेदी करु लागल्यास दुकानदाराला पुन्हा एकदा वजनकाट्याकडे वळावे लागेल आणि त्यातून मोठी गैरसोय होणार आहे. त्याचप्रमाणे भेसळीला देखील प्रोत्साहन मिळणार आहे. त्यामुळे मोदी सरकार किती 'पुच्छगामि' आहे याचा हा एक नमूना किंवा पुरावा म्हणावा लागेल. प्रगती करताना कोणतेही सरकार भविष्याचा विचार करते पण येथे हे सरकार घड्याळाचे काटे मागे फिरवायला निघाले आहे. हा पाच टक्के जीएसटी आता आटा, गूळ, मुरमुरे, ऑर्गॅनिक फूड, कंपोस्ट खत, इलेक्ट्रिक वाहने यावर लागू होणार आहे. बारा टक्के करामुळे पर्यटकांना दणका बसलेला आहे. एक हजार रुपये किंवा त्याहून कमी भाडे असलेल्या हॉटेलांना आता बारा टक्के जीएसटी लागू झालेला आहे. सोलर किंवा सौर ऊर्जेवर पाणी गरम करणारे हीटर, चामड्याच्या वस्तु यावर हा बारा टक्के कर असेल. आता १८ टक्क्यांच्या वस्तु. यामध्ये एलईडी बल्बचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये

सरकारने प्रथम सवलती देऊन लोकांना या एलईडी बल्बची सवय लावली. आता बाजारात याच प्रकारचे बल्ब व दिवे मिळतात. लोकांना त्यासाठी पर्याय ठेवण्यात आलेला नाही आणि आता कोंडीत किंवा खिंडीत पकडल्याप्रमाणे या दिव्यावर १८ टक्के जीएसटी लादण्यात आला आहे. याला काय म्हणायचे? याखेरीज छपाई, लिहिण्याची शाई, चित्रकलेच्या वस्तु, टेट्रा पॅक यांचा समावेश आहे. आता सर्वात महत्वाचे. सेवांमध्ये रस्ते, पूल, रेल्वे, मेट्रो, सांडपाणी प्रक्रिया आणि शवदाहगृहे किंवा स्मशाने(क्रिमेटोरियम) बांधण्यासाठी जी कंत्राटे दिली जातात त्यावर १८ टक्के जीएसटी लावण्यात आला आहे. म्हणजेच या सरकारच्या काळात 'मरण देखील महाग' झाले आहे.

निर्मला सीतारामन या महान अर्थशास्त्री व अर्थमंत्री आहेत यात शंका नाही. वरील करवाढीत चमचे किंवा कटलरीसारख्या वस्तुंचाही समावेश आहे. पत्रकारांनी त्यांना या करवाढीमुळे चलनवाढ किंवा महागाईचा धोका संभवत नाही काय अशी विचारणा केली असता त्यांनी विलक्षण आत्मविश्वासाने सांगितले अगदी नगण्य किंवा किंचितशी म्हणजे एक टक्क्यांहून कमी महागाई वाढेल. त्याचे समर्थन करताना त्यांनी चमच्यांचे उदाहरण दिले. चमचे कुणी रोज खरेदी करीत नाही. ती कधीतरीच खरेदी केली जाणारी वस्तु आहे त्यामुळे त्याचा चलनवाढीवर किंवा महागाई वाढण्यावर कसा परिणाम होईल? आणि झालाच तर अगदी नगण्यच असेल! काय अर्थमंत्री आहेत! अर्थात त्यांनी चमच्यांचे दिलेले उदाहरण अगदी चपखल होते यात शंका नाही. आता दूध, पनीर, दही यासारख्या वस्तुंचे उदाहरण घेऊ. पिशव्यांमधील दूध, पॅकबंद दही आणि पनीर आता सार्वत्रिक आहेत. लस्सी, ताक देखील प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये किंवा टेट्रा पॅक मध्ये मिळते. आता या सर्व वस्तुंसाठी सर्वसामान्यांना जास्त पैसे मोजावे लागतील. विशेष म्हणजे टेट्रापॅक मध्ये मिळणारी लस्सी व ताक यासारखी आरोग्यकारक पेये देखील महागणार आहेत. त्यामुळे आरोग्यावर देखील मोदीसरकारने गदा आणलेली आहे. एकीकडे योगाच्या व आरोग्याच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे ते आरोग्य सांभाळणे सामान्यांना दुरापास्त करण्याचा हा प्रकार आहे. आता तुम्ही चेकबुक वापरता त्यावर देखील १८ टक्के कर लावण्यात आला आहे. याआधी त्यावर हा कर नव्हता. परंतु आता त्यावर थेट १८ टक्के कर लादण्यात आला आहे. हा फक्त सामान्य माणसाचा छळ आहे. पर्यटनाला प्रोत्साहन देण्याबद्दल खुद्द पंतप्रधानसाहेब आग्रही असतात. पर्यटन आणि आतिथ्य उद्योग-व्यवसाय यामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात. पण आता त्यावरही कुऱ्हाड चालविण्यात आली आहे. भारतात सर्वच पर्यटक तीन तारांकित किंवा पंचतारांकित हॉटेलात उतरत नाहीत. ते बचतीसाठी स्वस्त हॉटेले शोधून राहतात. आता त्यांना एक हजार रुपयांपर्यंतच्या हॉटेलांमध्ये राहण्यासाठी देखील बारा टक्के जीएसटी भरावा लागणार आहे. यामुळे पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल की फटका बसेल हे आता मोदींनी ठरवावे. छपाई, स्टेशनरी आणि चित्रकलेसाठी लागणाऱ्या वस्तु व साधने यावरही जीएसटी लावण्यात आला आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर व विशेषतः शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणार आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. या सर्वाचा सारांश एवढाच की सर्वसामान्य लोकांवर कराचा बोजा लादण्यात









आला आहे. आधीच आर्थिक संकटांनी ग्रस्त आणि महागाईने त्रस्त सामान्य माणसाचा खिसा मोदी सरकारने कापण्याचे काम केले आहे.

जीएसटी कर प्रणाली २०१७ मध्ये सुरु करण्यात आली. जूनमध्ये त्यास पाच वर्षे पूर्ण झाली. जीएसटी प्रणाली लागू केल्यानंतर ज्या राज्यांचे महसुली नुकसान होणार होते त्या राज्यांना पाच वर्षांपर्यंत नुकसान भरपाई देण्याचा निर्णय करण्यात आला होता. आता जून महिन्यात ही मुदत संपली आहे. त्यामुळे आतापर्यंत भरपाईची रक्कम मिळणाऱ्या राज्यांना येणाऱ्या आर्थिक वर्षात महसुल आघाडीवर नवे आव्हान उभे राहणार आहे. त्यामुळेच भरपाई योजना आणखी काही काळ सुरु ठेवावी अशी राज्यांनी मागणी केली होती. अपेक्षेप्रमाणे मोदी सरकारने ती मान्य केली नाही. याचे कारण राज्यांना केंद्र सरकारसमोर गुडघे टेकायला लावण्याची येणारी संधी ते हुकवू इच्छित नाही. जी राज्ये भरपाईसाठी पात्र होती त्या राज्यांना मोदी सरकारने भरपाईची रक्कम देताना भरपूर छळले होते. करोनाचे कारण पुढे करुन त्यांनी राज्यांना भरपाईची रक्कम कर्जातून घ्यावी असे सांगून राज्यांना कर्जबाजारी करण्याचा प्रकारही केला. जीएसटी प्रणालीचा वापर त्यांच्या 'हिटलिस्टवर' असलेल्या राज्यांच्या विरोधात करण्यासही वर्तमान राजवटीने मागेपुढे पाहिलेले नाही. विशेषतः सत्तापक्षाच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या राज्यांना धडा शिकविण्यासाठी देखील या हत्याराचा वापर करण्यात आला हे विसरुन चालणार नाही. यापुढे हे प्रकार अधिक कोडगेपणाने आणि बेलगाम पध्दतीने झाल्यास कुणाला आश्चर्य वाटू नये.

जीएसटी प्रणाली सुरु होताना चार दर निश्चित करण्यात आले होते. ५, १२, १८ आणि २८ टक्के. यानंतर वेळोवेळी व विविध कारणांमुळे या चार दरांच्या कक्षेत येणाऱ्या वस्तु व सेवांमध्ये फेरबदल करण्यात आले. या प्रणालीची सुरुवात व अंमलबजावणीच सदोष पध्दतीने झाल्यामुळे वार्षिक सुमारे ७० हजार कोटि रुपयांपर्यंत महसुली नुकसान झाले. ही दरवर्षीची कहाणी झाली. यामुळे राज्यांच्या अर्थव्यवस्थांची घसरण सुरु झाली. रिझर्व बँकेच्या अहवालानुसार पंजाब, बिहार, केरळ, राजस्थान आणि पश्चिम बंगाल ही कमाल आर्थिक तंगी असलेली राज्ये आहेत. या राज्यांनी तातडीने वित्तीय शिस्तीची पावले न उचलल्यास त्यांना गंभीर आर्थिक संकटाशी सामना करावा लागेल असा इशाराही देण्यात आला आहे. पंजाब, राजस्थान, केरळ, पश्चिम बंगाल, बिहार, आंध्र प्रदेश, झारखंड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश व हरयाणा ही राज्ये सर्वाधिक कर्जबाजारी राज्ये आहेत. ही राज्ये श्रीलंकेइतकी मोठी आहेत आणि त्यांच्या दिवाळखोरीमुळे देशाच्या एकंदर अर्थव्यवस्थेवर त्याचा कसा परिणाम होत असेल याची कल्पना केलेली बरी. करोना संकट आणि कल्याणकारी योजनांवरील वाढता खर्च व त्या प्रमाणात महसूल येण्याऐवजी त्यामध्ये मोठी घट झाल्याने राज्यांवर आणि केंद्र सरकारच्या तिजोऱ्यांवर ताण पडलेला आहे. त्याचप्रमाणे राज्यांना केंद्राकडून

मिळणाऱ्या अर्थसाह्यावर अवलंबुन राहणे व त्यात विलंब होणे यामुळेही आर्थिक तंगीला तोंड द्यावे लागत आहे. केंद्राने देखील वित्तीय तोंडमिळवणीसाठी कर्जे घेण्याचा सपाटा लावला आहे. त्यामुळे येणाऱ्या आर्थिक वर्षाअखेर केंद्र सरकारचा कर्जाचा बोजा ६२ ते ६५ टक्क्यांवर जाईल असे सांगण्यात येत आहे. याचा परिणाम वित्तीय तुटीवर होणार आहे. अर्थशास्त्रानुसार एखाद्या आर्थिक घडामोडीचा परिणाम केवळ त्या घडामोडीपुरता मर्यादित नसतो. त्याचे साखळी परिणाम असतात किंवा त्यामुळे होणाऱ्या परिणामांची एक शृंखला असते. उदाहरणार्थ पेट्रोल-डिझेलच्या







दरवाढीमुळे महागाई का वाढते ?
तर ज्या जीवनावश्यक वस्तु व मालाची ने-आण-वाहतूक रस्ते मार्गाने होते ती महागते व परिणामी संबंधित वस्तुंचीही दरवाढ होते. ही ती परिणाम किंवा आर्थिक दुष्परिणामांची मालिक असते. त्यामुळे देशाच्या महान अर्थमंत्र्यांनी या करवाढीचे कितीही समर्थन केले आणि यामुळे होणारे परिणाम नगण्य असल्याचा दावा केला असला तरी त्याचा परिणाम चलनवाढ व महागाईत होणार हे निश्चित आहे. त्याचा फटका सामान्य माणसांना बसणार हेही तेवढेच खरे आहे.

जीएसटी करप्रणालीतील दोष आणि त्रुटि या आता समोर येऊ लागल्या आहेत. ही प्रणाली संघराज्य व्यवस्थेशी मेळ खाणारी नाही असे स्पष्ट होऊ लागले आहे. याचे प्रमुख कारण ही प्रणाली ही केंद्रित स्वरुपाची आहे. वर्तमान राजवटीचे प्रयत्न केंद्र सरकारमध्ये अधिकाधिक अधिकार एकवटण्याचे आहे. त्यांचा कल सत्ता केंद्रीकरणाकडे अधिक





आहे आणि त्यांना ही जीएसटी प्रणाली त्यासाठी सोयीची आहे. याद्वारे त्यांनी आर्थिक अधिकारांचे केंद्रीकरण चालवले आहे. राज्यांना व विशेषतः राजकीयदृष्ट्या त्यांना अनुकूल नसलेली व म्हणजेच विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांना वेसण घालणे, त्यांना आर्थिक धाक दाखवणे

आणि केंद्राला धार्जिणे करण्यासाठी त्यांना भाग पाडणे हा या आर्थिक केंद्रीकरणाचा हेतु आहे. यामध्ये संघराज्य प्रणालीचा नाश होणे अटळ आहे. राज्ये स्वतःची स्वायत्तता घालवून बसणार आहेत. त्यामुळेच आता या जीएसटी प्रणालीचा पुन्हा नव्याने विचार करणे अटळ होणार आहे. राज्यांना स्वतःचे आर्थिक अधिकार, आर्थिक स्वायत्तता टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. दुर्दैवाने या भावी










संकटाबद्दल किती राज्ये सजग आणि जागरूक आहेत हे येणारा काळच सांगेल. भारताच्या विकासदराचे जे अंदाज केले जात आहेत त्यामध्ये विविध वित्तीय संस्था या कपात करताना आढळत आहेत. जागतिक बँकेच्या ताज्या अंदाजानुसार विकासदर केवळ ७.५ टक्के राहील असे भाकित करण्यात आले आहे. परंतु महागाई, चलनवाढ, भूराजनैतिक मुद्दे, रुपयाची घसरण आणि जागतिक पातळीवरील आर्थिक घडामोडी, महसूल व प्राप्तीमध्ये अपेक्षित वाढ नोंदली न जाणे अशी अनेक कारणे आहेत की ज्यामुळे आर्थिक आघाडीवरील घसरण थांबवणे हे अवघड झालेले आहे. जागतिक बँकेने आतापर्यंत तीनवेळेस भारताच्या विकासदराच्या आकडेवारीत बदल (कपात) केले आहेत. त्यामुळे वर्तमान आर्थिक वर्षाच्या उर्वरित काळातील आर्थिक घडामोडींनुसार त्यातही बदल केले जाणे अपेक्षित आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता आगामी काळ हा आर्थिक आव्हानांचा आणि राज्यकर्त्यांची कसोटी घेणारा असेल. जागतिक पातळीवरही आर्थिक उलथापालथ सुरु आहे. विशेषतः मुद्रा किंवा चलनांच्या आघाडीवर मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याचे परिणाम भारत आणि भारतीय चलन असलेला रुपयाही भोगत आहे. रुपयाची जी घसरण सुरु आहे तिची देशांतर्गत कारणे आहेत तशीच जागतिक पातळीवरची देखील आहेत. अमेरिकेत तेथील वित्तीय संस्थांनी व्याजदर वाढविल्याने आणि त्यामुळे डॉलरमधील परताव्याचे आकर्षण वाढल्याने भारतातील परकी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी आपली गुंतवणूक भारतातून काढून घेण्यास सुरुवात केलेली आहे. यामध्ये केवळ जून महिन्यात दोन लाख कोटि रुपयांची गुंतवणूक काढून घेण्यात आली आहे. यामुळे परकी चलनाचे संकट आगामी काळात उभे राहू शकेल काय असाही प्रश्न आता चर्चिला जाऊ लागला आहे. थोडक्यात, जीएसटी दरवाढ हे एकच संकट नसून अनेक आर्थिक संकटे पुढे उभी आहेत. जीएसटीने थेट सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. एकप्रकारे जीएसटी हा खरोखरच 'गब्बरसिंग टॅक्स' होऊ लागला आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही!

■■

**दिल्लीचे रुपडे बदलण्याच्या प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत पण त्याने या राजधानीचे चारित्र्य बदलणार नाही कारण यात कोणाला यश आले नाही, हा इतिहास आहे. इथे सत्तेत असलेल्यांना आपण कायमचे सत्तेत राहू, विरोधकांना नेस्तनाबूत करू ,त्यांना टाचे खाली दाबू असे आभास होत असतात. सत्तेत असताना सारे ऋतू वसंतऋतू सारखे वाटतात आणि सत्ता जाईपर्यंत ती जाणार नाही असेच वाटत असते. भाजप व तिचे सत्ताधारी २०१४ पासून याच मानसिकतेत वावरत आहेत. शिशुपालाचे शंभर अपराध अजून झाले नाहीत पण त्यामळे शासन-प्रशासन, कार्यपालिका- न्यायपालिका, संसद, प्रेस यांच्यापासून आपल्याला कोणताही धोका नाही,होणार नाही अशा भ्रमात राहण्याचा सत्ताधाऱ्यांना पूर्ण अधिकार आहे.**

घटनांनी वेग पकडला आहे.संसदेतील गतिरोध, सर्वोच्च नायायालयाचे काही ताजे निवाडे, महाराष्ट्रात सत्तांतरानंतर आलेले अस्थिरतेचे सावट,पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी सरकारला करण्यात आलेले टार्गेट,दिल्लीत अरविन्द केजरीवाल सरकारची केंद्राशी एकाकी लढत या मागचे सूत्रधार चलाखीने आपली खेळी खेळत आहेत. महागाई, बेरोजगारी, ढासळता रुपया यावर गांभीर्याने चर्चा करण्याची सरकारची तयारी नाही तर संसदेत मंत्री घोषणाबाजीत सामील झाल्याचे चित्र दिसते. संसद हे केवळ कायदेमंडळ नाही, तेथे बिलांची सर्वांगीण चर्चा होते.सत्ता कुणाला उत्तरदायी याचे दर्शन होते. निर्णय बहुमताने घेतले जात असले तरी विरोधी पक्षांना स्पेस असतो, दिला जातो. परंतु भाजपचा संसदीय प्रणालीवर किती विश्वास हे पाह्यचे असेल तर त्यांचे नेते, मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान यांच्यात आचरणात संसदीय स्पिरिट किती? हे सारा देश २०१४ पासून बघत आहे. संसदेचे कामकाज चालविण्याची मुख्य जबाबदारी सरकारची, पीठासीन अधीकाऱ्यांची






अधिकार आहे.

काँग्रेस संपली, प्रादेशिक पक्ष आपल्याच खिशात आहेत, ते जाऊन जाऊन जाणार कुठे? सक्तवसुली संचालनालय, केंद्रीय गुप्तचर खाते, प्रशासन यांनी नाड्या आवळल्या की ते कसे सरळ होतात या भावनेने सरकार चालले, सरकारी पक्ष चालला की समजा अपघात अटळ आहे. दिल्लीने १९७१ चे पाशवी बहुमत पाहिले, १९७७ ची




असते. पण विरोधकांना नामोहरम करण्यावर सारा जोर असेल तर संसदेची प्रतिष्ठा खालावते. त्यातून संघ --जनसंघ-- भाजप यांचे संसदीय प्रणालीवर काही आक्षेप राहिले आहेत.

दिल्लीचे रुपडे बदलण्याच्या प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत पण त्याने या राजधानीचे चारित्र्य बदलणार नाही कारण यात कोणाला यश आले नाही, हा इतिहास आहे. इथे सत्तेत असलेल्यांना आपण कायमचे सत्तेत राहू, विरोधकांना नेस्तनाबूत करू, त्यांना टाचे खाली दाबू असे आभास होत असतात. सत्तेत असताना सारे ऋतू वसंतऋतू सारखे वाटतात आणि सत्ता जाईपर्यंत ती जाणार नाही असेच वाटत असते. भाजप व तिचे सत्ताधारी २०१४ पासून याच मानसिकतेत वावरत आहेत. शिशुपालाचे शंभर अपराध अजून झाले नाहीत पण त्यामळे शासन-प्रशासन, कार्यपालिका- न्यायपालिका, संसद, प्रेस यांच्यापासून आपल्याला कोणताही धोका नाही,होणार नाही अशा भ्रमात राहण्याचा सत्ताधाऱ्यांना पूर्ण

# भाजपकडून प्रादेशिक पक्षांचा शिडीसारखा वापर

**व्यंकटेश केसरी**

# सत्तेत भाजप उन्मादी, विरोधात आक्रस्ताळी

सत्तेत असली की भाजप उन्मादी असते तर विरोधात असताना ती आक्रस्ताळी बनते. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची तिची प्रकृती नाही, मानसिकता नाही हा इतिहास आहे आणि वर्तमानही ! अटल बिहारी वाजपेयी हे अपवाद होते कारण त्यांची प्रकृतीच निराळी होती. त्यांनी आघाडीचे सरकार १९९८ ते २००४ पर्यंत चालविले याचे कारण भाजपची मजबूरी होती हे असले तरी ते त्यांच्या प्रकृतीला मानवणारे ही होते. वाजपेयी, लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्या बोलण्यात तर्क, इतिहास याचे दाखले असायचे, युक्तिवाद असायचा. . पण व्हाट्सएप,ट्विटरवर पोसलेल्या जोपासलेल्या, बळावलेल्या भाजपच्या नेतृत्वात हा भारदस्तपणा, ही शालीनता कुठून येणार? जवाहरलाल नेहरू यांचा द्वेष करता करता ते त्यांची नक्कल करत आहेत हे जगाला कळते. पण ते राजबिंडे होते. हे प्रसन्न व्यक्तिमत्व भाजप कुठून आणणार? नेहरूंच्या रागावर, लोभावर, निरागसतेवर लोकांनी प्रेम केले. पण यांनी कितीही सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस यांची तारीफ केली, प्रशंसा केली तरी ते ऋयांचे' होत नाहीत.. कारण त्यांचे गोत्र काँग्रेस आणि स्वातंत्र्य आंदोलन आहे. यांचे दुर्दैव असे की स्वातंत्र्यवीर सावरकर ही ऋयांचे' नाहीत, ते हिंदू महासभेचे आहेत. भाजप आयकॉन ची उसनवार किती काळ चालू ठेवणार? भाजपचा कोणीही मित्र असू शकत नाही.आणि जी शिवसेना दीर्घ काळ या पक्षाबरोबर राहिली तिच्या मुळावर हे आता उठले आहेत. लढाई सत्तेची नाही तर संपविण्याची आहे. आणि हे टोळीयुद्धात चालते. भाजपचे हे स्वरूप ओळखून बिजू जनता दलाच्या नवीन पटनाईक यांनी अगोदरच त्यांना टाटा केला, तृणमूल काँग्रेस विभक्त झाली, शिरोमणी अकाली दलाने तर संबंधच तोडले. भाजपचे नवे रूप , नवा दम, नवे नेतृत्व याला इतिहासात कोणते स्थान मिळेल हे आता पक्के झाले आहे. .









लाट पाहिली आणि १९८४ची सुनामीही पहिली पण ही तिन्ही सरकारे गडगडली, बदनाम झाली! त्या तुलनेत २०१४,२०१९ साली भाजपाला मिळालेले यश नगण्य आहे.पुलवामा झाला नसता तर ऋविश्वगुरुंना' एवढ्या जागाही जिंकता आल्या नसत्या.

राजधानी दिल्लीत वादळापूर्वीची चाहूल दिसू लागली आहे. समाजात अस्वस्थता आहे. निवडणुकांचे गणित जमले, विजय मिळाला तरी सरकार चालविणे सोपे नसते. आर्थिक प्रश्नांवर सरकार बचावात्मक आहे. केंद्र आणि राज्य सरकारे यांच्यात तणाव आहे. एकाच पक्षाचे केंद्रात आणि राज्यात सरकार असले तर विकास होतो हा भाजप नेत्यांचा, मंत्र्यांचा, मुख्यमंत्रांचा, पंतप्रधानाचा युक्तिवाद खरा मानला, विकासाचे "डबल इंजिन" खरे मानले तर होतो सरकार पक्षपाती आहे. दुसऱ्या पक्षांच्या राज्यातील सरकारांना मदत करत नाही हे सिद्ध होते. मंत्रिपदासाठी घेतलेल्या शपथेचा अवमान होतो. "तुमच्या पक्षातील इतके खासदार, आमदार आमच्या संपर्कात आहेत, ते पक्षांतर करतील," या विधानांनी पक्षांतरबंदी कायद्याची पत

चंद्रगुप्त-चाण्यक्यांनी महाराष्ट्रात विरोधी पक्ष फोडण्याची मोहीम हाती घेतली आहे. शिवसेना फोडली. तिच्या आमदारांना सुरत, गौहाती, गोव्याला नेले, सुरक्षा दिली. एवढे पर्यटन करण्यापेक्षा अशा बंडखोरांना श्रीनगर येथे का ठेवले नाही? तेथे साक्षात केंद्राचे सरकार आहे,लष्कर आहे, असे राजकीय नेते खाजगीत विचारतात. पण इतर पक्षांतून खोगीर भरती केल्यानंतर भाजप मध्ये सतरंज्या उचलणाऱ्यांना काय देणार? हा प्रश्न राहतोच. आणि हाच प्रश्न कर्नाटक, मध्य प्रदेशात भाजपला पोखरत आहे.

बिहार मध्य मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपला पर्याय खुला ठेवला आहे. ते, लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाच्या नजीक आहेत. बिहार विधान सभेच्या निवडणुकीत बाजपणे राम विलास पासवान यांच्या मुलाचा वापर करून नितीश कुमार यांच्या जनता दलाचे (युनिटेड) संख्याबळ घटविले, हे नितीश कुमार विसरले नाहीत. त्यांनी केंद्राशी अंतर ठेवायला सुरुवात केली आहे, मंत्री काढून घेतले. . . .

प्रादेशिक पक्षांचा शिडी सारखा वापर करायचा त्यांच्या



जाते. न्यायालयांनी नेते, मंत्र्यांच्या अशा विधानांची दाखल घेतल्यास त्यांना चाप लागेल. .

विरोधी पक्षात फाटाफूट असली,नेते विभागलेले असले तरी २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणूक एकतर्फी होतील असे कोणी छातीठोकपणे म्हणू शकत नाही. कारण राजकीय पक्षांतून पर्याय निर्माण झाला नाही तर लोकांतून पर्याय निर्माण होतात ,त्याचे स्वरूप वेगळे असते. राजस्थान,कर्नाटक, मध्य प्रदेश,दिल्ली काही प्रमाणात गुजरात भाजपत असंतोष आहे.प्रथापित नेत्यांना डावलून आपल्या होयबांना प्रमोट करणे आणि त्यांच्या मार्फत राज्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या भाजप श्रेष्ठींच्या धोरणाचा काहीही परिणाम होऊ शकतो. भाजपच्या

तात्कीवर मोठे व्हायचे व नंतर त्यांना फेकून द्यायचे हे भाजपचे अलिखीत धोरण आहे. महाराष्टात भाजपने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांचा शिवसेना संपविण्यासाठी वापर करण्याचे ठरविले आहे. आणि शिव सेना कमजोर झाली की एका क्षणाचाही विलंब न करता भाजप हाय कमांड एकनाथ शिंदे, राज ठाकरे यांना फेकून देतील. कारण त्यांना या दोघांना, त्यांच्या गटाला मोठे करायचे नाही .याच खेळीचा वापर करून संघ-जनसंघाने हिंदू महासभेला संपविले. हिंदू महासभा संघाच्या अगोदर जन्मली, नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यामंत्री असताना त्यांच्या काळात विश्व हिंदू परिषद गुजरातेत निष्क्रिय करण्यात आली.यामागचे धोरण एकच. हिंदू मतपेढीचे

# सत्तेची नशा- भाजप मोकाट- प्रादेशिक पक्षांचा उडणार चोळामोळा

**सत्तेची नशा चढल्यानंतर भाजप मोकाट सुटला आहे.हा सुवर्णकाळ पुढची ३० ते ४० वर्षे चालणार अशी भविष्यवाणी पक्षाचे 'चाणक्य' व केन्दिय गृहमंत्री अमित शहा यांनी काही आठवड्यांपूर्वी हैद्राबादेत केली तर त्याच्या एक पाऊल पुढे जाऊन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी प्रादेशिक पक्ष पाला पाचोळ्यासारखे उडणार असे चित्र पाटण्यात रंगविले ! सत्तेचा मद, सत्तेची मस्ती,सत्तेचा उन्माद चढल्यानंतर अशी भाषा तोंडात येते हे इतिहासात दिसते तर पुराणात अशा अनेक कथा आहेत. लोकशाहीत लोक सार्वभौम असतात, पक्ष नाही हे जर भाजपच्या "चाणक्य, चंद्रगुप्त, भरत" यांच्या डोक्यात शिरत नसेल तर १९८४ प्रमाणे "भाजप मुक्त भारत" व्हायला वेळ लागणार नाही. त्यावेळी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन, इस्राईलशी दोस्ती कामी येणार नाही. निवडणूक जिंकल्यानंतर सत्ताधारी पक्ष, सरकारचे काय हाल होतात हे श्रीलंकेत दिसून आले आहे. पण नशेत असलेल्यांना हे कसे कळणार?**

**घराणेशाहीवर नाक मुरडणाऱ्या भाजपचा इतिहासच घराण्यांवर उभारला आहे. इतर पक्षातून खोगीरभरती झालेले नव्या दमाचे "भक्त" पहिले तर संसद, विधी मंडळात कोणाची संख्या वाढतेय ते दिसते. आणि हे नवे बाडगे ज्यावेळी हिंदुत्व, पक्ष, शिस्त, याबद्दल बोलतात त्यावेळी त्यांची कीव येते. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेशात तर बाडगे, घराणेशाहींचा वारसा दिमाखात मिरवत असतात. भाजपची दुसरी, तिसरी फळी, पिढी अशा लोकांनीच भरली आहे. प्रादेशिक पक्षांच्या खांद्यावर बसून भाजप बिहार, हरियाणा, पंजाब, झारखंड, जम्मू-काश्मीर, गोव्यात सत्तेत आली. आणि महाराष्ट्रात या पक्षाने शिवसेनेला २०१४ पर्यंत घट्ट पकडून ठेवले होते. अटल बिहारी वाजपेयी सत्तेत आले प्रादेशिक पक्षांमुळे आणि "विश्वगुरुंना" अजूनही एन,डी, ए. टिकवावी वाटे, ते कशासाठी याचा खुलासा अमित शहा, नड्डा यांनी करावा. कारण चुरु चुरु बोलणाऱ्या भाजपच्या घोषित आणि अघोषित प्रवक्त्यांची बोलती यावर बंद झाली आहे.**

आम्हीच एकमेव ठेकेदार! संघांच्या स्वयंसेवकांपेक्षा भाजपच्या केंद्रीय नेत्यांचा, मोदी- शहांचा इतर पक्षातील फुटीर, बंडखोर यांच्यावर जादा विश्वास आहे हे आसाम, गोवा, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि आता महाराष्ट्रात होत असलेल्या बंडखोरीने सिद्ध झाले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दोन डझनाहून अधिक सदस्यांना निलंबित करण्यात आले. त्यांचा अपराध एवढाच महागाईच्या प्रश्नावर ते आक्रमक होते, संसदीय मर्यादा पाळली नाही. या प्रश्नावर नरेंद्र मोदी सरकारने विरोधी पक्षांना पाहिजे त्या नियमांतर्गत, खुलेपणाने चर्चा होऊ दिली असती




तर आकाश कोसळले नसते. सरकारकडे बहुमत आहे, विरोधी पक्षांना प्रत्युत्तर देणारे मंत्री, खासदार यांची कमतरताही नाही. मग भीती कशाची? जी एस टी आकारून सर्वसामान्याचा खिसा का कापला याचे समर्थन करणे अवघड होत असल्यानेच संसदेत गतिरोध निर्माण करण्यात आला, विरोधी पक्षांना, थकविले, दमविले की त्यांच्यातली आग क्षमते ही त्यामागचे सत्ताधाऱ्यांचे गणेत असेल तर त्यांची गफलत होत आहे. संसदेतील गतीरोध, सक्तवसुली संचालनालयाचे विरोधी पक्ष नेत्यांवर आवळणारे पाश, सूडबुद्धीचे राजकारण, प्रशासन-प्रसार माध्यमावर वाढणारे दडपण, "हम करे सो कायदा" ही वृत्ती यामुळे विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यात चेव निर्माण झाला तर पुढचे सगळे गणित बिघडते हा इतिहास फार जुना नाही.

विरोधी पक्ष विभागले आहेत, त्यांच्या काही नेत्यांच्या हट्टामुळे एकी होत नाही, भाजपला फावते असे आज चित्र असले तर ते स्थायी नाही. ते निवणुका हरले , आणखी हरतील पण भाजपाची वाढती ताकतच त्यांना एक करेल आणि हे चित्र २०२३ च्या अखेरीस दिसले तर आस्चर्य वाटणार नाही.

■■

Nanded City, Pune
The Maximum City
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

tempestadvertising.com

A project by MAGARPATTA CITY ©
The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

## जाता जाता

# असंसदीय शब्द व अभिव्यक्ती स्वातंत्र्य

**फिरस्ता**




संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरु होण्याच्या आधी संसदेतर्फे असंसदीय शब्दांबाबतची पुस्तिका प्रसिध्द करण्यात आली. ही पुस्तिका अशासाठी की मूळच्या असंसदीय संज्ञाकोषात याद्वारे भर टाकण्यात आली. या काही नवीन संज्ञा, शब्द, वाक्प्रचार होत्या ज्यांना असंसदीय मानून त्यांचा समावेश असंसदीय शब्द-संज्ञाकोषात करण्याचा निर्णय करण्यात आला. त्यावरुन गदारोळ होणे स्वाभाविक होते. अखेर घाईघाईत पत्रकार परिषद बोलावून लोकसभा अध्यक्षांनी, ''संसद सदस्यांच्या संसदेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कोणत्याही प्रकारे मर्यादा किंवा नियंत्रण घालण्यात आलेले नाही. एका नियमित प्रक्रियेचा भाग म्हणून ही पुस्तिका प्रसिध्द करण्यात आली आहे. यापूर्वीही अशा प्रकारे अनेक वेळेस असंसदीय शब्दकोषात नवीन शब्द व संज्ञांची भर टाकण्यात आलेली आहे. सभागृहाचे कामकाज शिष्टसंमत भाषेत व्हावे आणि सदस्यांकडून उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांमुळे अशिष्टता निर्माण होऊ नये ही यामागील अपेक्षा व भावना आहे. संसदसदस्य त्यांची मते स्पष्टपणे व्यक्त करु शकतात व त्यांच्या अभिव्यक्तीवर कोणत्याही प्रकारे मर्यादा घालण्यात आलेली नाही,'' असा खुलासा त्यांनी केला. काही शब्द व संज्ञांचा वापर अयोग्य असल्याने त्यांचा उपयोग सदस्यांनी करु नये अशी अपेक्षा आहे. सदस्यांनी या शब्दांचा किंवा संज्ञांचा त्यांच्या भाषणात वापर केला तरी सभागृहाच्या नोंदीतून त्या वगळण्याचे अधिकार पीठासीन प्रमुखांना असतात असेही त्यांनी स्पष्ट केले.

नव्या निर्णयानुसार नव्या असंसदीय शब्द व संज्ञा अशा - करप्ट(भ्रष्ट), बिट्रेड(विश्वासघात), जुमलाजीवि, अशेम्ड(लज्जास्पद), ॲब्यूज्ड(धमकावणी), ड्रामा(नाटक), हिपॉक्रिसी(ढोंगीपणा), इनकॉम्पिटन्ट(अकार्यक्षम), बालबुध्दी, कोविद स्प्रेडर(कोविद पसरवणारा), स्नूपगेट(पेगॅसस सारख्या सॉफ्टवेअरने लोकांवर हेरगिरी), अनार्किस्ट(अराजकवादी), शकुनी, डिक्टेटोरियल(हुकुमशाही वृत्ती), तानाशाह, तानाशाही,






जयचंद,विनाश पुरुष, खलिस्तानी, खून से खेती, दोहरा चरित्र(दुटप्पीपणा), निकम्मा, नौटंकी, ढिंडोरा पीटना, बेहरी सरकार (बहिरे सरकार), चेलाज(चेले) वगैरे वगैरे. यादी खूप लांब आहे. परंतु सदस्यांच्या भाषणातील जोरच नष्ट व्हावा अशा पध्दतीने वरील संज्ञांची निवड करुन त्यांना असंसदीय ठरविण्यात आले आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास अपमान, अहंकार, काला दिन किंवा काळा दिवस, खरीद-फरोख्त (खरेदी-विक्री) हे शब्द असंसदीय ठरविण्यामागे कोणती विद्वत्ता आहे हे कोडे आहे.

जेथे गोपनीयतेला किंवा शुध्द-सरळ भाषेत लपवाछपवीला अग्रक्रम मिळतो तेथेच पाणी मुरत असते. आता 'जुमलेबाजी' हा शब्द किंवा संज्ञा घ्या हा आला कोठून ? हा तर साक्षात द्वितीय पोलादी पुरुष उर्फ प्रति सरदार पटेल उर्फ केंद्रीय गृहमंत्र्यांच्या श्रीमुखातून आलेला शब्द आहे. २०१४ नंतर लोकांच्या खात्यात पंधरा लाख रुपयांचा भरणा होईल अशी घोषणा विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी केली होती. त्यावरुन त्यांच्यावर जेव्हा टीका होऊ लागली आणि चेष्टाही केली जाऊ लागली तेव्हा या द्वितीय क्रमांक नेत्यांनी आपले तोंड उघडले आणि 'तो एक चुनावी जुमला होता' असा खुलासा केला.

म्हणजे निवडणूक प्रचारातली ती एक चलाखी होती व लोकांना आकर्षित करण्यासाठी मारलेली ती एक लोणकढी थाप होती असे त्यांनी सांगितले. त्यावरुन मग ब्रह्मांडनायकांची आणखी चेष्टा सुरु झाली होती आणि लोकांनी त्यातून 'जुमलेबाज' हा शब्द तयार केला. 'फेकू', 'फेकूगिरि' या संज्ञाही लोकांनी रूढ केल्या. म्हणजेच राज्यकर्त्यांच्या आचरणावरुन लोकांनी तयार केलेले हे शब्द व संज्ञा आहेत. आता या संज्ञा सार्वत्रिक होऊन अंगाशी येऊ लागल्यानंतर राज्यकर्त्यांना त्या चांगल्याच टोचू व झोंबू लागल्या आहेत असे दिसून येते. त्यावर राज्यकर्त्यांच्या हाती



असलेला एकच उपाय म्हणजे त्यांच्या वापरावर बंदी घालणे आणि ते काम करण्यात आले. या नव्या असंसदीय शब्दांची यादी आणि निवड कशी करण्यात आली याबाबतचा मुद्दा यानिमित्ताने उपस्थित होणे स्वाभाविक होते. त्यावरही लोकसभा अध्यक्षांनी खुलासा करताना असंसदीय शब्दांचा निर्णय सरकार करीत नाही तर हा संसदेच्या आणि पीठासीन प्रमुखांच्या अधिकार कक्षेतील विषय असल्याचे सांगितले. पीठासीन अधिकाऱ्यांनीच खुलासा केल्याने तो ग्राह्य मानावाच लागेल. परंतु शब्दांची निवड पाहता त्याचा सरकार व राज्यकर्त्यांशी असलेला संबंध लक्षात आल्याखेरीज रहात नाही.



शब्द किंवा संज्ञा यांचे भाषांमधील महत्व काय असते याची व्याख्या करण्याची गरज नाही कारण ज्या व्यक्तीला भाषा बोलता येते त्या सर्वांना त्याचा अर्थ माहिती आहे. शब्दाविना भाषेची निर्मितीच होऊ शकत नाही. मात्र कोणते शब्द, कोणत्या संज्ञा कोणत्या वेळी वापरायच्या याचे काही मानवनिर्मित संकेत आहेत आणि त्यातून शिष्टसंमत भाषेची संकल्पना तयार झाली. त्यातूनच अभिव्यक्तीचे विविध प्रकार निर्माण झाले. त्याचबरोबर अभिव्यक्ती सशक्त व समर्थ होण्यासाठी उपहास, व्यंग्य, अतिशयोक्ति यासारख्या भाषिक अलंकारांचा किंवा प्रकारांचा वापर लेखकांकडून केला जात असतो. आपला मुद्दा प्रभावी व परिणामकारक रीतीने मांडण्यासाठी शाब्दिक कोट्याही केल्या जातात. या सर्व अभिव्यक्ती प्रकारांमध्ये शब्द व संज्ञा हा अविभाज्य भाग असतो. परंतु अभिव्यक्तीच्या या सर्वच प्रकारांवर घाला घालण्याच्या दृष्टीने संसदसदस्यांच्या शब्दवापरावर एकप्रकारे हे निर्बंध किंवा काहीशा 'असंसदीय' भाषेत सांगायचे झाल्यास 'अभिव्यक्तीची नसबंदी' करण्याचाच हा प्रकार आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. संसद असो किंवा कोणत्याही सार्वजनिक सभेत व्यक्तीसमूहांमध्ये बोलताना अशिष्ट व अश्लाघ्य-अश्लील भाषेचा वापर केला जाऊ नये हा सर्वसंमत आणि जगन्मान्य संकेत आहे. परंतु त्याचा अर्थ हाही नव्हे की केवळ ठरीव व एकसुरी पध्दतीनेच व्यक्तींनी अभिव्यक्त व्हावे ! अभिव्यक्ती ही सरस, सुरस आणि आकर्षक असणे हे देखील महत्वाचे असते. यासाठी शब्द व संज्ञांची व्यापक माहिती असावी लागते. शब्दभांडार नसले तरी अचूक व चपखल शब्दांच्या वापराने योग्य व उचित अभिव्यक्ती होऊ शकते.

फार पूर्वी महाराष्ट्राच्या विधानसभेत घडलेला हा प्रसंग किंवा किस्सा आहे. केशवराव धोंडगे प्रथमच विधानसभेवर निवडून आले होते. ते चांगली भाषणे करीत परंतु त्यांना त्या प्रमाणात प्रसिध्दी मिळत नसे. एकदा इंदिरा गांधी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार होत्या. त्यामुळे त्यांचे स्वागत कसे करायचे वगैरे चर्चा सभागृहात झाली असता संबंधित मंत्र्यांनी त्यांना महाराष्ट्राच्या संस्कृतीचे प्रतीक म्हणून नऊवारी पातळ, नथ वगैरे देण्यात येणार असल्याची माहिती दिली.

धोंडगे यांनी बोट वर करुन हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली. आता या विषयावर हरकत कसली म्हणून सर्व सभागृह त्यांच्याकडे पाहू लागले. धोंडगे यांनी इंदिरा गांधी यांना नथ देण्याबाबत विरोध नसल्याचे प्रथम स्पष्ट केले. परंतु ही नथ नाकात घालण्यासाठी त्यांच्या नाकाला भोक आहे काय अशी विचारणा केली. आता भोक हा शब्द त्यांनी उच्चारल्याबरोबर अनेक सदस्यांनी आरडाओरडा केला आणि हे सदस्य असंसदीय शब्दाचा वापर करीत आहेत आणि तो नोंदीतून काढावा असे म्हणू लागले. त्यावर धोंडगे यांनी प्रथम अध्यक्षांकडे 'भोक' हा शब्द असंसदीय आहे काय अशी विचारणा केली. त्यावर काही वरिष्ठ सदस्यांनी शब्द बरोबर असला तरी तो शिष्टसंमत नाही व त्याऐवजी 'छिद्र' असा शब्द वापरणे अधिक उचित ठरले असते असे म्हटले. त्यावर 'भोक की छिद्र' यावरुन सभागृहात घनघोर चर्चा झाली.



एकदा लोकसभेत जयपाल रेड्डी यांनी नरसिंह राव सरकारवर टीका करताना 'ह्युमाँगस' असा शब्द वापरला. हा शब्द किंवा संज्ञा तोपर्यंत फारशी ज्ञात नव्हती. त्यामुळे काही सदस्यांनी त्यावर तीव्र हरकती घेण्यास सुरुवात केली. हा शब्द त्यांनी कुठून पैदा केला असे त्यांनी विचारायला सुरुवात केली. रेड्डी यांना स्पष्टीकरणासाठी बोलूही दिले जात नव्हते. अखेर नरसिंह राव यांनीच यावर खुलासा करताना सांगितले की एखाद्या गोष्टीच्या झालेल्या अतिप्रचंड परिणामाची कल्पना यावी यासाठी इंग्रजी भाषेत नव्यानेच काही प्रयोग सुरु असून त्यामध्ये समानार्थी दोन शब्दांचा संधी करुन नवीन शब्द तयार केला जातो. 'ह्युमाँगस' शब्दात 'ह्यूज' आणि 'इनॉर्मस' या दोन शब्दांचा संधी करण्यात









आलेला आहे. या खुलाशावर एकच हास्यकल्लोळ झाला. परंतु संसदेत जयपाल रेड्डी, जसवंतसिंग यांच्यासारखे सदस्य अगदी वेचूनवेचून अवघड इंग्रजी शब्द वापरण्यात पटाईत होते. त्यामुळे त्यांनी भाषण सुरु केले की सदस्यांना शब्दार्थकोषाच्या प्रती वाटण्यात याव्यात असे काहींनी मजेत सुचविले होते. अलीकडच्या काळात इंग्रजीवर विलक्षण प्रभुत्व असलेले शशी थरुर हेही कधीकधी असा अवघड संज्ञा वापरुन चकित करीत असतात.

दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे शब्द व संज्ञा यांचे स्वरुप सार्वत्रिक असते. त्यांच्याद्वारे एखाद्या क्लिष्ट बाबीचा अर्थ सर्वसामान्यांना तत्काळ लक्षात येऊ शकतो. परंतु त्याच शब्द व संज्ञांवर निर्बंध घातल्यास कोणताही सदस्य परिणामकारक रीतीने आपले म्हणणे लोकांपर्यंत पोहोचवू शकणार नाही. या नव्या शब्दांमध्ये करप्ट किंवा ॲब्यूज यासारख्या शब्दांचा समावेश आहे. 'करप्ट' शब्दाला समानार्थी म्हणून, डिसऑनेस्ट, अनस्क्रुप्युलस, अनप्रिन्सिपल्ड किंवा अमॉरल असे शब्द आहेत. परंतु सर्वाधिक प्रचलित शब्द हा 'करप्ट' असल्याने तो उच्चारताच त्याचा अर्थ तत्काळ ध्यानात येतो. पण आता संसदसदस्यांना समानार्थी शब्द शोधून मगच त्यांना जे म्हणायचे ते म्हणावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेतली परिणामकारकता निष्प्रभ होण्याचा धोका आहे. 'ॲब्यूज'लाही मिसयूज, एक्सप्लॉइट, मालट्रीट, इलट्रीट असे अनेक समानार्थी शब्द आहेत. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे हाही एक सर्वमान्य शब्द आहे. त्याला असंसदीय शब्दांच्या यादीत घालणे हे कोणत्या विद्वान मेंदूतून आलेले आहे हे न समजणारे आहे.

संसदेत शिष्टसंमत भाषेतच कामकाज व सर्व व्यवहार झाले पाहिजेत हे निर्विवाद आहे. परंतु त्यासाठी भाषेतील शब्दांवर मर्यादा आणताना त्यामुळे सदस्यांची अडचण होणार नाही हेही पाहणे महत्वाचे आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे 'करप्ट' किंवा 'ॲब्यूज' यासारखे दैनंदिन प्रचलित शब्दही सदस्यांना वापरता येणार नसतील तर त्यांनी भाषणासाठी बरोबर शब्दार्थकोष घेऊन बसायचे काय आणि जे असंसदीय शब्द आहेत त्यांच्यासाठी समानार्थी शब्द शोधत बसायचे काय हा प्रश्न आहे. परंतु हाही एक अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करण्याचाच आणखी एक नवा प्रकार सादर झालेला आहे. त्यामुळे ही प्रचलित व्यवस्था आणखी कोणत्या निम्नस्तरावर जाणार आहे हे कळायला

मार्ग नाही. अर्थात जेव्हा एखादी व्यवस्था निर्बंध वाढवायला लागते तेव्हा समजावे की व्यवस्थेची घसरण सुरु झालेली आहे आणि त्यातून अराजकाकडे वाटचाल सुरु होते !

वरील मजकूर संसदीय आहे की असंसदीय हेही ठरवावे लागेल !

## राष्ट्रीय मानचिन्हाची मानहानि !

संसदेची नवी वास्तू झपाट्याने तयार होत आहे. संसदेचे सध्या सुरु असलेले पावसाळी अधिवेशन बहुधा या जुन्या वास्तूमधील शेवटचे असेल असे मानले जाते. यानंतर होणारे हिवाळी अधिवेशन बहुधा नव्याने बांधण्यात येत असलेल्या इमारतीतच होईल असे सांगण्यात येते. अर्थात काही कारणाने विलंब झाल्यास ते पुढे ढकलले जाऊ शकते. या नव्या इमारतीसाठी तयार करण्यात आलेल्या अशोकस्तंभावरील सिंहांच्या राष्ट्रीय मानचिन्हाच्या प्रतिकृतीचे अनावरण नुकतेच पंतप्रधानांच्या हस्ते झाले. मात्र त्या अनावरणानंतर या प्रतिकृतीमधील सिंहांची मुद्रा पाहिल्यानंतर देशभरात प्रतिकूल प्रतिक्रिया उमटली. इतिहासतज्ञ, शिल्पतज्ञांनी ही प्रतिकृति मूळ चिन्हाशी मेळ खाणारी किंवा सुसंगत नाही असे सांगितले यातून एक नवा वाद निर्माण झाला. राष्ट्रीय मानचिन्हांचाही सन्मान न करणारे राज्यकर्ते आहेत काय ? ही जी नवी प्रतिकृति तयार करण्यात आली आहे त्यामधील सिंहांची तोंडे उघडी आहेत आणि कुणावर तरी हल्ला करण्याच्या आक्रमकच नव्हे तर भयंकर अशी त्यांची मुद्रा व भाव आहेत. मोजमापाच्या दृष्टीनेही ही प्रतिकृति विसंगत असल्याचे मत अनेक तज्ञांनी व्यक्त केले. असे असले तरी सरकारने टीकेला न जुमानण्याचा आपला कोडगेपणा चालू ठेवला आहे. मूळ राष्ट्रीय मानचिन्ह चार सिंहांचे आहे. हे चार सिंह पॉवर( सामर्थ्य), करेज (साहस-शौर्य), कॉन्फिडन्स(आत्मविश्वास) आणि प्राईड (अस्मिता किंवा स्वाभिमान) यांचे प्रतिनिधित्व करणारे मानले जातात. मूळ चिन्हातील चारपैकी तीनच सिंह दृष्य आहेत कारण चौथा सिंह मागच्या बाजूला असल्याने तो दिसू शकत नाही. परंतु मूळ शिल्पातील सिंहांच्या मुद्रेवरील भाव हे सौम्य आणि ठामपणा दर्शविणारे आहेत. आता नव्याने तयार करण्यात आलेल्या प्रतिकृतीप्रमाणे भयानक आणि आक्रमक नाहीत. अर्थात खरं सांगायचं झालं तर या सिंहाच्या मुद्रेवरील भेसूर व अक्राळविक्राळ भाव पाहता ते वर्तमान राजवटीचे उचित प्रतिनिधित्व करीत असल्याचे स्पष्ट होते. सिंह ज्याप्रमाणे आपल्या भक्ष्यावर झडप घालतो त्याचप्रमाणे वर्तमान राज्यकर्तेही त्यांना अडचणीच्या ठरणाऱ्या विरोधी पक्षांवर, त्यांच्या नेत्यांवर तुटून पडत असतात. त्यामुळे त्यांनी तयार केलेली ही प्रतिकृति एकप्रकारे त्यांच्या मनोवृत्तीचेच दर्शन घडविते. राष्ट्रीय मानचिन्हांबद्दल अशी तुच्छ वृत्ती का ? कारण स्पष्ट आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात रा.स्व.संघाचा सहभाग नव्हता. त्यामुळेच त्यांची राजकीय शाखा असलेल्या भाजपचा देखील या लढ्याशी सुतराम संबंध नसणे ओघानेच आले. त्यामुळे स्वातंत्र्यलढा, त्या लढ्याची मूल्ये - प्रतीके, लढ्याचे नेतृत्व करणारे नेते यांच्याबद्दल त्यांच्या मनात ना आदर ना सन्मान ! आहे ती केवळ तुच्छता ! त्यामुळेच पं. नेहरूंसारख्या नेत्याचीही चेष्टा करण्याचे धाडस केले जाते. याला सुमारबुध्दी म्हणतात. या सुमारबुध्दीपणातूनच



अशोक स्तंभावरील नवे मानचिन्ह

संसदेसारख्या वास्तूला पर्यायी इमारत तयार करण्याचा राजहट्ट अमलात आणला जात आहे. संसदेची नवी इमारत बांधण्याची आवश्यकता काय हा प्रश्न उपस्थित झाल्याखेरीज राहणार नाही.

आज जगात बांधकामाचे विकसित व अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असताना अस्तित्वात असलेल्या संसदगृहाचेच नूतनीकरण करणे शक्य झाले असते. परंतु राजहट्टाला ते मान्य नव्हते. त्यांना नवीच इमारत हवी होती. अलीकडेच ब्रिटनच्या पंतप्रधानांवरील अविश्वास ठरावावरील चर्चेचे प्रसारण वृत्तवाहिन्यांवर दाखविण्यात आले होते.

ब्रिटिश संसदेतून हे थेट प्रसारण होते. ही इमारत

मूळ सातशे ते आठशे वर्षे जुनी परंतु तीनशे वर्षांपूर्वी तिचे नूतनीकरण करण्यात आले होते. या इमारतीची नियमित डागडुजी, देखभाल होत असते आणि त्याच सभागृहात सभासद दाटीवाटीने बसत असतात. काहीजण मागे उभे राहतात तर काहीजण खाली गालिच्यावरही बसतात. तेथूनच ते त्यांची भाषणेही देत असतात. ब्रिटनला संसदेची नवी वास्तू उभारणे शक्य नाही काय ? निश्चितपणे शक्य आहे. परंतु त्यांनी ते केले नाही कारण इमारतीपेक्षा त्यांचा संसदीय लोकशाहीवर अधिक विश्वास आहे. सभागृह, त्यामधील सुखसोयी हा त्यांच्या दृष्टीने दुय्यम भाग आहे. लोकशाही भावनेला ते अधिक बांधील आहेत. परंतु भारतीय राज्यकर्त्यांना देखावेबाजी, प्रदर्शनबाजीचा हव्यास अधिक आहे. त्यापोटीच हजारो कोटि रुपये खर्च करुन, पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून जिवाचा आटापिटा करुन संसदेची नवीन इमारत बांधली जात आहे. इतिहासात आपले नाव जावे यासाठीचा हा बालिश, पोरकट आणि भंपक प्रयत्न आहे. संसद हे देखील भारतीय लोकशाहीचे मानचिन्ह आहे. पण त्यावर देखील आघात करण्यात आला आहे.

यावरही कडी करण्यात आली आहे. पंतप्रधानसाहेबांनी एका जाहीर सभेत चक्क भगवी टोपी परिधान करुन भाषण केले. ही कल्पना गुजरातमधील भाजपनेत्याच्या डोक्यातून निघाली. त्याने लगेचच एका खासगी शिलाई कंपनीला भगव्या टोप्या शिवण्याची भलीमोठी ऑर्डर देऊन टाकली. पंतप्रधानसाहेबांनीही या कल्पनेचे स्वागत केले. आता देशभरातल्या भाजप शाखांना या अशा भगव्या टोप्या खरेदीसाठी फर्मान पाठविण्यात आल्याचे समजते. पक्षकार्यकर्त्यांनी असले प्रकार केलेले समजू शकते. परंतु पंतप्रधानांनी ती टोपी परिधान करुन तिला अधिमान्यता प्रदान केली. हा प्रकार कशासाठी ? याचा अर्थ एकच काढता येऊ शकतो की स्वातंत्र्यलढ्याचे प्रमुख चिन्ह असलेल्या गांधीटोपीचा हा पर्याय आहे. ही एक सुनियोजित चाल आहे. महात्मा गांधी यांनी रूढ केलेली ही खादीची टोपी या देशातल्या करोडो गरीब व वंचितांना, महिलांना सबल करणारी आणि आर्थिक स्वयंपूर्ण करणारी होती. चरख्याच्या माध्यमातून सूत, त्याची खादी आणि टोपीची शिलाई या माध्यमातून गावागावातील महिला व वंचितांना आर्थिकदृष्ट्या सबल करण्याचे ते प्रतीक होते. आजही ग्रामीण भागात ही टोपी अभिमानाने परिधान केली जाते.


मोदींची भगवी टोपी


ब्रिटीश पार्लमेंट

परंतु स्वातंत्र्यलढ्याचे ते प्रतीकही आता सहन होईनासे झाले आहे आणि त्याला पर्याय म्हणून भगवी टोपी रुजविण्याच्या हालचाली सुरु करण्यात आल्या आहेत.

ही अतिवादी महत्वाकांक्षा केवळ स्वप्रेम, स्वनामधन्यतेतून आलेली आहे. सुमारबुध्दीच्या मंडळींचा प्रतीकात्मकतेवर अधिक भर असतो कारण त्यातून त्यांना यशाचा शॉर्टकट मिळतो. इतिहासात स्वतःची प्रतिमा बळजबरीने नोंदविण्यासाठी इतिहास-चिन्हे पुसून स्वतः पुरस्कृत पर्यायी प्रतीके उभारण्याचा हा अट्टाहास अशी सुमारबुध्दी मंडळी करीत असतात. आज त्या अनुभवातून देश जात आहे.


■■



प्रा.प्रकाश पवार
कोल्हापूर

# आधुनिक भारत आणि


२१ व्या शतकातील दुसरे दशक भारतीय राजकारणातील फेरबदल करणारे होते. २०१४ मध्ये भारतीय राजकारणात सत्तांतर घडून आले. काँग्रेस पक्षाचा निवडणुकीच्या राजकारणात पराभव झाला. भाजप पक्षाचा निवडणुकीच्या राजकारणात विजय झाला. एवढ्या पुरती मर्यादित ही राजकीय घडामोड नाही. भारतीय राजकारणातील आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताची समीक्षा सुरू झाली आहे. या दशकामध्ये आधुनिक भारत आणि नवभारत या दोन सिद्धांतांची नव्याने मांडणी सुरू झाली. विशेष म्हणजे नवभारत हा दुसरा ग्रँड सिद्धांत आहे. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू झाला. यामुळे पुन्हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील भारत संकल्पनेचा विकास आणि स्वातंत्र्य उत्तर काळातील भारतीय संकल्पनेचा विकास या संदर्भात चर्चा सैद्धांतिक पातळीवर सुरू झाल्या आहेत. व्यापकपणे तीन पद्धतीने भारत संकल्पनेची चर्चा घडवून आली आहे. एक, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील भारत संकल्पनेचा आढावा घेतला जात आहे. दोन, स्वातंत्र्योत्तर काळातील आधुनिक भारत संकल्पनेच्या प्रवासाचा आढावा घेतला जातोय. तीन, एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकात नवभारत ही संकल्पना मांडली जात आहे. या संकल्पनेची नव्यानेच मांडणी केली जात आहे. थोडक्यात आधुनिक भारत आणि नवभारत अशा दोन सिद्धांतांची मांडणी राजकीय प्रक्रियेत केली जाते. सत्तर वर्षाचा काळ भारतीय स्वातंत्र्याने पार केला आहे. या सत्तर वर्षांत भारताने स्वतंत्रपणे निर्णय घेतले. स्वतंत्रपणे निर्णय घेऊन भारताला आधुनिक स्वरूपाचा आकार दिला. त्या निर्णयामध्ये दूरदृष्टी होती. तसेच भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्याची सांधेजोड करणारी अंतरदृष्टी होती. आधुनिक भारत संकल्पनेच्या





# नवभारत : ग्रँड सिद्धांत

निर्णयांच्यामध्ये धरसोड झाली. तर काही वेळा भिजत घोंगडे ठेवले गेले. एवढेच नव्हे तर दूरदृष्टीवर प्रबळ सामाजिक-आर्थिक हितसंबंधाचा प्रभाव पडला. परंतु एकूण आधुनिकता, लोकशाही, उद्योग, शेती, सेवा अशा विविध क्षेत्रात प्रगती करण्याचा नितीशी करार केला गेला होता. असे प्रभावशाली निर्णयांचे सत्तरीच्या निमित्ताने विश्लेषण करणे उचित ठरेल. यातूनही आधुनिक भारत आणि नवभारत या दोन सिंध्दांताचा परस्पर विरोधी दोन आखाड्यांमध्ये राजकीय संघर्ष सुरू आहे.



## आधुनिक भारत: ग्रँड सिद्धांत

पाचव्या, सहाव्या आणि सातव्या दशकामध्ये पंडित नेहरू यांनी आधुनिक भारत ग्रँड सिद्धांत घडवला होता. तसेच त्यांनी आधुनिक भारत ग्रँड सिद्धांताची मांडणीही केली होती. कारण

स्वातंत्र्योत्तर काळातील आरंभीच्या दोन दशकातील निर्णयांवर पंडित नेहरूंचा प्रभाव स्पष्टपणे राहिला (१९४७-१९६४). सातव्या दशकामध्ये शास्त्रीयुग सुरू झाले (१९६४-१९६६). या दोन दशकात आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताची संरचना व मूल्य व्यवस्था यांची मांडणी झाली. आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताच्या छताखाली अनेक संकल्पनांची सांधेजोड केली होती. उदाहरणार्थ कल्याणकारी राज्य, मिश्र अर्थव्यवस्था, घटनावाद, घटनात्मक राष्ट्रवाद, घटनात्मक देशभक्ती, कृषी औद्योगिक समाज, राज्य समाजवाद, समूह विकास, हरित क्रांती, शांतता, सहिष्णूता, धर्मनिरपेक्षता, पंचशील, इत्यादी. या सिद्धांताची वैशिष्ट्ये पाचव्या आणि सहाव्या दशकातील पुढील प्रमाणे आहेत. एक, या दोन दशकातील निर्णयाची चौकट आधुनिक कल्याणकारी स्वरूपाची होती. यामुळे आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताचे एक वैशिष्ट्य कल्याणकारी

राज्य संस्था हे एक आहे. दोन, राज्यघटने संदर्भातील निर्णय हा भारतीय समाजाला आधुनिक युगात घेऊन गेला. उदा. भारतीय राज्यघटनेचा सरनामा, व्यक्ती-राज्य यांचे संबंध, मुलभुत अधिकार, नागरिकत्व हे राज्यघटनेच्या संदर्भातील निर्णय भारतीय समाजकारणातील मैलाचा दगड ठरले. यामुळे घटनावाद, घटनात्मक राष्ट्रवाद, घटनात्मक देशभक्ती, राज्य बांधणी आणि राष्ट्रबांधणी हा विचार आधुनिक भारत सिद्धांताचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. तीन, कृषी औद्योगिक विकास करण्यासाठी दोन प्रारुपे जागतिक पातळीवर अस्तित्वात होती. त्यापैकी पहिले प्रारुप शेती व औद्योगिक क्षेत्राचा भांडवली विकास हे एक प्रारुप होते. हे प्रारूप अमेरिकेने विकसित केले होते. दुसरे समाजवादी विकासाचे प्रारुप होते. हे प्रारुप सोव्हिएत रशियाने विकसित



अमेरिकन प्रारूप

केले होते. पंडित नेहरु यांनी या दोन्हीं प्रारुपापेक्षा वेगळे प्रारुप विकसित केले. त्यांनी मिश्र अर्थव्यवस्था आणि सहकारी स्वरुपाची शेती असे प्रारुप विकसित केले. त्यास पंडित नेहरु- पी. सी. महालनोबिस प्रारुप म्हणून ओळखले जाते (खिलाणी सुनिल, २०१६: १२१-१६३). तेव्हा भारतामध्ये गांधीवादी योजना एस. एन. अगरवाल, सर्वोदय योजना जयप्रकाश नारायण आणि ग्रामोद्योगकेंद्री आर्थिक विकास हे जे. सी. कुमाराप्पा यांनी मांडले होते. तसेच गोवर्धन पारीख, वि. म. तारकुंडे, बी. एन. बॅनर्जी, यांनी पिपल्स प्लॅन मांडलेला होता. यापेक्षा वेगळे प्रारुप नेहरुंनी स्विकारले. त्यांनी शेती आणि औद्योगिक विकासाचे मिश्र


भारताचे नेहरू प्रारूप

अर्थव्यवस्था हे प्रारूप स्वीकारले. यामुळे मिश्र अर्थव्यवस्था हे आधुनिक भारत सिद्धांताचे तिसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. राज्य पातळीवर देखील या सिद्धांताचा विकास झाला होता. उदाहरणार्थ महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक समाजाची संकल्पना मांडली होती. शेतीच्या उत्पादनावर प्रक्रिया करणारे औद्योगिक प्रकल्प ग्रामीण भागामध्ये उभा करुन शहरी आणि ग्रामीण भाग, उद्योग आणि शेती व शेतकरी आणि कामगार यांच्यामधील भेद कमी करता येईल असा विचार मांडला होता (चौसाळकर अशोक, २०२२: ३). हे आधुनिक भारत सिद्धांताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या निर्णयांना जोडून भारताच्या औद्योगिकीकरणाचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला. परंतु शेती-उद्योग या दोन्ही क्षेत्राचा संयुक्त विकासाचा निर्णय घेतला गेला. त्यामध्ये भर महालनोबिस यांनी घातली. यास विकासाचे प्रारूप म्हणून ओळखले जाते. या चौकटीत निर्णय घेण्यात आले होते. पी.सी. महालनोबिस हे संख्याशास्त्रज्ञ होते. त्यांनी दोन क्षेत्राच्या तडजोडीमधून विकास करण्याचे प्रारूप मांडले. ते प्रारूप नेहरू सरकारने स्वीकारले. यातूनच मिश्र अर्थकारण, सार्वजनिक-खाजगी


रशियाचे प्रारूप


उद्योगाचा समतोल विकास, सार्वजनिक क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण असे राजकीय अर्थकारणाचे निर्णय घेतले गेले. भारताचे आधुनिकीकरण या निर्णयामधून घडले. लोखंड, कोळसा, वीज अशा क्षेत्रात राज्यसंस्थेने गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला गेला. हे सर्व निर्णय भारतीय राजकीय अर्थकारणाचे होते. त्यांचा परिणाम शिक्षण, ग्रामीण समाज यांच्यावर दूरगामी झाला. कारण राज्यामधील निर्णय देखील याच चौकटीत झाले. उदा. के. कामराज यांनी ग्रामीण



गरीबांना विनामूल्य शिक्षण आणि विनामूल्य दुपारचे जेवन असा निर्णय घेतला होता (१९५४-६३). तर महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाणांनी कृषी-औद्योगिक समाजाचा निर्णय या चौकटीमध्ये घेतला होता. उद्योगक्षेत्रातील मोठ्या भांडवलदारांच्या मक्तेदारीवर अंकुश राहावा आणि छोट्या मध्यम उद्योजकांना मोठ्या मक्तेदार भांडवलदारापासून संरक्षण लाभाव या उद्देशाने १९५१ मध्ये औद्योगिक विकास व नियंत्रण कायदा करण्यात आला. राष्ट्रीय वित्त आयोगाची स्थापना २२ नोव्हेंबर १९५१ रोजी करण्यात आली. के.सी. नियोगी (१९५२-१९५७), के संन्थानम (१९५७-१९६२), एक. के. चंदा (१९६२-१९६६) यांनी नेहरूंच्या काळात आधुनिक भारत हा ग्रँड सिद्धांत घडवण्यासाठी प्रयत्न केला होता. चार, आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वैज्ञानिक संस्थांची उभारणी हे होय. नव्याने उभारलेल्या संस्था भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आशयाशी आणि प्रतीकांशी जोडून घेण्यात आल्या. या वैशिष्ट्यामुळे भारतात आधुनिकीकरण केले गेले. उदाहरणार्थ चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्कची उभारणी (१९४७), प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया ची स्थापना (२७ ऑगस्ट १९४७), भारतीय अणुऊर्जा आयोगाची स्थापना (१० ऑगस्ट १९४८), भारतीय औद्योगिक वित्त महामंडळाची स्थापना ( १९४८), हिंदुस्तान एअरक्राफ्ट लिमिटेडच्या सहकार्याने लष्करी विमानांच्या निर्मितीला प्रारंभ (१९४८), भारतीय दूरध्वनी उद्योगाची स्थापना (१९४८), भारतीय पोलीस सेवेची स्थापना (१९४८), फिल्म्स डिव्हिजनची स्थापना (१९४८), रिझर्व बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयकरण (१ जानेवारी १९४९), रिअर मिनरल्स सर्वे युनिटची स्थापना (२९ जुलै १९४९), केंद्रीय राखीव पोलीस दलाची स्थापना (२८ डिसेंबर १९४९), इंडियन रिसर्च फंड असोसिएशनचे भारतीय वैद्यकीय अनुसंधान परिषद (इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च) मध्ये रुपांतर ( १९४९), केले गेले (केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना (१९५०), भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना ( २५ जानेवारी १९५०), द रॉयल इंडियन नेव्ही या संस्थेचे नामकरण भारतीय नौसेना (इंडियन नेव्ही) असे केले ( २६ जानेवारी १९५०). सर्वोच्च न्यायालयाची स्थापना (२८ जानेवारी १९५०), पी.सी. महालनोबिस यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेची स्थापना (१९५०) केली. १९५० साली कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली एकूण सहा महत्त्वाच्या राष्ट्रीय संशोधन संस्थांची स्थापना केली. नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी (नवी दिल्ली), नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (पुणे), सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (म्हैसूर), सेंट्रल फ्युएल रिसर्च इन्स्टिट्यूट (धनाबाद), सेंट्रल ग्लास अँड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्यूट (कोलकत्ता) व नॅशनल मेटॅलजिकल लॅबोरेटरी (जमशेदपूर) या सहा संस्था स्थापन केल्या गेल्या. पंडित नेहरूंनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा पुरस्कार केला व प्रसार केला. १९५१ नंतर पुढील वीस वर्षात सीआयएसआर या संस्थेच्या पुढाकाराने ३३ वैज्ञानिक संस्था स्थापन झाल्या. खनिजावरील प्रक्रियेसाठी इंडियन रेअर अर्थ्स लिमिटेडची स्थापना १८ ऑगस्ट १९५० रोजी

केरळमध्ये अल्वये येथे करण्यात आली. या कंपनीला २४ सप्टेंबर १९५२ रोजी देशाला अर्पण करण्यात आले. १९६३ मध्ये ही कंपनी अणुऊर्जा खात्याच्या अखत्यारीत आणली गेली. पाच, आधुनिक भारत सिद्धांताचे पाचवे वैशिष्ट्ये राष्ट्रीय भूमिका हे होते. आरंभीच्या दशकामध्ये राष्ट्रवाद व प्रांतवाद यांच्या संदर्भातील निर्णय घेतला गेला. प्रदेशवाद वाढू नये म्हणून भाषावार प्रांतरचनेला नकार दिला गेला. परंतु राज्यांमधून दबाव वाढत गेला. त्यामुळे आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात अशा राज्यांची स्थापना करण्याचा निर्णय राष्ट्रवादाच्या तुलनेत भाषावादास किंवा प्रदेशवादाशी समझोता करणारा घेतला गेला. सहा, आंतरराष्ट्रीय संबंध आणि सत्तासंबंध समजून घेऊन अलिप्ततावादी आणि शांततावादी परराष्ट्रधोरणाचा निर्णय याच काळावर प्रभाव टाकणारा होता. विशेष पंचशीलाची तत्त्वे प्रमाण मानली गेली आणि दोन्ही महासत्तांच्या खेरीज एक स्वतंत्र विचार प्रवाह निर्णयांचा विकास पावला. यामुळे शस्त्रअस्त्रावरील बजेट कमी ठेवण्याचाही निर्णय कायम दिसतो. परंतु शास्त्री युगात शस्त्रअस्त्रावरील बजेट वाढविण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय संबंधामधील सैद्धांतिक भूमिका बदलणारा झाला. सात, आधुनिक भारत हा ग्रँड सिद्धांत बहुविविधतेशी जोडला गेला होता. आधुनिक भारत हा ग्रँड सिद्धांत आणि बहुविविधता या दोन गोष्टी एकमेकांशी एकरूप झालेल्या होत्या. यामुळे देशांतर्गत बहुविविधतेचा सन्मान करत हिंदी बरोबर इतर भाषांशी तडजोड करणारे निर्णय झाले. कारण हिंदी विरोधी चळवळ दक्षिणेत प्रभावी होती. या भाषाविषयक निर्णयाच्या बरोबर प्रत्येक राज्यातील मुख्यमंत्र्याशी केंद्राचा व्यवहार हा राजकीय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्याचा राहिला. म्हणजेच केंद्राने राज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार देण्याचाही महत्त्वाचा निर्णय या काळात प्रभावी ठरला होता. शेतकरी समूह आणि जवान यांची एकमेकांशी नाळ जोडण्याचे निर्णय शास्त्री युगात विलक्षण प्रभावी ठरले. म्हणून त्यांनी 'जय जवान,











जय किसान' अशी नवी दिशा निर्णयांना दिली. आठ, भारतीय संघराज्यामधील केंद्र आणि राज्य यांच्यातील आर्थिक संबंध सलोख्याचे निर्माण करणे हे आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. राष्ट्रीय वित्त आयोगाची स्थापना २२ नोव्हेंबर १९५१ रोजी करण्यात आली. केंद्र सरकारच्या महसुलाचे हस्तांतरण राज्य सरकारकडे केले जावे या प्रक्रियेचे निश्चितीकरण करण्यासाठी वित्त आयोग ही घटनादत्त संस्था स्थापन करण्यात आली.


अशा संस्थेच्या आवश्यकतेचा पाठपुरावा डॉ. आंबेडकरांनी केला होता. ऑस्ट्रेलियाच्या कॉमनवेल्थ ग्रँड कमिशनच्या धरतीवर वित्त आयोगाची स्थापना करण्याची शिफारस केली होती. बी.के. नेहरू आणि बी.पी. आडारकर यांच्या द्विसदस्यीय समितीने ऑस्ट्रेलियाच्या कॉमनवेल्थ ग्रँड कमिशनचा अभ्यास करून वित्त आयोग स्थापन करण्याचे शिफारस केली होती. के.सी. नियोगी (१९५२-१९५७), के संन्थानम (१९५७-१९६२), एक. के. चंदा (१९६२-१९६६) यांनी नेहरूंच्या काळात आधुनिक भारत हा ग्रँड सिद्धांत घडवण्यासाठी प्रयत्न केला होता. यशवंतराव चव्हाण यांनी देखील वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले होते. मात्र तेव्हा आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताचा ऱ्हास सुरू झाला होता. यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताचा ऱ्हास रोखण्याचा प्रयत्न केला.





## आधुनिक भारत ग्रँड सिद्धांतापुढील पेचप्रसंग

तिसरे दशक इंदिरा गांधी पर्वापासून सुरू होते. या स्वातंत्र्यानंतरच्या तिसऱ्या युगात आधुनिक भारत ग्रँड सिद्धांतापुढे पेचप्रसंग निर्माण झाले. यांची वैशिष्ट्ये पुढील आहेत. एक, सातव्या आणि आठव्या दशकात कल्याणकारी राज्य संस्थेच्या निर्णयांचा ऱ्हास सुरू झाला. कल्याणकारी निर्णयांच्या जागी उलथापालथ घडणारे निर्णय घेतले गेले. गरीबीचे निर्मूलन (१९७१), बँकाचे राष्ट्रीयकरण (१९६९), आणिबाणी (२५ जून १९७५), आणिबाणी उठवणे व निवडणूका घेणे (मार्च १९७७). या निर्णयामध्ये कल्याणकारी निर्णयाच्या बद्दलचा ऱ्हास सुस्पष्टपणे दिसते. तर नवीन निर्णय हे दूरदृष्टीपेक्षा जागतिक कल्याणकारी ऱ्हासाच्या निर्णयाच्या प्रभावाचा परिणाम दिसू लागला. दोन, हे सर्व निर्णय आधुनिक भारत सिद्धांताच्या राजकारण व समाजकारणाची घडी मोडणारे निर्णय ठरले. या युगातील निर्णय देखील जवळपास दोन दशकांपर्यंत धरसोड करणारे होते (१९६७-१९८६). अखिल भारतीय समाज अशी संकल्पना आधुनिक भारत या ग्रँड संकल्पनेची होती. परंतु ऐंशीच्या दशकामध्ये अखिल भारतीय समाज या संकल्पनेच्या ऐवजी हिंदू समाज अल्पसंख्यांक समाज अशा संकल्पना वापरल्या जाऊ लागल्या. हा समाजशास्त्रीय स्वरूपाचा बदल झाला. या बदलामुळे आधुनिक भारत या ग्रँड संकल्पनेला मोठे आव्हान दिल्या गेले. तीन, इंडिया विरुद्ध भारत हे द्वैत आठव्या दशकाच्या शेवटी निर्माण झाले. या द्वैवाने आधुनिक भारत सिद्धांताच्या पुढे मोठा पेचप्रसंग निर्माण केला. कारण आधुनिक भारत सिद्धांतात कृषी आधारित भारत आणि औद्योगिक भारत यांच्यातील समझोता कल्पिलेला होता. मात्र इंडिया विरुद्ध भारत या संकल्पनेने कृषी भारत या संकल्पनेचे दोन वर्गांमध्ये विभाजन झाले. वर्ग संघर्ष आणि वर्गीय संरचना परस्पर विरोधी भूमिका घेऊ लागली. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताची संकल्पना जवळपास प्रथम अमान्य केली. भारतीय किसान युनियन या टिकैत यांच्या संघटनेने आधुनिक भारताच्या पुढे समस्या निर्माण केली. तसेच कर्नाटक राज्यातील रयत संघाने देखील सरकारच्या विरोधात म्हणजेच एका अर्थाने आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताच्या विरोधात भूमिका घेतली. ही राजकीय प्रक्रिया आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताच्या ऱ्हासाचे एक महत्त्वाचे कारण ठरली. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने आणि कर्नाटक मधील रयत संघाने जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेला पाठिंबा दिला. यामुळे आधुनिक भारत हा ग्रँड सिद्धांत शेतकरी संघटनांनी अमान्य केला. शेतकरी समूह संघटितपणे आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताच्या विरोधात गेला. चार, आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताच्या ऱ्हासाला इलेक्ट्रॉनिक क्रांती हे एक कारण ठरले. इलेक्ट्रॉनिक



क्रांतीमुळे दूरदर्शन आणि टीव्ही या दोन प्रसार माध्यमांचा विस्तार झाला. या दोन माध्यमातून नव मध्यमवर्गाचा उदय झाला. नव मध्यम वर्गाने आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांताला विरोध केला. आधुनिक भारतातील ग्रोथ रेट हा हिंदू ग्रोथ रेट म्हणून टिंगल टवाळीचा विषय निश्चित केला. हिंदू ग्रोथ रेट ही नकारात्मक संकल्पना म्हणून अधोरेखित केली होती. पाच, आधुनिक भारत या ग्रँड सिद्धांतात हिंदू मुस्लिम सामाजिक सलोखा ही संकल्पना प्रभावी ठरली होती. ऐंशीच्या दशकात नवहिंदुत्व व सामाजिक समरसता चळवळीने हिंदू मुस्लिम सामाजिक सलोख्याच्या पुढे आव्हाने उभी केली. सहा, डायस्पोराची वाढ ऐंशीच्या दशकानंतर सुरू झाली. या पार्श्वभूमीवर बिहारियत, काश्मिरीयत, पंजाबियत,



केरळरियत, राजस्थानियत, राष्ट्रीय मराठा अशा संकल्पना नव्या पद्धतीने विकसित झाल्या.

## हिंदू भारत संकल्पना

नव्वदीच्या दशकात मध्यमवर्गाचा विस्तार झाला. नव्वदीच्या दशकात हिंदू भारत ही संकल्पना भाजपने वेगवेगळ्या प्रकारच्या यात्रा काढून जनसमूहापर्यंत पोहोचवली. ही प्रक्रिया गुंतागुंतीची होती. या प्रक्रियेची वैशिष्ट्ये पुढील आहेत. एक, नव्वदीच्या दशकात आर्थिक सुधारणांचा आरंभीचा टप्पा सुरू झाला. या टप्प्यावरती आर्थिक समाज, हिंदू समाज, अल्पसंख्यांक समाज, बहुसंख्यांक समाज, डायस्पोरा समाज या नवीन संकल्पनांचा विस्तार झाला. या संकल्पनांमुळे अखिल भारतीय समाज ही संकल्पना राजकीय दृष्ट्या आणि समाजशास्त्रीदृष्ट्या पेचप्रसंगात सापडली. या प्रक्रियेमधून हिंदू भारत ही संकल्पना विकसित होत गेली. दोन, औपचारिकपणे नव्वदीच्या दशकात आर्थिक सुधारणा विषयक निर्णय घेतले गेले. परंतु या प्रकारच्या निर्णयाची सुरूवात इंदिरा गांधी पर्वाच्या शेवटच्या पाच वर्षात सुरू झाली होती. राज्यसंस्थेने, सार्वजनिक क्षेत्रातील निर्णय बदले. राज्यसंस्थेने खाजगी क्षेत्राला गुंतवणुक करण्यास मान्यता देण्यास सुरूवात केली. त्यामुळे शेती, सहकार, शिक्षण, पाणी, वीज, औषधनिर्माण अशा नानाविध क्षेत्रामध्ये उत्पादन खाजगीमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेतला गेला. इंजिनियरिंग व मेडिकल अशा दोन क्षेत्रात नव्वदीच्या आधीच खाजगीकरणाचा निर्णय झाला. वीजेच्या क्षेत्रात एन्रॉन या प्रकल्पाचा निर्णय झाला. नव्वदीच्या नंतर 'खाऊजा' असा स्वतंत्र निर्णय घेतला गेला (खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण). याच आर्थिक सुधारणांच्या आरंभीच्या टप्यात राज्यसंस्थेने नियंत्रणात्मक कायद्यांच्या संदर्भात विविध निर्णय घेतले. त्यामुळे राज्यसंस्थेचा कायदा व्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधी गेला. तीन, मणिपूर, काश्मिर अशा भागात लष्करी क्षेत्राला अधिकार देण्याचे निर्णय झाले. चार, या बरोबरच साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा शेवट झाला. त्यामुळे जागतिक पातळीवर भारताचे निर्णय बदलले. भारताने खाऊजाच्या संदर्भात अमेरिका केंद्रीत निर्णय घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे एकूण भारतीय आंतरराष्ट्रीय संबंधामधील निर्णयात बदल दिसतो. १९९९-२००४ च्या दरम्यान अमेरिकाकेंद्री प्रवाह सुरू झाला. हा निर्णय भारतीय राजकारणाची दिशा बदलवणारा ठरला. भारताने अणुशक्तीच्या संदर्भातील नवीन निर्णय घेतले. अणुचे प्रयोग अटलबिहारी वाजपेयी सरकारने केले. त्यामुळे एकूण शांततेच्या संदर्भातील निर्णय बाजूला जाऊन त्याऐवजी बळाच्या संदर्भातील निर्णय ही भारताची नवी चौकट जागतिकीकरणाच्या आरंभीच्या टप्प्यात घडली. पाच, हिंदुत्वाचा विचार राज्यसंस्थेने स्वीकारला होता.

## आम आदमी केंद्रित भारत संकल्पना

एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकात आम आदमी भारत संकल्पना उदयास आली. आरंभी मनमोहनसिंग यांनी ही संकल्पना मांडली. त्या नंतर अरविंद




केजरीवाल यांनी ही संकल्पना राजकारणात कृतीशील केली. त्यांनी निवडणूक राजकारणात या सिंध्दातांचे राजकीयिकरण केले. या सिध्दांताची पुढील वैशिष्ट्ये आहेत. एक, आर्थिक सुधारणांचा हा आरंभीचा टप्पा होता. आर्थिक सुधारणांमध्ये राज्यसंस्थेने माघार घेऊ नये, परंतु राज्यसंस्थेने कल्याणकारी निर्णय घ्यावेत असा जोर वाढला. दोन, त्यामुळे मनमोहनसिंग सरकारने विविध प्रकारच्या कल्याणकारी योजनांचे निर्णय घेतले. मनरेगा सारखी योजना त्या सरकारने पुढे रेटली. याबद्दल मोठा वाद खाऊजा निर्णय आणि कल्याणकारी निर्णयामध्ये झाला. या वादामुळे सरकारवर त्यांचा परिणाम झाला. निर्णयांच्या संदर्भात 'लकवा' अशी प्रतिमा उभी राहिली. तीन, त्या पार्श्वभूमीवर अमर्त्य सेन विरोधी जगदिश भगवती-अरविंद पानगाढिया असा वाद सुरू झाला. यांचे प्रत्यक्ष राजकारणातील प्रारूप म्हणजे नरेंद्र मोदींची निर्णय प्रक्रिया व मनमोहनसिंग यांची निर्णय प्रक्रिया अशी तुलना



सुरू झाली. चार, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्याचा विचार या काळात राबवला गेला. उदाहरणार्थ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी या आशियातील पहिल्या विद्यापीठाची स्थापना २००७ साली झाली. इंडियन स्पेस बेस्ट प्रोग्रॅममध्ये संशोधक आणि इंजिनियर्स उपलब्ध व्हावेत या मुख्य उद्देशाने भारत सरकारच्या स्पेस सायन्स डिपार्टमेंट अंतर्गत इस्रो ने या संस्थेची स्थापना केली होती. पाच, स्वातंत्र्यसेनानी भगतसिंग यांच्या कल्पनेप्रमाणे नवा भारत निर्माण करण्याची आम आदमी पक्षाची इच्छा आहे.

## नवभारत: ग्रँड सिद्धांत

नवभारत संकल्पना भाषणांमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडली. या संकल्पनेचे समर्थन भाजपचे राजकीय नेतृत्व करते. विकासाची गती वाढविणारे निर्णय घ्यावेत अशी भूमिका घेतली गेली. उद्योगप्रधान सार्वजनिक निर्णय घेण्यास गती २०१४ नंतर मिळाली. त्यामुळे द्विक्षेत्रीय विकासाच्या ऐवजी एकक्षेत्रीय विकासाचे निर्णय २०१४ नंतर झाले. तसेच 'कौशल्य भारत' ही निर्णयाची चौकट पुढे आले. त्यातून भारत आणि विविध देश यांच्यामध्ये गुंतवणुकीसाठी आग्रह धरला गेला. भारत-अमेरिका संबंधामध्ये सलोख्याचे निर्णय झाले. एकूण आरंभीच्या दोन दशकाच्या तुलनेत शेवटच्या



अमर्त्य सेन



जगदीश भगवती



अरविंद पानगढिया

दोन दशकामध्ये भारतीय निर्णय मध्यम मार्गाकडून - हिंदुत्व मार्गाकडे वळले. त्यामुळे भारतीय निर्णय प्रक्रिया ही मध्यमवर्ग केंद्रीत झाली. मध्यम वर्गाच्या इच्छाशक्तीचा नितीशी केलेला हा नवा करार उदयास आला. त्या करारामध्ये उद्योजक होण्यासाठीचे सर्व निर्णय झाले. उत्पादन वाढीचे सर्व निर्णय झाले. हा एकूण सत्तर वर्षातील निर्णयामधील क्रांतीकारी बदल दिसतो. जागतिकीकरणाच्या आरंभीच्या टप्यात अणुच्या बद्दलचे निर्णय घेतले गेले. तर दुसऱ्या टप्यात सर्जिकल स्ट्राईकच्या बद्दलचे निर्णय घेतले गेले. हा देखिल आंतरराष्ट्रीय संबंधाच्याबद्दलचा महत्त्वाचा निर्णय होता. भारत-पाकिस्तान, भारत-चीन यांच्यासंबंधांमध्ये संघर्षाच्या निर्णयांचे पर्व सुरू झाले. हा मुद्दा भारतीय राजकारणातील अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. भारत हा उद्योगधंद्यांच्या विकासाला महत्त्व देत असला तरी देशांतर्गत उद्योगधंदे आणि देशांतर्गत व्यापार हाच गेल्या तीन-साडेतीन वर्षातील निर्णयांचा कणा राहिलेला आहे. यामुळे गुजराती प्रारूप हे भारतीय निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी आलेले आहे. त्या प्रारूपानुसार भारतीय नियम आणि चौकटीमध्ये व्यापार, उद्योगाचे निर्णय होत आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे निती आयोग हे सांगता येते. नीती आयोगाच्या निर्णयामुळे एकूणच राज्यांवरती केंद्राचे नियंत्रण आले आहे. या अर्थाने

हा निर्णय भारतीय संघराज्याच्या सत्ताअधिकारांचे केंद्राकडे केंद्रीकरण करणारा आहे.

२१ व्या शतकातील भारतीय राजकारणातील पहिली पंचवीस वर्ष २०२५ साली पूर्ण होतील. तेव्हा भारतीय राजकारणाचे स्वरूप कोणते असेल हा एक महत्त्वाचा चित्तवेधक प्रश्न आहे. अर्थातच या प्रश्नाचे उत्तर फार अवघड नाही. कारण  २०१४ मध्ये भारतीय राजकारण आमुलाग्र पद्धतीने बदलले. त्या राजकारणाचे वर्णन नवभारत असे केले जाते. त्या राजकारणाचे पूर्ण स्वरूप २०२५ साली व्यक्त होईल. म्हणजेच हिंदुत्व आणि विकास या दोन संकल्पनांचे हे एक युग आहे. हिंदुत्व आणि विकास यांचा एकत्रित युटोपिया कृतिशील झालेला आहे. एक दशकभर ही हिंदुत्व आणि विकास क्रांती घडत आहे. हिंदुत्व आणि विकास या दोन स्वप्नांची पूर्ती २०२५ साली पूर्ण करण्याचा कार्यक्रम भारतीय राजकारणाचा आहे. म्हणजेच भाजपचा राहील. उदाहरणार्थ मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया, बेटी बचाओ, बेटी पढाओ यासारखे उपक्रम 'न्यू इंडिया'च्या उभारणीसाठी मैलाचे दगड  आहेत. असा योगी यांचा युक्तिवाद आहे.

नवभारताची संकल्पना भाजप सरकारने गेल्या आठ









वर्षात मांडलेली आहे. नवभारत संकल्पना पुढील दोन-तीन वर्षात पूर्ण साकार रूपात अस्तित्वात आलेली दिसेल. या संकल्पनेची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये राजकीय प्रक्रियेमधून व्यक्त झालेले आहेत. एक,  नवभारत संकल्पनेचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे हिंदुत्व या पक्षाचे केंद्रमध्ये आणि राज्यांमध्ये सरकार स्थापन करणे हे एक आहे. भाजपने यासाठी पक्षाचा विस्तार हा एक प्रमुख कार्यक्रम राबविला. भाजपने आघाडीचे सभासद कमी करणे आणि त्या ऐवजी भाजपच्या शक्तीचा विस्तार करणे असे धोरण राबविले. यामुळे आरंभीच्या पाच वर्षात भाजपने पक्षाचा विस्तार केला. तेव्हा नवभारत संकल्पनेने काँग्रेस मुक्त भारत हा कार्यक्रम राबविला होता. दुसऱ्या पाच वर्षांमध्ये भाजपने आघाडी करून आघाडीतील सदस्यांची ताकद कमी केली. उदाहरणार्थ अकाली दल व  शिवसेना इत्यादी. यामुळे सध्या भाजप घराणेशाहीमुक्त भारत अशी संकल्पना राबवत आहे. भाजप या काळात एक पक्ष पद्धती म्हणून विकसित झाला आहे. भाजप वर्चस्वशाली पक्ष पद्धती या स्वरूपात व्यवस्था म्हणून घडला आहे. काँग्रेस ही एक व्यवस्था पन्नाशीच्या आणि साठीच्या दशकात होती. तर भाजप ही व्यवस्था एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दशकात उदयास आली आहे. २०२४ च्या निवडणुकीनंतर भाजप व्यवस्था स्थिर करण्याची संकल्पना राबवली जाणार आहे. दोन, नवभारत या संकल्पनेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे नेतृत्व प्रभावीपणे विकसित केले गेले आहे. नवभारत संकल्पनेमध्ये नेतृत्वाचा हा सर्वात उच्च स्तर आहे. यानंतर राज्याराज्यांमध्ये नेतृत्व विकसित केलेले आहे. राज्यातील नेतृत्व केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाच्या पूर्णपणे नियंत्रणाखाली काम करते. हा नेतृत्वाचा एक पिरॅमिड विकसित झालेला आहे. या प्रकारात उच्च नेतृत्व राज्यराज्यातील नेतृत्वांवरती पूर्ण नियंत्रण ठेवून आहे. उदाहरणार्थ देवेंद्र फडणवीस, शिवराज सिंग चौहान, योगी अशी उदाहरणे सांगता येतील.  तीन, नवभारत संकल्पनेचे नेतृत्व राजकारणाची काटछाट करते. नवभारत संकल्पनेतील

नेतृत्वाने राजकारण आणि अर्थकारण यांची सांगड घातली आहे. वर्ग समन्वय ही संकल्पना नवभारत संकल्पनेतून विकसित केले जात आहे. राज्यकर्ता वर्ग व उद्योजक वर्ग यांच्यामध्ये एक प्रकारचा आर्थिक सलोखा नवभारत संकल्पनेत दिसतो. राज्यकर्ता वर्ग व उद्योजक वर्ग यांच्याशी नव मध्यमवर्गाने जुळवून घेण्याची संकल्पना विकसित केलेली आहे. यातूनच आकांक्षी समूहाची निर्मिती नवभारत संकल्पनेने केलेली दिसते. आकांक्षी समूह उत्सव प्रिय आहे. यामुळे नवभारत ही संकल्पना उत्सवांची निर्मिती करते. उत्सव साजरे केले जातात. उदाहरणार्थ आजादी का अमृत महोत्सव हा उत्सव साजरा केला जात आहे. भारताला मिळालेले स्वातंत्र्य खरे नाही. स्वातंत्र्याचा अर्थ लावलेला बिगर हिंदुत्ववादी आहे. या गोष्टींना नवभारत संकल्पनेचा विरोध आहे. नवभारत संकल्पना सरळ सरळपणे २०१४ नंतर खरे स्वातंत्र्य मिळाले असा अन्वयार्थ लावते. चार, त्याचबरोबर भारतीय संघराज्याचे स्वरूप नव्याने विकसित करणे हे देखील



नवभारत संकल्पनेचे एक उद्दिष्ट आहे. नवभारत संकल्पनेचे हे उद्दिष्ट साकार करण्यासाठी नीती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. निती आयोगाने जागतिकीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याला साजेशा पद्धतीने संघराज्यांची पुनर्रचना सुरू केली आहे. त्यास त्यांनी सहकारी संघराज्य असे म्हटले आहे. अर्थातच ही संघराज्याची संकल्पना आधुनिक भारत या संकल्पनेशी सुसंगत नाही. आधुनिक भारत संकल्पना कल्याणकारी राज्याचा पुरस्कार करण्यासाठी संघराज्य पद्धत विकसित करत होती. नवभारत संकल्पनेतील संघराज्य हे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ करणे हा प्रमुख हेतू साध्य करण्यासाठी संघराज्य पद्धतीला विकसित करत आहे. नवभारत संकल्पनेला स्पर्धात्मक संघराज्याचे संकल्पना अपेक्षित आहे. हे एक वैशिष्ट्य येत्या दोन वर्षात पूर्णपणे विकसित रूपामध्ये पाहायला मिळेल. पाच, नवीन संसदेची संकल्पना या काळात पूर्ण होईल. जुनी संसदेचे संकल्पना आणि नवीन संस्थेची संकल्पना यामध्ये जमीन आसमानाचे अंतर असणार आहे. नवीन संसदेचे संकल्पना नवभारत संकल्पनेचा आशा व्यक्त करणारी असेल. नवीन संसदेमधील प्रतिके आणि आशय पंडित नेहरूंच्या व डॉ. आंबेडकरांच्या संसद संकल्पनेपेक्षा वेगळा आहे. पंडित नेहरू आणि डॉ. आंबेडकरांना संसदेची संकल्पना चर्चा आणि सहमती म्हणून महत्त्वाचे वाटत होती. समकालीन दशकातील नवभारत या संकल्पनेला अभिप्रेत असणारी संसदेची संकल्पना शक्तीप्रधान या स्वरूपाची आहे. यामुळे नवभारत या संकल्पनेचे शक्ती प्रधान संसद हे एक वैशिष्ट्य ठरणार आहे. सहा, नवभारत संकल्पनेला राज्य प्रथम आणि राष्ट्रवादी नंतर अशी संकल्पना मान्य नाही. नवभारत संकल्पना राष्ट्रवाद प्रथम आणि नंतर राज्य अशी भूमिका मांडत आहे. हे नवभारत संकल्पनेचे प्रारूप येत्या तीन-चार वर्षांमध्ये पूर्ण शक्तीने काम करेल. नवभारत संकल्पना राज्यसंस्थेला विकास आणि हिंदुत्व या दोन प्रकल्पांवर काम करण्यास प्रेरणा देते. नवभारताची राज्यसंस्था नवअभिजात उदारमतवादी स्वरुपाची आहे. सात, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे शतक महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने नवभारत संकल्पना हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या कार्यक्रमाचा एक नवीन आशय ठरणार असण्याची शक्यता आहे. नवभारत संकल्पनेमध्ये हिंदुत्व आणि विकास यांची आखीवरेखीव दोन वैचारिक दालने असतील. हे भारतातील हिंदू क्रांतीचे अंतिम वैचारिक रूप ठरेल. अशी वाटचाल सध्या भारतात सुरू आहे. आठ, भारतात २०१४ नंतर नव्याने इतिहास लेखन प्रक्रिया सुरू झालेली आहे. नवीन इतिहास हा नवभारत संकल्पनेच्या चौकटीत लिहिला जात आहे. नवीन इतिहासाची नवीन प्रतिके घडवली जात आहेत. उदाहरणार्थ नवीन संसदेची इमारत, नवीन राष्ट्रीय मानचिन्हाची जडणघडण इत्यादी. नऊ, नवभारत हा ग्रँड सिद्धांत तंत्रस्नेही, डिजिटायझेशन, यांत्रिकीकरण संगणकीकरण ही वैशिष्ट्ये स्वीकारतो. आंतरजालीय विश्व ही या संकल्पनेची मुख्य धारणा आहे. थोडक्यात नवभारत ही संकल्पना २०२५ मध्ये पूर्ण पणे विकसित झालेली असेल. तेव्हा केवळ नवभारत संकल्पनेचे राजकारण घडेल अशी राजकीय प्रक्रिया सध्या घडताना दिसते.

■■




# वैज्ञानिक आणि शेतकऱ्यांमुळे

**विदर्भ वनराईचे अध्यक्ष असलेल्या व माजी आमदार श्री. गिरीश गांधी यांच्या नेतृत्वाखालील कृषी विकास प्रतिष्ठानचा डॉ. सी. डी. मायी कृषी तज्ज्ञ पुरस्कार माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ पत्रकार व कृषी अभ्यासक डॉ. सुधीर भोंगळे यांना १५ जुलै रोजी नागपूर येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात प्रदान करण्यात आला. या सोहळ्यातील शरद पवार यांचे हे भाषण...**



# शेतीच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन


एका चांगल्या कार्यक्रमाच्या निमित्तानं आज आपण याठिकाणी आलो. मला दोन-तीन दिवसांपूर्वी डॉ. मायींचा फोन आला, की याठिकाणी अशा प्रकारचा कार्यक्रम आहे. डॉ. मायी म्हटल्याच्यानंतर आपण गेलंच पाहिजे हे माझ्या मनात आलं आणि मुद्दाम मी याठिकाणी आलो. डॉ. मायी यांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये अनेक वर्षे काम केलंय. त्यांचा खरा विषय जो आहे, तो कापसाच्या संबंधीचा आहे. एकेकाळी कापूस विदर्भ, खान्देश आणि मराठवाडा या विभागातलं अत्यंत महत्त्वाचं पीक होतं. परंतु, त्याला काय मर्यादा होत्या. त्याच्यामध्ये काही संकटं होती. त्याच्यामध्ये काही रोग होते आणि या सगळ्याच्या संदर्भातलं संशोधन अखंडपणानं केलं पाहिजे, यासंबंधीचा आग्रह जाणकारांचा होता.














आणि त्या संशोधनाच्या संदर्भात ज्यांचं योगदान आहे, या मालिकेमध्ये डॉ. मायींचा उल्लेख प्रामुख्यानं करावा लागेल. मी आत्ताच त्यांना सांगत होतो, की काही वर्षाच्यापूर्वी डॉ. भाले नावाचे गृहस्थ कॉटनच्या क्षेत्रामध्ये मुलभूत काम करणारे संशोधक होते. ते आता हयात नाहीयेत. परभणीला ते काम करायचे आणि डॉ. भालेंनी जसं या क्षेत्रामध्ये काम केलं, तसंच आणखी उत्तम काम हे डॉ. मायींनी केलेलं होतं.

मायी हे मी केंद्रामध्ये शेती खात्याचं काम बघत असताना माझ्याबरोबर होते. दोन महत्त्वाची कामं त्यांच्या कालखंडामध्ये झाली. आणि एक सगळ्यात महत्त्वाचं काम, की त्या काळामध्ये संबंध देशाचे ॲग्रीकल्चर कमिशनर म्हणून त्यांच्यावर जबाबदारी होती, आणि संबंध देशातल्या शेतीला एक वेगळी दिशा देण्याच्यासंबंधीचं कामकाज कृषी भवनातनं जे झालं, त्याच्यामध्ये त्यांचं योगदान फार मोठं आहे. तो कालखंड संपल्याच्यानंतर असंच एक दिवशी माझी आणि त्यांची भेट झाली, आणि मला त्यांनी विचारलं, मीच त्यांना विचारलं, की आता काय, नागपूरला जायचं की काय. ते म्हणाले, हो, नागपूरची तयारी आहे. मी म्हणालो, की आणखी एक अपुरं काम आहे ते करायचंय. आपल्या देशामध्ये कृषी संशोधन इन्स्टिट्यूशन्स अनेक आहेत. ८०च्यापेक्षा जास्त संस्था आहेत, की ज्याठिकाणी संशोधनाचं काम होतं. आणि या संशोधनाचं काम करणाऱ्या ज्या संशोधन इन्स्टिट्यूट्स आहेत, त्याच्यामध्ये शास्त्रज्ञांची भयंकर कमतरता होती. एक दिवशी मी त्याचा अभ्यास केला, तर माझ्या लक्षामध्ये आलं, की संबंध देशामध्ये कृषी आणि तत्सम क्षेत्रामध्ये वैज्ञानिक म्हणून काम करण्याच्यासाठी आवश्यक असलेल्या किती जागा रिक्त आहेत हे बघितल्याच्यानंतर माझ्यासमोर आकडे आले, की पाच हजार शास्त्रज्ञांची जागा या देशात रिक्त होती. कशी शेती सुधारायची? कसे शेतीच्या संदर्भातले सगळे विभाग सुधारायचे?

मी डॉ. मायींना सांगितलं, की मायी तुम्हाला काय जाता येणार नाही. आम्ही एक नवीन संस्था करतोय आणि त्या संस्थेचं अध्यक्षपद तुम्ही घ्या आणि त्या संस्थेची जबाबदारी या देशात पाच हजार शास्त्रज्ञांची जी कमतरता आहे, ती या देशातल्या नव्या कर्तृत्ववान पिढीला एकत्रित करून त्यांच्याकडून वैज्ञानिक दृष्टी असलेल्या उत्तम



समारंभात शरद पवार यांच्याशी संवाद करताना डॉ. सुधीर भोंगळे

शास्त्रज्ञांची निवड तुम्ही करा आणि ही हिंदुस्थानची गरज भागवा. हे काम त्यांनी आपल्या खांद्यावर घेतलं आणि पाच हजार शास्त्रज्ञ शेती आणि तत्सम क्षेत्रामध्ये आज देशामध्ये जे उपलब्ध झाले, त्या सगळ्यांची निवड डॉ. मायी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली. दुसरी एक गोष्ट महत्त्वाची, की कृषी खात्यामध्ये अशा प्रकारच्या निवडी करायच्या असतात, त्या केल्याच्यानंतर काही दिवस हा काहीतरी वाद निर्माण होत असतो, वर्तमानपत्रामध्ये रकानेच्या रकाने भरून येतात, की याची निवड योग्य नाही. याची निवड पार्सलिटीने झाली. याच्यामध्ये असं झालं. त्याच्यामध्ये तसं झालं. पण पाच हजार शास्त्रज्ञांची निवड झाल्याच्यानंतर संबंध देशातनं एकसुद्धा तक्रार आली नाही. अशा दर्जाचं काम त्याठिकाणी थेट त्यांच्याकडून केलं गेलं आणि त्यामुळं मला आनंद आहे, की आमचे सहकारी गिरीश गांधींनी त्यांच्या नावानी हा उपक्रम हातामध्ये घेतलेला आहे आणि आनंद एका गोष्टीचा आहे, की ते निवृत्त जरी झाले तरी शेतीच्या संदर्भातली आणि शेतकऱ्यांच्या संदर्भातली त्यांची जी बांधिलकी आहे, त्याच्यापासून ते यत्किंचीतही दूर नाहीत आणि त्यांनी हे काम अखंडपणानं चालू ठेवलेलं आहे.



दुसरा सन्मान याठिकाणी केला, तो डॉ. सुधीर भोंगळे यांचा. आम्ही एका जिल्ह्यातले. माझ्या लोकसभा मतदारसंघातले त्यांचं गाव. सासवड आणि तो सगळा परिसर एक आगळावेगळा परिसर आहे. अनेक उत्तम लेखक त्याठिकाणी तयार झाले. आचार्य अत्रेंच्यासारखा या देशामध्ये मराठी भाषेला आणि

मराठी भाषेच्या माध्यमातून अनेक प्रकारचं उत्तम लिखाण करण्याच्यासंबंधीची बलाढ्य कामगिरी ज्यांनी केली, ते आचार्य अत्रे यांचाही जन्म त्यांच्याच परिसरातला होता. असे अनेक लोक त्याठिकाणी होते. तो सगळा परिसरा हा एका दृष्टीनं अतिशय लहान शेतकऱ्यांचा, पाण्याचं दुर्भिक्ष्य असलेला, पण कष्टाळू शेतकऱ्यांचा आणि आपल्याला कदाचित माहित असेल किंवा नसेल, आज पुणे आणि मुंबई शहराला दैनंदिन घरामध्ये लागणारा रोजचा ताजा भाजीपाला हा सासवड परिसरामध्ये तयार होतो आणि तो पुरविला जातो. आणि म्हणून तिथला प्रत्येक शेतकरी, लहान शेतकरी, एक एकर, दोन एकर, तीन एकर, तीन किंवा चार एकराच्या वर शेती असली तर तो फार मोठा शेतकरी म्हणून त्या भागात ओळखला जातो. पण त्या एका एकरात किंवा दोन एकरामध्ये लाखामध्ये उत्पादन घ्यायचं याची सवय त्या भागातल्या सगळ्या शेतकऱ्यांना आहे. त्यामुळं शेतीशी बांधिलकी असलेल्या त्या परिसरात भोंगळेसुद्धा जन्माला आले आणि लहानपणापासून शेतीच्यासंबंधीची आस्था ही त्यांना घरामध्ये सतत पाहायला मिळाली आणि तो विचार त्यांनी आजपर्यंत सोडलेला नाही.

अनेक लिखाणं केली, अनेक वादग्रस्त प्रश्न झाले, त्या प्रश्नांच्या संदर्भात तज्ज्ञांचा सल्ला घेऊन वास्तव भूमिका मांडण्याचं काम त्यांनी केलं. पुस्तकं लिहिली आणि त्यामुळं साहजिकच आहे, की या क्षेत्रामध्ये प्रचंड योगदान केल्याचा आनंद हा त्यांना जसा मिळतो, तसा लाखो शेतकऱ्यांनासुद्धा मिळतो आणि त्यामुळं त्यांचाही याठिकाणी आज सन्मान आणि सत्कार केला त्याबद्दल मला स्वत:ला मनापासूनचा आनंद आहे. कृषी तज्ज्ञ पुरस्कार आणि हा कृषी विकास प्रतिष्ठानच्यावतीनं हे दोन्ही घेतलेले कार्यक्रम हे अत्यंत महत्त्वाचे कार्यक्रम आहेत. अत्यंत उपयुक्त आहेत आणि या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांना प्रोत्साहित करणारे आहेत. याचा मला मनापासूनचा आनंद आहे.

शेतीच्या क्षेत्रातलं संशोधन, याचं काम देशामध्ये अनेक लोकांनी केलं. आपल्या सगळ्यांना महात्मा जोतिबा फुले किंवा सावित्रीबाई फुलेंचं नाव घेतलं तर स्त्री शिक्षणाबद्दलचं त्यांचं योगदान होतं. शिक्षणाच्यासाठी त्यांनी मोठं काम केलं. या सगळ्या गोष्टी आपल्यापुढं येतात. पण आपण संबंध जोतिबा फुल्यांचा बारकाईनं इतिहास वाचला, तर शेती, पाणी या क्षेत्रामध्ये त्यांना प्रचंड आस्था होती. एकच गोष्ट मी मुद्दाम सांगू इच्छितो. आपण मुंबईमध्ये जर गेलात, तर समुद्राच्या कडेला एक गेट वे ऑफ इंडिया



**वाढदिवसानिमित्त डॉ. सी. डी. मायी यांचा शरद पवार व नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तेव्हा शेजारी डॉ. सुधीर भोंगळे**



नावाची कमान उभारली आहे. ते गेट जे बांधलं ते इंग्लंडच्या राजाचं स्वागत करण्यासाठी बांधलं. ताजमहल हॉटेलच्या जवळ आहे ते. आणि त्याठिकाणी इंग्लंडच्या राजाचं स्वागत करण्यासाठी संबंध इंग्रजांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संस्थानिक उपस्थित होते. त्याच गेटच्या एका कोपऱ्यात एक खेडूत उभा होता. डोक्यावर फेटा, खांद्यावर उपरणं, हातात काहीतरी एक कागद. राजा आला. त्याची बोट लागली. राजा उतरला आणि पोलिसांनी सगळ्यांना बाजूला केलं. त्याच्यामध्ये या काष्टकऱ्यालासुद्धा बाजूला केलं. चुकून का होईना त्या राजाची नजर त्याच्याकडे गेली. त्यानं अधिकाऱ्यांनी विचारलं, की कोण आहे हा माणूस, त्याला कशाला हाकलून लावतांय. त्याला बोलवा. अधिकाऱ्यांनी महात्मा फुल्यांना बोलवलं. त्यांच्या हातात एक पत्र होतं. निवेदन द्यायचं होतं आणि ते निवेदन काय होतं? निवेदन असं होतं, की त्या काळामध्ये दुष्काळ पडला होता आणि दुष्काळ पडल्यामुळं दुष्काळग्रस्तांना रोजी-रोटी देण्याच्यासाठी खडी फोडायचं काम त्यावेळच्या इंग्रज सरकारनं दिलं होतं. महात्मा फुल्यांनी त्या निवेदनाद्वारे सांगितलं, की खडी फोडायचं काम द्यायच्याऐवजी पडणाऱ्या पावसाचा थेंब न् थेंब हा अडवला आणि भूगर्भातली पाण्याची पातळी वाढवली तर या दुष्काळातून सुटका होण्याची शक्यता आहे. ही पहिली मागणी त्याठिकाणी केली. पाण्याचा संचय हा महत्त्वाचा भाग आहे आणि ते ब्रिटीश सरकारनं करावं.

दुसरी मागणी त्यांनी अशी केली, की झाडं लावण्याचा कार्यक्रम घेतला पाहिजे. आणि तिसरी गोष्ट त्यांनी त्याच्यात सांगितली, की आमचा शेतकरी हा दुधाचा धंदा करतो. त्याच्या दारामध्ये चार-दोन गायी असतात. पण तीच ती गाय आणि तिच्यापासून तयार झालेला वळू, त्यामुळं पुढं चांगल्या दर्जाचं बीज हे तयार होत नाही आणि त्याच्यात सुधारणा करायची असेल, तर विलायतेतून वळू पाठवा आणि नवीन संकरित जात याठिकाणी तयार करा. ती अधिक दुधाची तयार झाल्याशिवाय राहणार नाही. कास्तकाराला उत्पन्नाचं एक साधन मिळेल. जोतिबा फुल्यांची ही सगळी मागणी आणि म्हणून आज आपण संशोधनाच्या क्षेत्रामध्ये माळींनी काम केलं, त्याचा आनंद आहे आपल्या सगळ्यांना पण १८८२ साली एक कुणीतरी जोतिबा फुल्यांसारखं व्यक्तिमत्व इतका विज्ञानावर आधारित असलेल्या सगळ्या गोष्टींच्या मागण्या राज्यकर्त्यांकडे करत होतं अशी दृष्टी असलेले अनेक लोक या देशामध्ये, या राज्यामध्ये सामान्य कुटुंबातसुद्धा जन्माला आले ही शेतीच्या दृष्टीनं आणि अर्थकारणाच्या दृष्टीनं भाग्य आहे. अशा अनेक गोष्टी त्याठिकाणी सांगता येतील. मी अधिक याठिकाणी आपल्या सगळ्यांचा वेळ घेऊ इच्छित

नाही.

या देशाच्या शेतीमध्ये प्रचंड परिवर्तन झालेलं आहे. मला आठवतंय, की शेती खात्याची सूत्रं ज्यावेळी मी घेतली. त्यावेळी माझ्याकडं दोन कामं दिली होती. एक शेती खात्याचं मंत्रिपद आणि अन्न पुरवठा खात्याशी संबंधित मंत्रीपद. मी शपथ घेतली आणि पहिली फाईल माझ्याकडं आली आणि त्यावेळचे माझे सचिव हे माझ्याकडे फाईल घेऊन आले. त्या फाईलमध्ये प्रस्ताव होता, की या देशात अन्नधान्याची टंचाई आहे आणि म्हणून ब्राझीलवरनं किंवा अमेरिकेवरनं आणि ऑस्ट्रेलियावरनं गहू आयात करायचा देश की देखी आपने. मी म्हणालो, हाँ देखी. ते म्हणाले, की जल्दी करीये, देर मत किजीये. अन्यथा अनाज की समस्या देश में पैदा हो जायेगी. नाइलाजानं मी सही केली आणि धान्य इम्पोर्ट करायचा हा निर्णय मान्य केला. पण त्याच्यानंतर मी ठरवलं, की काय वाट्टेल ते झालं, आयात थांबवायची. यापुढे या देशाच्या भुकेचा प्रश्न सोडवण्याच्यासाठी भारताच्या बाहेरच्या शेतकऱ्यांवर अवलंबून राहायचं नाही. इथेच प्रश्न सोडवायचा. त्यासाठी कष्टकरी शेतकरी होता. पण, त्या शेतीला विज्ञानाची जोड, त्या शेतीला बायो टेक्नॉलॉजीची सुद्धा जोड याची आवश्यकता होती आणि त्या दृष्टीनं अनेक

**शरद पवार यांनी केंद्रात कृषीमंत्री असताना अत्यंत दुःखद अंतःकरणाने गहू आयातीचा निर्णय घेतला पण फाईलवर सही करताना देशाला अन्नधान्यात स्वयंपूर्ण करण्याचा निर्धार करून तो पूर्णत्वाला नेला.**



आहे. मी अतिशय अस्वस्थ झालो. पहिली फाईल काय, तर परदेशातून धान्य आणायचं. म्हणायचं आपण शेतीप्रधान देश आणि परकीयांच्या अन्नधान्यावर जगायचं ही काय चांगली गोष्ट नाही. मी काही सही केली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला मनमोहनसिंगांचा फोन आला आणि ते मला म्हणाले, की पवारजी, कुछ गेंहू इम्पोर्ट करने का प्रपोजल आप के पास भेजा हैं. अब तुम देखो. मी सांगितलं, हा मैने देखा हैं. ते म्हणाले, की टॉप की पोझिशन गोष्टी आम्ही त्या क्षेत्रामध्ये केल्या. त्या दहा वर्षांच्या कालावधीत देशातल्या या सगळ्या वैज्ञानिकांशी अतिशय घनिष्ठ संबंध आले. त्यांच्या माध्यमातून या सगळ्या शेतीच्या संबंधातलं परिवर्तन करायला आम्ही लोकांनी जी पावलं टाकली त्यामुळं आज अन्नधान्याचा प्रश्न हा या देशाचा राहिलेला नाही.

मला मनापासूनचा आनंद आहे, की ज्यावेळेला मी कृषी खात्याचा कार्यभार सोडला, त्यावेळी भारत जगातला

दोन नंबरचा गहू एक्स्पोर्ट करणारा देश झाला होता. तर जगातला एक नंबरचा तांदळाचं उत्पादन करणारा देश झाला होता. जगात भाजीपाला आणि फळांची निर्मिती करणारा एक नंबरचा देश भारत झाला होता आणि जगातला एक नंबरचा दुधाचं उत्पादन करणारा देश हा भारत झाला होता. हे भारताचं परिवर्तन होतं. अशी अनेक क्षेत्रांत आपण कर्तृत्वं दाखवली आहेत आणि हे सगळं दाखवलं. हे केलं कुणी? वैज्ञानिकांनी आणि शेतकऱ्यांनी. वैज्ञानिकांनी संशोधन केलं. नवीन रस्ता दाखवला. कास्तकरांनी त्या रस्त्याचा स्वीकार केला आणि आपल्या शिवारात प्रत्यक्ष काम केलं. त्यामुळं आज हिंदुस्थान एक वेगळ्या प्रकारचा देश झालेला आहे. पंजाब, हरियाना तिथंही एकेकाळी धान्य होतंच होतं. पण किती होत



होतं.
आज आपल्या सगळ्यांना ठाऊक आहे. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव नेहमी आपण घेतो. धम्म परिवर्तनाचा ऐतिहासिक निर्णय त्यांनी इथं घेतला होता. लोकांच्या नजरेसमोर बाबासाहेब आंबेडकर म्हटलं, की देशाची घटना येते. घटना निर्माण करण्याचं मोलाचं काम त्यांनी केलं त्यासंबंधीची चर्चाच करायची कारण नाही ही वस्तुस्थिती आहे.

पण बाबासाहेबांची दुसरी एक बाजू आहे, ती अजून देशाला नीट समजलेली नाही. आपल्यापैकी अनेकांना ठाऊक असेल आणि काही लोकांना ठाऊक नसेल, की स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये इंग्रजांच्या काळात एक स्थानिक नेतृत्वाचं केंद्रीय मंत्रिमंडळ तयार झालं होतं. त्या मंत्रिमंडळामध्ये जलसंधारण आणि ऊर्जा विभागाचं मंत्रिपद हे बाबासाहेबांच्याकडं होतं. त्या काळात पाण्याचा मुलभूत विचार हा बाबासाहेबांनी केला होता आणि खऱ्या अर्थानं या देशाची गरज भागवायची असेल तर पाण्याचा संचय केला पाहिजे, धरणं बांधली पाहिजेत आणि ते पाणी शेतकऱ्याच्या शिवारामध्ये नेलं पाहिजे. यासंबंधीचा विचार त्यांनी केला आणि या देशात भाक्रा आणि नांगल ही सगळ्यात मोठी जी धरणं होती ती धरणं बांधण्यासंबंधीचा निर्णय ज्या फाईलमध्ये घेतला गेला, त्या निर्णयाची फाईल डॉ. बाबासाहेबांनी अप्रूव्ह केली आणि ते करत असताना विद्युतनिर्मितीशिवाय गत्यंतर नाही आणि म्हणून पाण्याच्या माध्यमातून वीज तयार होऊ शकते आणि जिथं अधिक विद्युतनिर्मिती झाली ती ज्याठिकाणी वीज नाही त्याठिकाणी नेली पाहिजे हा विचार बाबासाहेबांच्या मनामध्ये आला आणि त्याच्यासाठीची पायाभूत यंत्रणा ही उभी केली पाहिजे हा निर्णय बाबासाहेबांनी घेतला होता आणि त्यामुळं संबंध देशामध्ये जिथं वीज कमी त्याठिकाणी ही वीज येऊ शकली. आणि म्हणून शेती आणि त्या क्षेत्रातलं परिवर्तन यामध्ये जसं वैज्ञानिकांनी मोलाचं काम केलं, तसं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचंही मोठं योगदान होतं त्याची नोंद ही आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे म्हणून मुद्दाम याठिकाणी या सगळ्या गोष्टींचा उल्लेख केला.

डॉ. माई आणि डॉ. भोंगळे या दोघांचाही याठिकाणी सन्मान केला. मला आनंद आहे. माझी खात्री आहे, या दोघांनी जसं काम केलं, तशाच प्रकारचं काम इतरांकडून होण्यासाठी या सन्मानानं नव्या वैज्ञानिकांना एक प्रकारचं प्रोत्साहन मिळाल्याशिवाय राहणार नाही आणि ती भूमिका घेऊन या क्षेत्रात काम करण्याचा निर्णय गिरीश गांधी आणि त्यांचे सहकारी करतायंत, या सगळ्यांना धन्यवाद देतो. त्यांचं अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■

# कृषी क्षेत्रातील भोंगळेंचे योगदान अविस्मरणीय





**महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये, महाराष्ट्र राज्य झाल्यापासून कृषी क्षेत्रामध्ये ॲप्रोप्रिएट, परिपूर्ण, रिसर्चच्या आधारावर आणि शेतकऱ्यांना समजेल अशा प्रकारची पत्रकारिता करून हे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणारा सगळ्यात प्रथम क्रमांकाचा पत्रकार कुणी असेल तर सुधीर भोंगळे असं मी अभिमानानं म्हणू शकतो.**

# नदीजोड, अन्नदाता ते ऊर्जादाता कार्यक्रम भोंगळेंनी हाती घ्यावा

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांची सूचना

खरं म्हणजे आजच्या या कार्यक्रमामध्ये डॉ. सी. डी. मायी यांनी आपल्या विदर्भाचे भूमीपुत्र असताना कृषी विकासामध्ये जे उत्तम कार्य केलेले आहे, त्याचा आपल्या सगळ्यांना नीट परिचय आहे. मला विशेषरूपाने जास्त परिचय याकरिता आहे, की गेल्या १३ वर्षांपासून आम्ही ॲग्रो व्हिजन भरवतो, ३० ते ४० विषयांवर सेमीनार होतात आणि विशेषत: ३ लाखापेक्षा जास्त शेतकरी त्याला भेट देतात. हा सगळा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये डॉ. मायींचा अनुभव, त्यांचे मार्गदर्शन आणि तज्ज्ञ मंडळींशी त्यांचा असणारा संबंध ही आमची खूप मोठी स्ट्रेंथ आहे. त्यामुळे दरवेळी डॉ. मायींचं मार्गदर्शन त्यासंदर्भात मिळत असतं.





खरं म्हणजे विदर्भामध्ये ज्यांनी कृषी क्षेत्रात चांगलं काम केलं अशा व्यक्तीच्या, डॉ. मायींच्या नावानं गिरीशभाऊंनी हा पुरस्कार ठेवला आणि आज हा सुधीर भोंगळेंना दिला पवार साहेबांच्या हस्ते, हा खरोखर आम्ही दोन्ही लोक असे आहेत की अनेकवेळा सत्काराच्या कार्यक्रमाला आम्हाला जावं लागतं, भाषणही करावं लागतं. पण दरवेळेला मनापासून बोलताना अडचण होत असते. परंतु, आजच्या सत्कारामध्ये ही अडचण नाहीये. मी विधानमंडळात काम करत असल्यापासून सुधीर भोंगळेंना ओळखतो. विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये मी जेव्हा विधानमंडळात होतो, त्यावेळी सकाळमध्ये कृषी विषयावर लिखाण लिहिणारे एक उत्तम पत्रकार म्हणून सुधीर भोंगळेंचा परिचय होता. त्यावेळी अतिशय उत्तम आणि चांगले लेख कृषी क्षेत्राशी संबंधित त्यांचे सकाळमधून यायचे. विशेषत: सकाळची ही परंपरा राहिली आहे, की आजदेखील सकाळचं ॲग्रोवन मी दिल्लीत असो, किंवा नागपुरात असो पहिल्यांदा जर कोणती पुरवणी चाळत असेन तर ती ॲग्रोवनची असते, इतकं चांगलं लिखाण त्याच्यामध्ये छापून येतं.





सुधीरचा या सगळ्या विषयाशी संबंध होता. पण विशेषत: महत्त्वाची एक गोष्ट अशी आहे, की सुधीरनी एक पत्रकार म्हणून इंग्लिशमध्ये ज्याला जिनियस असा शब्द आहे, सुधीर हा खऱ्या अर्थानं एक जिनियस पत्रकार आहे आणि त्यानी जल व्यवस्थापनामध्ये, शेतीमध्ये अध्ययन करून, संशोधन करून त्याच्यावर उत्तम लिखाण करून ते जगाच्यासमोर मांडण्याची कला त्याला हस्तगत आहे. खरं म्हणजे डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी त्यांना पंजाबराव देशमुखांच्याबरोबर, त्यांच्या जीवनावर दोन गोष्टींबद्दल, एक तर कृषीमंत्री म्हणून त्यांनी केलेलं कार्य आणि विशेषत: ते एवढे विद्वान होते, ज्याची बाजूही आपल्या सगळ्यांना माहिती नव्हती, त्यामध्ये त्यांच्या वैदिक धर्माच्यासंदर्भातलं त्यांनी दोन अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तकं तयार केली. सुधीरजींनी विशेषत: इस्राईलच्या शेतीसंबंधीची दोन पुस्तकं अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीनं लिहून प्रकाशित केली. याकरता ही महत्त्वाची आहेत, की मी नेहमी सांगतो, की नॉलेज ही पॉवर आहे. इनोव्हेशन, इंटरप्रीनरशीप, सायन्स, टेक्नॉलॉजी, रिसर्च, स्कील ॲंड सक्सेसफुल प्रॅक्टिसेस वुई नेम इट ॲज नॉलेज ॲंड कन्व्हरशन ऑफ नॉलेज इन टू वेल्थ इज द फ्युचर. आणि म्हणून कृषी क्षेत्रामधलं ज्ञान, टेक्नॉलॉजी, इनोव्हेशन, रिसर्च आणि सक्सेसफुल प्रॅक्टिसेस सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचं काम सुधीरनं आपल्या या अनुभवातून, ज्ञानातून एक जिनियस पत्रकार म्हणून केलं. आणि त्यामुळं त्याचं हे योगदान खूप मोठं आहे.

मला कृषी क्षेत्रामध्ये देशात किती पत्रकार लिहितात याच्याबद्दलची तेवढी माहिती नाहीये. पण महाराष्ट्राच्या

इतिहासामध्ये, महाराष्ट्र राज्य झाल्यापासून कृषी क्षेत्रामध्ये ॲप्रोप्रिएट, परिपूर्ण, रिसर्चच्या आधारावर आणि शेतकऱ्यांना समजेल अशा प्रकारची पत्रकारिता करून हे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणारा सगळ्यात प्रथम क्रमांकाचा पत्रकार कुणी असेल तर सुधीर भोंगळे असं मी अभिमानानं म्हणू शकतो. आणि म्हणून सुधीर भोंगळेंचा सत्कार आज पवार साहेबांच्या हस्ते आणि माझ्या अध्यक्षतेखाली होतोय आणि त्यांची निवड झाली ही खूप आनंदाची गोष्ट आहे.

विशेषत: आपल्या सगळ्यांना या विषयाची ताकद किती आहे हे अजून माहिती नाही. याचं कारण आपण फोकस करायला शिकलेलो नाहीये. विदर्भातली आपली अडचण अशी आहे, की आपण ज्याच्यावर फोकस करतो ते आपण एकदम करतो. डीएड कॉलेज, बीएड कॉलेज, प्राथमिक शाळा, फोकस केला. एकदम गावात फिरफिरून काम केलं. पण आता त्याची स्थिती चांगली नाही राहिली. पण शेतीच्या क्षेत्रामध्ये कसं फोकस होऊ शकतं, याची










काही उत्तम उदाहरणं महाराष्ट्रात आणि दुर्दैवानं विदर्भात कमी आहेत. त्यामुळं आपल्या प्रगती आणि विकासाकरता दुसऱ्याला जबाबदार धरण्यापेक्षा आपणच आत्मपरिक्षण करून काय फोकस केलं पाहिजे, ही करण्याची खरी







आवश्यकता आहे.

विशेषत: सुधीरनी पाण्याचा विषय घेतला. मला आज आनंद झाला, की पाणी हाच कळीचा मुद्दा आहे आणि मला वॉटर रिसोर्सेस मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मी सुधीरला दोन विनंत्या करणार आहे, की या देशामध्ये जर ५० टक्क्याच्यावर सिंचन झालं, तर मला विश्वास आहे, की या देशामध्ये एकही शेतकरी आत्महत्या नाही करणार आणि हे जर करायचं असेल तर देशामध्ये पाण्याची कमी बिलकुल नाहीये. देशामध्ये पाण्याच्या नियोजनाची कमी आहे. आणि म्हणून वॉटर रिसोर्सेस मंत्री असताना मी त्यावेळी महाराष्ट्रातले जे प्रकल्प ५० टक्क्यापेक्षा जास्त पूर्ण झाले होते. पण त्यांची कामं अडकली होती, टेंभूपासून म्हैसाळपर्यंत, अशा महाराष्ट्रातल्या जवळपास ६० प्रकल्पांना सहा हजार कोटी रूपये भारत सरकारकडून दिले आणि प्रधानमंत्री सिंचाई योजनेमध्ये पण जवळपास ८० प्रोजेक्टस् घेतले. त्यामागे भावना ही होती, की आपल्या भागात, मी गोसी खुर्दला पैसे दिले, जवळपास ४ हजार कोटी रूपये दिले. हे प्रकल्प जर पूर्ण झाले तर सिंचनाच्या सुविधा प्राप्त होतील आणि सिंचनाच्या विषयावर खऱ्या अर्थानी सगळ्यात जास्त फोकस विदर्भ, मराठवाड्यानी करण्याची आवश्यकता आहे.

आज आपल्या देशामध्ये, मला आठवतंय मी वॉटर रिसोर्सेस मंत्री होतो, आणि मी ज्या विषयावर सुधीरला विनंती करणार आहे, की जो नदीजोड प्रकल्प आहे, एका खोऱ्याचं पाणी दुसऱ्या खोऱ्यात घेणं याच्यावर मी पूर्ण मदत सुधीर तुम्हाला करीन आणि या विषयावर तुम्ही जरूर काम करा. एकंतर ४६ नदीजोड प्रकल्प आहेत. त्यामध्ये जे १६ नदीजोड प्रकल्प आहेत, त्याचे डीपीआर मी तयार करून घेतले आहेत. आणि हे जर केलं तर तामिळनाडूमध्ये मी एकदा फिल्म स्टार रजनीकांत यांच्या घरी गेलो होतो, मी एक योजना तयार केली होती, की गोदावरीचं १३०० टीएमसी पाणी समुद्रात वाहून जातं. त्यावेळी आंध्र प्रदेशमध्ये पोलावरम नावाचा एक मोठा प्रकल्प ६० हजार कोटी रूपयांचा, ज्याचं निर्माण सुरू आहे, त्या प्रकल्पाला मी पुष्कळ मदत केली आणि हा प्रकल्प करूनही पाणी वाया जात होतं. याचं कारण ही जी इरावती नदी आहे, गडचिरोली जिल्ह्यातून, हे जे पाणी छत्तीसगडमधून येतं, त्यात छत्तीसगडचा हिस्सा, मग महाराष्ट्राचा हिस्सा, आणि महाराष्ट्र आणि तेलंगणामध्ये एक वाद होता कालेश्वरम धरणाचा. मला ज्यावेळेस टीआरएसचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव भेटले, मी त्यावेळी वॉटर रिसोर्सेस मंत्री, मी त्यांना सांगितलं, की तुम्ही देवेंद्रजींकडे जा, ते मुख्यमंत्री होते आणि पहिल्यांदा कालेश्वरम धरण पूर्ण झालं. खूप मोठं धरण आहे ते. हे धरण पूर्ण केल्यामुळं तेलंगणाला भरपूर पाणी मिळालं.

त्यामध्ये एक प्रकल्प असा होता, की गोदावरीचं

पाणी कृष्णेत, कृष्णेचं पाणी पेनारमध्ये, आणि पेनारचं पाणी कावेरीमध्ये आणि कावेरीचं पाणी कर्नाटकमधून टेल एंड टू तामिळनाडूमध्ये नेण्याचा प्रयत्न होता. हे जर केलं तर, आज पाण्याची समस्या देशाची नाहीये, पाण्याची समस्या ही अर्ध्या देशाची आहे. पाण्याची समस्या आहे, ती गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र, कर्नाटक, तेलंगणा, छत्तीसगड, त्याच्यानंतर ओरिसा आणि झारखंड या राज्यांमध्ये पाण्याची समस्या आहे आणि आपल्याकडचं पाणी वाहून चाललेलं आहे. मला आठवतं, मी वॉटर रिसोर्सेस मंत्री होतो, सतरा भांडणं या राज्यांमध्ये होती. त्याच्यापैकी काही भांडणं महाराष्ट्र-कर्नाटक आहे, तामिळनाडू-कर्नाटक आहे, हे गुजरातचं दमणगंगा, पिंजाळ अजूनही अडकलेलं आहे. नारपार नर्मदा आणि मला



आठवतंय, की हे पाणीच पाणी आहे आणि काही देणं नाही, घेणं नाही आणि राजकारणात अडकून पडलंय. मी त्या त्या मंत्र्यांना बोलावलं. मी माझ्या पद्धतीनं दरवाजा बंद केला. लाव रे म्हटलं कुलूप याला आणि मी म्हटलं, की प्रश्न सोडवा तर दरवाजा उघडतो. नाहीतर नाही उघडत. तुम्हाला आश्चर्य वाटेल, तेरा राज्यांचं भांडण मी मिटवलं. पंजाब, हरियाना, राजस्थान आणि भांडण हरियाना आणि पंजाबमध्ये पाण्याकरता, पण भारत स्वतंत्र झाल्यानंतर तीन नद्या पाकिस्तानला मिळाल्या, तीन भारताला मिळाल्या, आणि आमच्या तीन नद्यांचं पाणी पाकिस्तानला चाललंय. त्याच्यावर कुणी विचार करायला तयार नाही. मी पंजाबचे मुख्यमंत्री होते त्यावेळी, त्यांना बोलावलं आणि जम्मू-काश्मीरचे राज्यपाल सत्यपाल

मलिक यांना म्हटलं, की त्यांच्या चीफ सेक्रेटरींना पाठवतो आत्ता, ते म्हटले, की ये ये प्रॉब्लेम है. मै क्या करू. म्हटलं, तुम जम्मू-कश्मिरसे साईन कर लो बस. मै चीफ सेक्रेटरी को भेज रहा हूं. तेही भांडण मिटलं. ते पाणी जर आपण हरियानात आणलं, तर राजस्थान, हरियानामध्ये पाण्याचा प्रॉब्लेमच राहात नाही, इतकं पाणी आहे.

आज आपण पुरामुळे त्रस्त आहोत. या रिजनमधलं पाणी त्या रिजनमध्ये नेणं शक्य असेल तर देशात क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळं सुधीर भोंगळेंना आज माझी पहिली विनंती आहे, की आता हे जे ३६ नदीजोड प्रकल्प आहेत, गंगा टू कावेरी, हे कठीण आहे. पण असंभव नाहीये. हे होऊ शकतं आणि हे जर झालं तर आपल्या इथे पाण्याचा प्रश्नच राहणार नाही. आपल्यापेक्षाही जास्त तामिळनाडूचा प्रश्न आहे. तामिळनाडूमध्ये पाण्यासाठी एवढा संघर्ष आहे, कर्नाटकमध्ये आहे. आणि आज या सगळ्या तेलंगणा, आंध्र, महाराष्ट्र, राजस्थानमध्ये एवढं पाणी येतं, तिथं एक इंदिरा कॅनॉल आहे, त्याचं केवळ सिमेंटचं लाईनिंग केलं, २२०० कोट रूपये दिले तर राजस्थानमधले सात जिल्हे पाण्याखाली आले. बादल साहेबांचं गाव पंजाबमध्ये, तिथं दलदल तयार झाली होती. कारण कॅनॉल फुटले होते. पण कॅनॉल दुरूस्त करायलाही भांडणं. त्यामुळे आपल्या देशामध्ये पाण्याची जी समस्या आहे, त्याच्यावर सुधीरनी जरूर काम करावं आणि मला वाटतं, की हे सत्य जर का समोर आलं तर आपल्या देशातला सगळ्यात मोठा प्रश्न सुटल्याशिवाय राहणार नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट सुधीरनी आपल्याला उत्तमरितीनं सांगितली. की आपण तांदूळ लावतो. आता गोसी खुर्द झालं. म्हणून तांदूळ लाऊ आणि तांदूळ सोडायला तयार नाही. तुम्ही जरा फार स्पष्ट बोललो हे फार बरे झाले. मी हे सांगून ऐकत नाहीत. बैलं जशी एका चाकोरीतून चालतात, तसंच समाजमन पण झालंय. एकाच चाकोरीतून चालतो. इकडे तिकडे नाही पाहात. आता एवढा प्रॉब्लेम आहे, की देशामध्ये तांदूळ सरप्लस, देशामध्ये गहू सरप्लस, देशामध्ये मका सरप्लस, देशामध्ये साखर सरप्लस. आता तुम्हाला २८० लाख टन साखर लागते देशाला, आणि आपलं उत्पन्न मागच्या वर्षीचं यावर्षी झालं ते ३४० लाख टन आणि यावर्षी ३८० लाख टन होणार आहे. म्हणजे हे जे संकट आहे याच्यामध्ये आपल्याला क्रॉप पॅटर्न बदलवला पाहिजे आणि हे सुधीरसारख्या पत्रकाराने, त्यातला अभ्यास करून लोकांना सांगत आहे.

आज कापसाला भाव का मिळतोय. कापसाला भाव बांगलादेशमुळं मिळतोय. बांगलादेशमध्ये कापूस नाही होत. पण विदर्भातला सगळा कापूस जातो बांगलादेशमध्ये. सूत कपडा आणि बांगलादेश रेडिमेड गारमेंटमधलं जगातलं सगळ्यात मोठं सेंटर आहे. आणि आता आम्ही प्रयत्न केलाय, की वर्धेला आम्ही ड्रायपोर्ट केलांय, म्हणजे समुद्र आणला आणि जालन्याला आणलेला आहे. येत्या पंधरा ते वीस दिवसांमध्ये यावर्षी आपला कापूस हा






वर्धेवरून हल्दियाला आणि हल्दियामध्ये बार्जमध्ये टाकून आपल्यासाठी सूत आणि कपडा हा बांगलादेशमध्ये नेण्याची योजना आता फायनल झाली आहे. बांगलादेशच्या प्रधानमंत्र्यांशी मी बोललो. गृहमंत्र्यांशी बोललो आणि आता सगळ्या ज्या परमीशन होत्या त्या सगळ्या मिळाल्या आणि आपल्या देशामध्ये सहा ठिकाणी मी रस्ता बांधला बांगलादेशमध्ये जाण्यासाठी, पूल बांधले. बांगलादेशच्या मागणीमुळं इथं कापसाला भाव मिळाला. आता गुजरातमधला किंवा विदर्भातला कापूस जेएनपीटीमध्ये जातो. जेएनपीटीतून कंटेनर जातो कोलंबोला. आणि कोलंबोला वळसा टाकून तो जातो चितगावला. मुंबईतलं ट्रॅफिक जाम काहीच नाही. याच्या तीन-चार पटीनं ट्रॅफिक जाम चितगावला असते. जहाजच महिना-दीड महिना खाली होत नाही. त्यामुळं एका कंटेनरचा किराया झाला पाच लाख रूपये आणि आता विदर्भातून करणार आहोत त्याचा किराया होईल दीड लाख रूपये. त्यामुळं विदर्भातली इकॉनॉमिक व्हायबिलिटी वाढेल आणि विदर्भातला सगळा कापूस आणि सूत जर बांगलादेशात गेला, तर डॉलरमध्ये आपल्याला पैसे मिळतील आणि आपल्याला भाव चांगला मिळणार.

अजूनही काही विषय आहेत. मी मायी साहेबांना नेहमी म्हणतो, की मला काही समाधान नाही. अमेरिकेमध्ये एका एकरामध्ये आत्ता तीस क्विंटल सोयाबीन, ब्राझीलमध्ये २८ क्विंटल सोयाबीन, अर्जेंटिनामध्ये २९ क्विंटल सोयाबीन आणि माझ्या घरी साडे चार क्विंटल सोयाबीन. आहे कुणी तुमच्यापैकी, की ज्याने दहा पोत्यापेक्षा जास्त सोयाबीन काढलांय. का नाहीये. मग आम्हाला कृषी विद्यापीठाचा उपयोग काय. केवळ यांचा सातवा वेतन आयोग देण्यापुरता. मला माफ करा. मला आत्ता त्यांनी डी.लीट दिलीय, त्यामुळे ते नाराज होतील, पण मी त्यांची क्षमा मागून सांगतो, की आम्हाला असं संशोधन पाहिजे, त्यात काही अडचणीही आहेत, की आम्हाला एकरी वीस क्विंटल कापूस झाला पाहिजे. मी एच फोर लावला, वरलक्ष्मी लावला, सगळे प्रयोग केले. मी लॉ कॉलेजमध्ये शिकत होतो. खूप मेहनत केली. लुनावरुन गावाला जायचो आणि ती त्यावेळी नानाजी वैद्य सांगायचे ते निमकर लावलं. त्या काळात मला एक लाख रूपयाचा कापूस झाला आणि मी हिशोब केला, तर माझा खर्च झाला ९० हजार रूपये. हे प्लॅनोफिक्स लावा, इंडो सल्फान लावा, लावता लावता पुरा पैसा त्याच्यात खर्च झाला. हातात काहीच भेटत नाही. हा प्रॉब्लेम आहे. तुम्ही आम्हाला उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढवून देण्याची योजना सांगा आणि एकरी वीस क्विंटल कापूस झाला पाहिजे. कमीत कमी २५ क्विंटल सोयाबीन झालं पाहिजे.

आणि आता तर फळाच्यामध्ये स्थिती अशी आहे, की आमच्या इथे मुंबई आणि दिल्ली, आपण कुठल्याही श्रीमंत माणसाच्या लग्नात जा, आणि शेवटी ती फळं असतात, मी हमखास जातो, एक फळ भारतातलं नाही. सगळी इम्पोर्टेड. आणि आपल्या इथलं







उदाहरण आहे नाशिकचं, शिंदेंचं सह्याद्री फर्म, पंधराशे कोटी रूपयांची द्राक्षं ते निर्यात करतात. आणि हर्षवर्धनजी तुमच्याकडची संत्री किती निर्यात होतात. मग जर शिंदे ते करू शकतात, तर हर्षवर्धन का करू शकत नाहीत, हाच विदर्भ आणि इतरातला फरक आहे. याला जबाबदार आपण आहोत. आणि म्हणून येणाऱ्या काळामध्ये आपल्याला क्वालिटी. आता आम्ही परवा ऑरेंज रिसर्चमधून जॉईंट व्हेंचर केलं, दोन गोष्टी सुधीर आपण पण लिहा, आणि तुम्ही सगळेजण ठरवा, की आपल्या प्रत्येक जिल्ह्यात पन्नास नर्सरी असल्या पाहिजेत. अमरावती जिल्ह्यातल्या वरूड मोर्शीच्या सगळ्या नर्सरींचं जॉईंट व्हेंचर ऑरेंज रिसर्च इन्स्टिट्यूटबरोबर करा आणि तिथली मोसंबी, तिथली लिंबू, तिथलं संत्रं आणि आता सह्याद्री फर्मच्या शिंदेंनी स्पेनवरून दहा जातीच्या संत्र्यांची कलमं आणल्यात आणि ते त्याची कलमं तयार करणार आहेत. मग आपल्या आपल्या वरूड मोर्शी, अमरावती जिल्ह्यात, नागपूर जिल्ह्यात कॉटन मार्केटमध्ये आपल्याला पाहिजे असलेली इंटरनॅशनल स्टँडर्डची कलमं आपल्या इथं रिसर्च होऊन का तयार होत नाहीत.

आणि म्हणून आज सुधीरच्या या अनुभवाचा उपयोग हाच आहे, की हे इस्राईलमध्ये कसं झालं. जगात कसं झालं. लोकांनी कसे केले. म्हणून मी त्याला विनंती केली, की आता याच्यात डिजिटलाईज करू आपण. मी म्हटलं, की मी जबाबदारी घेतो. आपण 'शेती इस्त्राईलची' या पुस्तकावरती याची डॉक्युमेंटरी तयार करू. माझ्या मनात कल्पना होती, की सुरेश भट सभागृहात मी स्क्रीन लावलांय मोठा, आणि त्याच्यावर शेतकऱ्यांनी बघून ते समजून घेतलं पाहिजे. मला भाजी विक्रेत्यांचं भविष्य चांगलं आहे असं शरद पवार साहेबांनी सांगितलं. साहेब, माझ्याकडे माझी पत्नी शेती बघते आणि आता सगळा भाजीपाला येतो. आम्हाला विदर्भात पण नक्कीच ते चांगलं होईल आणि हे होऊ शकतं. त्यामुळं एक तर पाण्यावर आणि दुसरा शेवटचा जो मुद्दा आहे ज्याच्यावर त्यांनी आत्ता जो अंक काढलेला आहे,



नागपूरच्या कृषी विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष गिरीश गांधी हे नितीन गडकरी व शरद पवार यांच्याशी संवाद करताना

कृषीतिर्थ, मी पवार साहेबांना धन्यवाद देतो, की त्यांना मी विनंती केली होती, की वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटची ब्रँच आमच्या विदर्भात उघडा. साहेब, तुम्हाला आश्चर्य वाटेल. आमच्या इथले दहा शेतकरी, कुणाला विश्वास बसत नाही. त्यांनी एकरी शंभर टनापर्यंत उसाचं उत्पादन काढलं. तेही विदर्भात. म्हणजे कोल्हापूर, सांगलीचा काढतो त्यात तर आश्चर्य नाहीच, पण विदर्भामधल्या शेतकऱ्यांनी काढलं. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये उसाच्या शेतीमध्ये आपण इथेनॉल तयार केलं पाहिजे. त्याच्यावर नेहमीच मी बोलतो.

इथेनॉलवर चालणाऱ्या आता गाड्या आल्या. इथेनॉलची कॅरेलिक व्हॅल्यू पेट्रोलबरोबर झाली. मीच ट्रान्सपोर्ट मंत्री आहे. ऑटो रिक्षा, कार, आता माझ्याकडे इलेक्ट्रिक कार आहे. मी पहिलं म्हणायचो, की इलेक्ट्रिक गाडी येईल. मला पत्रकार विचारायचे, की मग चार्जिंग कसं होईल. बंद होईल का काय होईल. शंभर शंका विचारायचे. आता टाटा आणि महिंद्राची एक वर्षाकरता वेटिंग लिस्ट आहे. आता मला म्हणतात, की चिठ्ठी द्या, लवकर गाडी मिळाली पाहिजे. म्हणजे इलेक्ट्रिक गाडी पॉप्युलर झाली.

आणि म्हणून आता दुसरा विषय जो आहे, तो सुधीरच करू शकतो, तो म्हणजे अन्नदाता ते ऊर्जादाता. ग्रीन हायड्रोजनची गाडी पण आहे माझ्याकडे दिल्लीत. त्यामुळं येणाऱ्या काळात पाण्यातून हायड्रोजन काढणं, हे गहू, तांदूळ, ज्वारी, मका लाऊन आपलं भविष्य बदलू शकत नाही. हे पक्कं लक्षात ठेवा. तांदूळ तर आता बिल्कुल लाऊ नका. गोसी खुर्द धरणामुळं पुन्हा लावाल तर ८ रुपये किलो तांदूळ होईल आणि भारत सरकारच्या गोडाऊनमध्ये ठेवायला जागा नाहीये. मध्ये आम्ही कोविडच्या काळात खूप वाटलं लोकांना. त्यामुळं येणाऱ्या काळामध्ये आपल्याला नक्की लक्षात ठेवलं पाहिजे, की क्रॉप पॅटर्न बदलला पाहिजे. पाण्याचं नियोजन केलं पाहिजे. प्रॉडक्टिव्हिटी वाढवली

नागपुरात इथेनॉलवर चालणारी बस



पाहिजे. एक्सपेंडिचर कॉस्ट कमी केली पाहिजे आणि प्रक्रिया उद्योगातून एक्स्पोर्ट वाढवलं पाहिजे. आणि म्हणून आज सुधीरनी या सर्व विषयांवर चांगला अभ्यास केलेला आहे. आणि हे दोन आहे पाण्याचं आणि अन्नदाता ते ऊर्जादाता, काय आहे की आऊट ऑफ बॉक्स काही बोललं तर कुणी विश्वासच ठेवत नाही. पण मी इतके दिवस एकटाच बोलून बोलून एककलमी कार्यक्रम करत आलो. त्याच्यामुळं मी १६०० कोटीच्या कर्जात पडलो. मी स्वत:च काही प्रयोग करतो. मला हे कृषी विद्यापीठ, सरकार वगैरेपेक्षा मी स्वत: आता बायो सीएनजी तयार करायचा प्रयोग केला. पाच टन तणसापासून एक टन बायो सीएनजी तयार होतो. भंडारा-गोंदियात पेट्रोलची गरजच नाहीये. पण करायला कुणी पुढं येत नाही.

त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये टेक्नॉलॉजीचा उपयोग करून शेतीमध्ये आपल्याला इकॉनॉमिक व्हायबिलिटी आणावी लागेल. प्रूव्हन टेक्नॉलॉजी, इकॉनॉमिक व्हायबिलिटी, ॲबिलिटी ऑफ रॉ मटेरियल ॲंड इफेक्टिव्ह मार्केटिंग. म्हणून आज सुधीरसारखा पत्रकार, ज्यांनी या प्रत्येक विषयाचं अध्ययन करून ते केवळ पुस्तकात बंदिस्त नाही ठेवलं. ते त्यांनी पुस्तक काढून लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याचं काम केलं. हे पुस्तक वाचून किती लाखो शेतकऱ्यांचा फायदा झाला असेल, याचा तुम्ही विचार करा. त्याचं एक जे काम होतं, ते अतिशय महत्त्वाचं, ऐतिहासिक, एक जिनियस रिसर्च पत्रकार आणि तोही कृषी क्षेत्रातला.



त्याच्यामुळं मला अतिशय आनंद आहे, की गिरीशभाऊंनी त्याचा सत्कार केला. योग्य माणसाचा सत्कार केला. खरं म्हणजे अनेक बहुमान मिळत असतात. पण या पुरस्कारामुळे मायी साहेबांचं नाव आहेच, पण सुधीरला ज्या कामाकरता पुरस्कार दिला. त्यामुळं सुधीरचा तर गौरव होईलच, पण पुरस्काराचाही मोठा गौरव झालेला आहे. कारण, सुधीरनं केलेलं काम भयंकर हिस्टॉरिकल, रिसर्च वर्क आहे. आणि हे केवळ मनोरंजनाचे नाहीये. हे शेतकऱ्यांचं जीवन सोशो इकॉनॉमिक क्लास फॉर्मेशन करणारी त्याची पत्रकारिता आहे. त्यातलं रिसर्च आपल्या उपयोगाचं आहे. आणि म्हणूनच ते डिजिटल प्रेझेंटेशन करावं अशी माझी इच्छा आहे. मी त्याच्या मागे लागलो आहे. पुस्तक आजकाल कुणी वाचत नाही सुधीर. वर्तमानपत्र नाही वाचत. आता सगळे मोबाईलवर टकटक करून पाहतात. मला याच्यावर विश्वास नव्हता. पण मला दोन ते तीन लाख रूपये याच्यापासून मिळतात. कारण माझं भाषण झालं, की मला पाच-हजार मिळणार असतात. त्याच्यामुळं तुम्ही तुमची वेबसाईट उघडा आणि माझ्यासारखं चालू करा. तुमचं यू-ट्यूबवर रोज भाषण जाईल. तुम्हालाही पैसे मिळतील आणि लोकांचाही फायदा होईल.

त्यामुळं आपण जर हे डिजिटलाईज करून पाठवू. उसाचं एकरी शंभर टन उत्पादन कसं करायचं, यू-ट्यूबवर टाकली क्लिप की पैसे. ते भंडारा गोंदिया जिल्ह्यात छोट्या ग्रामपंचायतीत छोटा शेतकरी आपल्या मोबाईलवर पाहतो. सगळ्या नर्सरीत काय झालं ते बघतो. त्यामुळं तुमची जी शोध पत्रकारिता आहे, तुमचा जो अभ्यास आहे, तुमचा जो रिसर्च आहे, जे ॲप्रोप्रिएट व्हिजन आहे, ती डिजिटलाईज टेक्नॉलॉजीचा उपयोग करून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यामध्ये पुढल्या काळात अजून एनर्जी जर तुमची याच्यामध्ये आली तर त्याचा खूप उपयोग होईल. मी पुन्हा एकदा सुधीरचं खूप अभिनंदन करतो. मनापासून शुभेच्छा देतो.

■■

# पीक पद्धती बदलली तरच शेती सुजलाम् सुफलाम्



**डॉ. सुधीर भोंगळे**

खरं तर मला जो हा पुरस्कार दिला, हा पुरस्कार आहे, कै. आप्पासाहेब पवार आणि डॉ. अण्णासाहेब शिंदे यांना. त्या दोघांनी मला घडवलं, माझ्यामध्ये या कृषी विषयाची आवड निर्माण केली आणि लिखाणाची जी आवड मला लावली, ती विश्वासराव धुमाळ कृषी खात्याचे संचालक असताना. खरं तर मी शेती करणारा मुलगा, सासवडला सातवीपासून शेती सुरू केली. बी.कॉम. होईपर्यंत सासवडलाच शिकत होतो. घरी शेती करत होतो. सगळा भाजीपाला पिकवत असायचो. भाजीपाला मुंबईला पाठवायचो. पुण्याला पाठवायचो. उरलेला भाजीपाला सासवडच्या भाजी मार्केटमध्ये नेऊन विकायचो. मी बाजारात भाजी विकायला गेलो नाही, असा दिवस सहसा सापडणार नाही. मला फार गंमतीनं कधी कधी साम्य वाटतं, की पवार साहेब सुद्धा भाजी विकत होते. ते कुठल्या कुठे गेले. मी भाजी विकून पत्रकारितेत राहिलो.

गंमतीचा भाग सोडून द्या. पण भाजी विकण्यानं काय होतं, तर समाजातल्या माणसांची नाडी तुम्हाला कळायला लागते. त्या माणसांच्या आंतरिक वेदना काय आहेत, तो नेमकं काय बोलतोय हे तुम्ही जाणीवपूर्वक बघायला लागता. तो अनुभव मला मिळत गेला आणि मग सकाळमध्ये मी पत्रकारितेत नोकरीला लागलो. चौदा वर्षे मी सकाळमध्ये नोकरी केली. त्यावेळी दर गुरूवारी माझा शेती-सहकार नावाचा कॉलम असायचा. अख्खं पान मला दिलेलं असायचं संपादकांनी आणि त्याच्यामध्ये नवनवीन विषय कसे येतील असा मी प्रयत्न करायचो आणि चौदा वर्षे त्याच्यातनं वेगवेगळ्या लोकांशी इंटरॅक्शन करणं, त्यांनी



केलेले प्रयोग लोकांच्यासमोर मांडणं हे काम मी केलं.

योगायोगानं त्याचवेळी इस्राईलमध्ये एक्झिबिशन भरणार होतं शेतीचं आणि पवार साहेबांचे मोठे बंधू माधवराव पवार हे इस्राईलमध्ये जाऊन आले. त्यांनी आपला एक ज्यू माणूस, ज्याला त्यांनीच नाव दिलं होतं माधवरावांनी, की ईस्राईलमधला गुलाबराव. त्या माणसांनी याच्यामध्ये मोठ्या रूबाबात काम केलं होतं. त्यांनी आमचे कार्यकारी संचालक प्रतापराव पवार यांना पत्र लिहिलं, की असं असं एक्झिबिशन भरतंय आणि तुम्ही जर सुधीरला पाठवलं एक्झिबिशन पाहायला तर तो शेतकऱ्यांसाठी काही नवीन माहिती देऊ शकेल. योग असा चांगला, की त्यावेळेला सुदैवानं या भारतातलं शिष्टमंडळ गेलं आणि त्याचं नेतृत्व आदरणीय पवार साहेबांनीच केलं. ते मुख्यमंत्री होते महाराष्ट्राचे. त्यांच्या शिष्टमंडळामध्ये माझं नाव घालण्यात आलं आणि ९३ साली पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळामध्ये मला इस्राईलचं प्रदर्शन पाहायला जाण्याची संधी मिळाली. सहा दिवसाचं ते प्रदर्शन होतं. मी ते प्रदर्शन बघून भारावून गेलो. जेवढी माहिती गोळा करता येईल तेवढी आणली. कागदपत्रं गोळा करून आणली. घरी येऊन सहा महिने अभ्यास करत बसलो आणि त्याच्यावरती सकाळमध्ये एक मोठी लेखमाला लिहिली. दर शनिवारी आख्खं रंगीत पान पुरवणीमध्ये जी नुकतीच सकाळमध्ये सुरू झाली होती. त्या वर्तमानपत्राच्या पानाचं एक बाबा पानसरे म्हणून आदिवासी भागात कार्यकर्ता होता, आंबेगावला, दिलीप वळसेंच्या मतदारसंघामध्ये, तो दर सोमवारी लेख छापून आला, की ते मोठ्या स्क्रीनवर सगळ्या लोकांना


दाखवायचा.


आता जसं गडकरी साहेब माझ्या मागे लागलेत, की शेती इस्राईलची या पुस्तकाची त्यांना एक डॉक्युमेंटरी करायची आहे. तसं बाबाला त्या काळात एक लेख दाखवायला पंधरा हजार रूपये खर्च यायचा. बाबा तो लेख मोठा करायचा आणि सगळ्या आदिवासी लोकांना दाखवायचा वाचून. महाराष्ट्राच्या चीफ सेक्रेटरींनी एकदा जाऊन बघितलं, एन. रघूनाथन चीफ सेक्रेटरी होते, त्यांनी बघितलं, की आदिवासी लोक तो लेख वाचतायंत, त्यांनी मला भेटायला बोलावलं आणि मला म्हणाले, की या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद मी करतो. त्याचवेळेला लेखमालेचं पुस्तक करायचा निर्णय झाला. राजहंसच्या दिलीप माजगावकरांनी मला बोलवलं. ते म्हणाले, की मी लेखमाला छापणार नाही. तुम्ही मला नव्यानं पुस्तक करून दिलं पाहिजे. मी पुन्हा त्याच्यावर सहा महिने काम केलं. नव्यानं पुस्तक लिहिलं. त्या पुस्तकानं महाराष्ट्रातला सगळ्यात श्रीमंत लेखक असा नावलौकिक मला मिळवून दिला.

त्या पुस्तकाचं ॲडव्हान्स बुकिंग दहा हजार प्रती होतं आणि एका वर्षामध्ये पुस्तकाच्या हजारो प्रती विकल्या गेल्या. या एका वर्षात मला लाखो रूपये रॉयल्टी मिळाली. पहिलं पुस्तक माझं शेती इस्राईलची, या पुस्तकानं मला लखपती केलं आणि मग मी विचार केला, की आता आपण अभ्यास करायला पाहिजे. आपल्या हातात पैसे आलेले आहेत. म्हणून मी सकाळमध्ये बिनपगारी रजा मागितली दोन वर्षाची. त्याचवेळेला माझं पीएचडी पूर्ण झालं होतं. आंतरराष्ट्रीय कीर्तिचे जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातली पाणी व्यवस्थापनाची धोरणं आणि त्यातलं राजकारण या विषयावरती मी पीएचडी करावी असं राम बापट आणि माधवराव चितळे यांनी सुचवलं. ते म्हणाले, देशातल्या कुठल्याही विद्यापीठामध्ये या विषयाचा अजून अभ्यास झालेला नाही. निदान पुढच्या मुलांसाठी तरी तुम्ही ही चौकट तयार करून द्या.

मग चितळे साहेबांनी मार्गदर्शन करायचं, राम बापटांनी काम करून घ्यायचं. तुम्हाला सगळ्यांना कदाचित राम बापट माहिती आहेत की नाही, हे माहीत नाही. ते जेएनयूमध्ये पोलिटिकल सायन्सचे प्रोफेसर होते दिल्लीला, त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या पोलिटिकल सायन्सचे हेड ऑफ द डिपार्टमेंट होते. अत्यंत विद्वान माणूस. अनेक विषयांमध्ये गती. स्वत: लग्न केलेलं नव्हतं. सगळं आयुष्य मुलांच्यासाठी दिलं. पण अत्यंत दुर्वास ऋषींसारखे कडक. एक शब्द जरी अडला, मनानी काय लिहून देणार नाहीत, बाप दाखव नाही तर श्राद्ध कर, हे वाक्य लिहियाचं नाही. त्याचे पुरावे गोळा करून आण. दहा दिवस तुझं तोंड दाखवू नको. या पद्धतीनं त्यांनी अत्यंत कसून माझ्याकडून काम करून घेतलं आणि म्हणून मी जे राजकारण पाण्याचं हे पुस्तक लिहिलं, ते आज पाटबंधारे खात्याचं बायबल मानलं जातं.

त्याच्यानंतर पुढचा विषय











माधवराव चितळे आणि प्रा. राम बापट

करायचा ठरला, पोस्ट डॉक्टरेटचा, त्यावेळेला माझ्या मनात होतं, हायड्रो पॉवरवर करावं. पण चितळे साहेब म्हणाले, की फार मोठा विषय आहे. एकदम उडी मारू नका. त्याचवेळेला मग मी पवार साहेबांकडं गेलो मार्गदर्शनाला, आणि कृष्णा खोरेच्या संदर्भातला ज्वलंत प्रश्न चर्चेला आला होता आणि मुदत संपत आल्यामुळं महाराष्ट्राच्या हिश्श्याचं पाणी जातंय की काय अशी भीती होती. आणि म्हणून मग कृष्णा वॉटर इंटरस्टेट डिस्पुट या विषयावर काम करायचा निर्णय झाला. कृष्णेचं पाणी आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटकामध्ये मागच्या काळात कसं वाटलं गेलं आणि आता यापुढच्या काळात कसं वाटलं गेलं पाहिजे आणि पुढच्या ५० वर्षात या पाण्याच्या वाटपाकडं कसं बघायला पाहिजे या विषयावर पुन्हा चितळे आणि बापटांनी मार्गदर्शन करून माझ्याकडनं काम करून घेतलं आणि एक हजार पानांचा इंग्लिश ग्रंथ त्यावेळी मी लिहिला. पवार साहेबांनी त्यावेळेला मला खूप मदत केली. कारण कर्नाटक आणि आंध्रमध्ये कुणीही माहिती द्यायला तयार नव्हतं आणि ती दोन्हीही राज्यं सगळी माहिती चोरत होते, लपवत होते. केंद्र सरकारलासुद्धा माहिती देत नव्हते आणि सुप्रिम कोर्टालाही देत नव्हते.

अशा वेळेला माझी दोन-अडीच वर्षे नुसता मजकूर गोळा करण्यात गेली. पुढची दोन-अडीच वर्षे लिखाणाला गेली. चार-साडेचार वर्षामध्ये मी हजार पानांचा पोस्ट डॉक्टरेटकरता पुणे विद्यापीठाच्या डी.लिटकरता हा ग्रंथ लिहिला सुदैवाने त्यावेळेला जो लवाद नेमला गेला ब्रिजेश कुमारचा, कृष्णा पाणी वाटपासाठी त्याला हे पुस्तक फार



डॉ. आप्पासाहेब पवार


डॉ. अण्णासाहेब शिंदे


विश्वासराव धुमाळ


नानासाहेब पाटील


उमेश चंद्र सरंगी


डॉ. सुधीर गोयल

अत्यंत उपयोगी पडलं. त्यांनी माझी साक्ष घेतली कलकत्ता आणि अलाहाबाद कोर्टाचे दोन जज्, न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती श्रीवास्तव, यांनी व्यक्तीश: चेंबरमध्ये बोलवून माझे आभार मानले. ते म्हणाले, की तुम्ही हा ग्रंथ लिहिला म्हणून आम्हाला सगळे संदर्भ उपलब्ध होऊ शकले. नाहीतर कर्नाटक, आंध्र आणि मद्रास यांनी आम्हाला कसलीच माहिती उपलब्ध करून दिली नसती. तुम्ही संदर्भासह हे लिहिलं म्हणून आम्ही त्यांना डॉक्युमेंटस् मागितले. हे डॉक्युमेंटस् कुठायंत, आणा आमच्यापुढं. अशा पद्धतीनं काम करत गेलो. त्याचा फार मोठ्या प्रमाणावरती या समाजाला उपयोग व्हावा. देशहित समोर ठेऊन काम केलं. मी काम करताना महाराष्ट्राची सुद्धा बाजू मांडलेली नाही. म्हणजे वैयक्तिक, एकट्याची बाजू मांडलेली नाही. संबंध देशाला प्राधान्य दिलं. त्याबद्दलची भूमिका ठेवली आणि ते काम करत गेलो.

शेतीच्या क्षेत्रामध्ये आप्पासाहेब पवार, आण्णासाहेब शिंदे यांच्याबरोबरच, ज्यांनी मला मार्गदर्शन केलं ते विश्वासराव धुमाळ असतील, नानासाहेब पाटील असतील, उमेशचंद्र सरंगी असतील, सुधीर गोयल असतील या सगळ्या लोकांनी मला शिकवलं. खरं तर मी ॲग्रीकल्चर ग्रॅज्युएट नाही. पण प्रत्यक्ष शेती केलेला, शेतीचं काम केलेलं आणि त्यानंतरची पुढची संधी मला जैन इरिगेशनचे भवरलाल जैन यांनी दिली. जणू काही पाचवा मुलगा मानून मला त्यांनी अनेक ठिकाणी नवनवीन गोष्ट शिकण्यासाठी पाठवलं. आत्ता ज्याचा मघाशी उल्लेख झाला, ते दुसरं शेती इस्राईलची हे पुस्तक, मी

जेव्हा पहिल्यांदा लिहिलं ९४ साली, ते आता सगळं बदललंय. तंत्रज्ञान बदललंय. औद्योगिकरण व्हायला लागलंय. नवीन तंत्रज्ञान लोकांना सांगायला पाहिजे. म्हणून मग मला अजित जैन



भवरलाल जैन



अजित जैन


चार बाय एकवर लागवड करा. चार बाय दोनवर लागवड केली तर एकरी पाचशे झाडं लागतात. पाच-सहा फुटाच्या वर झाड वाढू द्यायचं नाही. झाडाचं प्रोनिंग करायचं. मोजून फळं धरायची.





म्हणाले, की आमचा कुणी पाठवून उपयोग नाही. तुम्ही जर गेलांत तर त्याचा उपयोग होईल. पण इस्राईलवाले फुकट काही सांगणार नाहीत. ते फी घेतील. एका तासाला सहा हजार रूपये याप्रमाणे साडेचार लाख रूपये फी त्यांनी माझ्याकडनं घेतली. ती फी अजित जैन यांनी भरली व नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. एक महिनाभर मला एकट्याला शिकवलं. लॉकडाउनच्या काळामध्ये ज्या नोटस् होत्या, त्या सगळ्याच्या आधारानं शेती इस्राईलची भाग दोन हे पुस्तक मी लिहिलं.

आज शेतीचं नवीन तंत्रज्ञान आहे. अल्ट्रा हायडेनसिटी, डेन्सिटी. आपल्या विद्यापीठांची शिफारस होती, की एकरी ४० आंब्यांची झाडं लावायची. आज नवीन शिफारस आहे, की एकरी एक हजार झाडं लावायची.








जानेवारी १९६०. जागतिक कृषी महोत्सवातील पशुधनाच्या दालनाची पाहणी करताना सोव्हिएत युनियनचे अध्यक्ष श्री. व्होरोशिलॉव्ह, डॉ. पंजाबराव देशमुख. त्यांनी २० जानेवारी १९६० रोजी महोत्सवास भेट दिली.

सूर्यकिरण ज्या बाजूनं येतात, त्याच बाजूनं फळं धरायची. उत्तम प्रकारची चकाकी येईल. त्याच्यात ब्रिक्स येईल, साखर तयार होईल. या पद्धतीनं संबंध नवीन तंत्रज्ञानाची मांडणी या शेती इस्राईलच्या या पुस्तकात केली. सुदैवानं या पुस्तकाला सुद्धा रिस्पॉन्स चांगला आहे. गेल्या दीड वर्षामध्ये शेती इस्राईलच्या या पुस्तकाच्या हजारो प्रती विकल्या गेल्यात. अनेक पुस्तकं लिहिली गेली. या सगळ्यांच्या मागे मला जो आशीर्वाद पवार कुटुंबीयांनी पहिल्यापासून दिला, आज नितीन गडकरींचासुद्धा आशीर्वाद आहे, हर्षवर्धन देशमुख यांनी पंजाबराव देशमुखांचे दोन्ही ग्रंथ करण्याची जबाबदारी मला दिली.


पंजाबराव देशमुखांनी एवढं मोठं काम केलं. १९५९-६० मध्ये दिल्लीला मोठं जागतिक कृषी प्रदर्शन भरवलं. तसं प्रदर्शन भारतात अजून झालं नाही. त्या प्रदर्शनाला साठ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्तानं आम्ही त्याच्यावर एक ग्रंथ तयार केला. त्याचं उद्घाटन नितीन गडकरी साहेबांनी केलं. त्यानंतर पंजाबराव देशमुख आणि ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये धर्माचा वैदिक वाङ्मयातील उदय आणि विकास या विषयावर १९२३ साली पीएचडीचा थिसिस लिहिला. दुर्दैवानं त्याची दखल पुढे कुणी घेतली नाही. पुढच्या वर्षी त्या थिसिसला शंभर वर्षे होतायंत. त्या थिसिसवरचा एक ग्रंथ आम्ही तयार केला आणि १० एप्रिलला त्याही ग्रंथाचं प्रकाशन शरद पवार साहेबांनी केले. हे दोन्ही ग्रंथ तयार करण्याच्या कामामध्ये शिवाजी शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर चिखले व त्यांच्या पत्नी प्रा. वर्षा चिखले यांचं मला फार मोठं सहकार्य लाभलं. सगळ्या ठिकाणी आम्ही गेलो. दुर्दैवाची गोष्टी अशी होती त्याच्यामध्ये, की पंजाबरावांबरोबर काम केलेला किंवा दिल्लीला जाऊन प्रदर्शन पाहिले असं सांगणारा एकही माणूस मला भेटत नव्हता. सगळी माणसं गेलेली होती. हयात कुणीच नव्हतं. मला फक्त एक माणूस भेटला, पांडुरंग अभंग नेवाशाला. तेव्हा ते १९ वर्षाचे होते, जेव्हा त्यांनी एक्झिबिशन पाहिलेलं होतं. आम्ही खूप हिंडत होतो विदर्भामध्ये. कुणी माणसं भेटतील का, सांगतील का. नाही मिळाली. पण त्या काळामध्ये नितीनजींनी खूप सहकार्य केलं. प्रकाश जावडेकरांनी सहकार्य केलं. त्या काळातले दुर्मिळ फोटो इन्फॉर्मेशन अँड ब्रॉडकास्टिंग मिनिस्ट्रीमधनं त्यांनी मला मिळवून दिले. गडकरी साहेबांना शाश्वती वाटत नव्हती, की एवढी जुनी माहिती मिळेल की नाही. पण सुदैवानं आम्हाला त्यांनीच सहकार्य केल्यामुळं ही सगळी माहिती मिळाली.

आज शेतीच्या क्षेत्रामध्ये गेली ३०-४० वर्षे काम



करत असताना आता जे नवनवीन प्रश्न निर्माण व्हायला लागलेत, आता विदर्भामध्ये आपल्या गोसी खुर्दचे चीफ इंजिनिअर आशिष देवगडे यांनी पुढाकार घेतलांय. हा संबंध क्रॉपिंग पॅटर्न बदलला पाहिजे. पाच लाख एकरला आपण पाणी देणार आहे. पण भात लाऊन काय उपयोग आहे. भाताच्या पिकातनं कधीच समृद्धी येणार नाही. शेकडो वर्षे झाली आपण भातच लावत राहिलोय, पण अजून लोक बदलायला तयार नाहीत. मी आत्ता नितीनजींना तेच सांगत होतो. काहीतरी केलं पाहिजे. प्रसंगी सक्ती केली पाहिजे, लोकांच्यामध्ये मानसिक परिवर्तन केलं पाहिजे. पण त्यांना भाताच्या पिकातनं बाहेर काढलं पाहिजे. त्याला हा जो नवीन क्रॉपिंग पॅटर्न आहे तो स्वीकारायला भाग पाडले पाहिजे.

सुदैवानं योगायोगाची गोष्ट अशी आहे, की मागच्या ४ जूनला वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये जी साखर कॉन्फरन्स झाली, त्याच्यामध्ये पवार साहेबांनी एक फार चांगली घोषणा विदर्भासाठी केली, म्हणजे वसंतदादा इन्स्टिट्यूटची एक संशोधन संस्था या गोसी खुर्द धरणाच्या परिसरात, लाभक्षेत्रात काढण्याचं जाहीर केलेलं आहे. आपल्यासाठी फार मोठी चांगली घोषणा आहे. कारण १३० वर्षापूर्वी शिंदेवाहीला उसाचं संशोधन केंद्र होतं आणि उत्तर भारतातनं कोहळी जातीचे लोक येऊन उत्तम प्रकारचा गूळ आणि खांडसरी बनवत होते. याचा अर्थ असा आहे, की विदर्भातल्या माणसाला ऊस किती डोळ्याचा लावावा, किती खाली दाबावा आणि उसाचं उत्पादन कसं काढावं याचं उत्तम ज्ञान होतं. मधल्या काळामध्ये ते सुटलं असेल. पण आता पुन्हा ऊस लावला पाहिजे. सुदैवानं नितीनजींनी कारखाने काढलेत. ते अवश्य पावलं टाकतील. पण तेवढ्यानं भागणार नाही. आणखीन पुढं जावं लागणार आहे. सुदैवानं वैनगंगेचं पाणी इतकं मुबलक उपलब्ध आहे, आज मी सकाळी गोसी खुर्द धरणाला चीफ इंजिनिअर देवगडे, अधिक्षक अभियंता अंकुर देसाई यांच्याबरोबर जाऊन बघून आलो, ६ लाख क्यूसेक पाणी सकाळी सोडलेलं होतं. त्या धरणामधला येवा जर बघितला तुम्ही, तर १४०० टीएमसी एवढा येवा वैनगंगेत येतो. म्हणजे आपण धरण बांधलंय फक्त ४० टीएमसीचं. सगळं पाणी वाहून चाललंय. निसर्गानं दिलंय. आपल्याला वापरता आलं नाही. आपण कपाळ करंटे आहोत. आपण दुर्दैवी आणि कमनशिबी आहोत. सगळं पाणी खाली वाहून चाललंय. म्हणून या पाण्याचा वापर झाला पाहिजे.






मध्य प्रदेशातनं हे पाणी येतंय, म्हणून देवगडे साहेबांनी आता नवीन प्रकल्प काढला, की वैनगंगेचं पाणी उचलून, लिफ्ट करून पैनगंगेमध्ये टाकायचं आणि पार जालना, सिद्धेश्वर पर्यंत आणि अकोला, बुलडाणा या तहानलेल्या भागाला पाणी देण्याचं काम वैनगंगेतून पाणी उचलून करू. जसं कृष्णेमध्ये टेंभू, ताकारी, म्हैसाळ, वसना, वांगणा, जिहे-कठापूर या मोठमोठ्या लिफ्ट इरिगेशन स्कीम्स केल्या, त्याच धर्तीवर याही लिफ्ट इरिगेशन स्कीम्स आपण करू आणि सगळा विदर्भ आपण सुजलाम् सुफलाम् करू. या कामामध्ये सगळ्यांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. राजकीय लोकांनी तर पुढाकार घेतलाच पाहिजे. आम्ही लोकांना सांगण्याचा प्रयत्न करतोय, की क्रॉपिंग पॅटर्न बदला, लोकांना बदलण्याच्या कामाला तुम्ही आम्हाला हातभार लावा. मी आणखी काय सांगू. खूप बोलण्यासारखं आहे. आज कृषी विकास प्रतिष्ठाननं आणि गिरीशभाऊंनी माझा जो सत्कार केला, मला जो पुरस्कार दिला त्याबद्दलचं ऋण व्यक्त करायला माझ्याजवळ शब्द नाहीत. मी मनापासून, अंत:करणापासून त्या सर्वांचे, त्यांच्या कुटुंबीयांचे, विशेषत: त्यांच्या पत्नी सौ. विभा गांधी यांनी तर आम्हाला किती वर्षे जेऊ घातलेलं आहे, सगळ्या गोष्टी घरातल्या मुलासारखं सांभाळल्या आहेत. त्यामुळं हा घरातलाच सत्कार आहे असं मी मानतो आणि तुमच्या सर्वांच्या ऋणात कायमचं राहो अशी परमेश्वरानं मलाही बुद्धी देवो, अशी त्याच्या चरणी प्रार्थना करतो. सर्वांचे मन:पूर्वक आभार!

■■

## वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प संरेषा दर्शविणारा नकाशा





# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प

वैनगंगा नदीला दरवर्षी येणाऱ्या पुरामधून किमान २०० ते कमाल १५०० टीएमसी एवढे पाणी वाहून खाली तेलंगणा राज्यात व समुद्रात जाते. गोसीखुर्द धरणापर्यंत वाहून येणारे सर्व पाणी महाराष्ट्राच्या हक्काचे आहे, पण आपण सर्व पाणी अडवू शकत नाही.कारण धरणाच्या वरच्या भागात (४० कि.मी. अंतरावर) भंडारा शहर आणि जवाहर ऑर्डनन्स फॅक्टरी आहे. महाराष्ट्राला लागून असलेला मध्य प्रदेशाचा जो भाग आहे तो जंगलांनी व्यापलेला आहे. तिथे मध्यप्रदेश सरकार धरणे बांधू शकत नाही. त्यामुळे तिथे पडणारे पावसाचे सर्व पाणी थेट गोसीखुर्द धरणात येते. आपण बांधलेले गोसीखुर्द धरण हे फक्त ४० टीएमसीचे (११४० दशलक्ष घनमीटर) आहे. केंद्रीय जल आयोगाच्या आकडेवारीनुसार दरवर्षी २०० ते १००० टीएमसी पाणी धरणातून वाहू नजाते. धरणाच्या खालच्या भागात आणखीन पाच छोटे बॅरेजेस बांधण्याचे प्रस्तावित आहे. पण त्यातून दीड टीएमसीपेक्षा जास्त पाणीसाठा होणार नाही. म्हणून विदर्भ सिंचन महामंडळाने या पुराच्या पाण्याचा विदर्भाच्या विकासाकरिता वापर व्हावा म्हणून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प आखला असून त्याला महाराष्ट्र सरकारने मान्यता दिली आहे, पण त्याची अंमलबजावणी अजून सुरू केलेली नाही. वैनगंगा नदीतले पाणी उपसा जलसिंचन योजनेद्वारे उचलून अप्पर पैनगंगा व पैनगंगेच्या वरील सर्व प्रकल्पांमध्ये (उदा. सिद्धेश्वर, येलदरी, खडकपूर्णा, पेनटाकळी वगैरे) टाकण्याचा आराखडा तयार केला आहे. गोसीखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता आशिष



# विदर्भाच्या विकासासाठी वरदान ठरेल!

देवगडे, अधीक्षक अभियंता अंकुर देसाई व विदर्भ पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेंद्र मोहिते यांनी या कामात पुढाकार घेतला असून याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापुढे सादरीकरणही करण्यात आले आहे. वाहून जाणाऱ्या या पुराच्या पाण्याचा अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती या विदर्भातील जिल्ह्यांना तसेच मराठवाड्यातील जालना जिल्ह्याला फायदा होऊ शकतो. त्यांची पाण्याची गरज काही प्रमाणात भागू शकते. अप्पर पैनगंगेत १५ टीएमसी पाण्याची तूट असल्यामुळे वाशीम जिल्ह्यातील कोणतीही धरणे बांधू शकत नाही. खडकपूर्णा धरणात पाणी सोडले तर बुलढाणा व जालना शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो. खडकपूर्णेतून सिद्धेश्वर व येलदरी पकल्पातही पाणी सोडता येईल. गोसीखुर्द ते निम्न वर्धा, निम्न वर्धा ते काटेपूर्णा, काटेपूणा ते नळगंगा असा नदीजोड प्रकल्प राबविला तर अमरावती व नागपूर विभागातील ६ जिल्हे, १५ तालुके आणि ८५० गावांना फायदा होऊ शकतो. तेलंगणा राज्याने हे पुराचे पाणी वापरण्यासाठी कालेश्वरम प्रकल्प केला असून ते तिथून २५० टीएमसी पाणी उचलतात व हैदराबाद शहरासाठी ५० टीएमसीचे स्वतंत्र धरण केले आहे. तरीदेखील मोठ्या प्रमाणावर पाणी समुद्रात वाहून जात आहे. नवीन तंत्रज्ञान व कार्यपद्धतीचा वापर करून आपण हे पाणी उचलून तुटवडा असलेल्या भागाला द्यायला हवे. त्याशिवाय संपूर्ण विदर्भाचा विकास होणार नाही.

सगळा इतिहास नव्याने सोईस्कर पध्दतीने लिहिण्याची नियोजनबध्द कारवाई आता सुरु झालेली आहे. औरंगाबादचे नामांतर करतांना सत्ताधारी नेत्याने म्हटले आहे गुलामगिरीच्या खुणा पुसुन टाकायच्या आहेत. समाजातील अनेक लोक ह्या गोष्टींना पाठींबा देण्यासाठी उत्साहात पुढे येण्याचे चित्र दिसू लागले आहे. प्रवाहाविरुध्द पोहण्यासाठी कणखर व्यक्तीमत्त्वाचे बुलंद लोक हवे असतात. पण नष्ट होत जाणाऱ्या काही वनस्पती सारखे हे एक्सटिन्ट होत चाललेत. ह्या आवर्तनात आपण कुठपर्यंत जाणार आहोत. १५० वर्षाची ब्रिटीश राजवट असताना त्यांना अनुकूल असलेला समाज अस्तित्वात होताच ना? अखेरीला काय आपल्याला कुणीतरी 'गुलाम' करायला हवे अशी मानसिकता रुजली आहे.



# गुलामगिरीच्या खुणा पुसणार किती?

हेमन्त टकले

काही दिवसापूर्वी दिल्ली येथे पंतप्रधानांनी नव्याने निर्माण झालेल्या संसद भवनाच्या प्रवेशद्वारावरील ब्रॉन्झधातूतील भव्य अशोकस्तंभाच्या शिल्पाचे अनावरण केले. देशाच्या इतिहासातील हा एक अत्यंत मौलिक क्षण आहे. या शिल्पातील सिंहमुद्रा काहीशी आक्रमक व उग्र दिसत असल्याचे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले. तर ज्यांनी हे शिल्प साकारले ते औरंगाबादचे शिल्पकार ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही हे शिल्प कोणत्या कोनातून बघता हे महत्त्वाचे आहे. तुमची नजर शिल्पाच्या पायापासून वर पर्यंत जात असेल तर, त्यात तुम्हाला सिंहप्रतिमा वेगळी दिसेल. म्हणजे या ठिकाणी 'कोन' हा 'दृष्टीकोनापेक्षा' महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही दृष्यकलेच्या बाबतीत तर अनेक वेळा उलट सुलट मत मतांतरे व्यक्त केली जातात. मला पु. ल. देशपांडे ह्यांच्या तुझे आहे आस्वाद घ्यायचा असेल तर असे घडणे अपरिहार्यच म्हणावे लागेल. थोडं खोलात जाऊन विचार केल्यावर लक्षात येते की, सम्राट अशोकाने घडवून घेतलेले हे शिल्प असं वादाच्या भोवऱ्यात का सापडावं?. पुन्हा अशोक स्तंभाकडे जाऊ. शिल्प अतिशय सुंदर असूनही जर कुणा अभ्यासकाला त्याचा भावार्थ वेगळा वाटला तर त्यानं व्यक्त व्हायचं का नाही हा खरा सवाल आहे. गेल्या काही काळात अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधन येत आहेत. हे आता स्पष्टपणे समोर आले आहे. जगातल्या कुठल्याही देशात सत्तेवर असलेले आणि विरोधक ह्यांच्यातील संघर्षाला अशी प्रतिकात्मक कलाकृती वापरली जाऊ लागली आहे. खरं तर सम्राट अशोकाने मोठी युध्दे जिंकली होती.मोठ्या प्रमाणावर रक्तपात झाल्याचे अनुभवले होते, आणि युध्द नको, हिंसा नको शांतता नांदायला हवी, ह्याचे अशोकस्तंभ हे प्रतिक



तुजपाशी ह्या अत्यंत गाजलेल्या नाटकाची आठवण होते. आपल्या मस्तीत जगणाऱ्या काकाजींच्या दिवाणखान्यात दर्शनी भागात एक संगमरवरी नग्न स्त्रीचा पुतळा असतो. कर्मठ आचार्यांचे आगमन होण्याआधी हा पुतळा हलवावा असे काकाजींच्या कारभाऱ्यांच्या मनात येते. पण काकाजी त्याला मनाई करतात. उलट कारभाऱ्यांना विचारतात आज तुम्ही किती वर्ष हा पुतळा पहात आहात मग तुम्हाला कधी ते वाईट दिसले का ?त्यावर कारभाऱ्यांचे उत्तर फार मार्मिक होते. ते म्हणतात 'आमच एक सोडा आमची नजर मेलीय पण.... आता मेलेल्या नजरेने जर आपण कलाकृतीचा होते. सत्ताधाऱ्यांची बाजू घेत उतरलेले माध्यम वीर तर खुलेपणाने आपण सर्व शक्तिमान हे जगाला समजले पाहिजे म्हणून आक्रमक सिंह प्रतिमेची गरज असल्याचे सांगतात. ह्या विरुध्द कुणी ब्र जरी काढला तर लगेच त्याला देशद्रोही ठरविणे व त्याची निंदा नालस्ती करणे अव्याहतपणे सुरु होते.

आता लढाया सुरु झाल्या आहेत. त्या चिन्हांच्या. राज्यात जी नुकतीच राजकीय लढाई झाली आहे ती येऊन पोहचली आहे चिन्हांवर. त्याचा केंद्रबिंदू अर्थातच शिवसेनेचे अधिकृत चिन्ह धनुष्यबाण. बाहेर पडलेला गट आणि पक्ष प्रमुखांचा गट यांचा वाद आता न्यायालयात आणि

निवडणूक आयोगासमोर जाणार. इतिहासाची एक प्रकारे आपल्या देशात पुनरावृत्ती होतेय. सगळ्यात जुना पक्ष म्हणजे काँग्रेस. सुरवातीच्या काळात त्यांचे चिन्ह होते बैलजोडी. त्या जागी आलं गाय वासरु 'नका – विसरु, गायवासरु' ही त्या काळातील एक लोकप्रिय स्लोगन होती. पण इंदिराजींनी बंड केले. त्या बाहेर पडल्या आणि आमचाच गट खरी काँग्रेस म्हणून निवडणूक आयोगाकडे गेल्या. शेवटी गाय वासरु चिन्ह गोठवलं जाऊन त्यांची निशाणी हाताचा पंजा बनली. पुढे पवार साहेबांनी नव्या पक्षाची स्थापना केली. त्यांच्या बरोबर जुन्या नेत्यांपैकी शरदचंद्र सिन्हा होते. त्यांनी काँग्रेसच्या गांधींजींच्या चरखा चिन्हावर हक्क सांगितला. तो फेटाळला गेल्यानंतर राष्ट्रवादीच्या हाती घड्याळ चिन्ह आलं. राजकारणात ह्या गोष्टी घडत असतात. पण कर्मठ धर्म आणि पंथ सुध्दा चिन्हांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. हे केवळ आपल्या देशाचं चित्र नाही तर जगभर हे चालत आलं आहे. हिटलर, मुसोलिनी, लेनिन यांची चिन्ह निवड इतिहासात कायम राहिली आहेत. प्रगत अमेरिकेमध्ये तर डेमोक्रॅटिक पक्षाचे चिन्ह एका व्यंगचित्रकाराने काढलेले 'गाढवाचे चित्र'आहे. आजही शंभर वर्षाहून अधिक काळ गेल्यानंतर ह्या प्रतीकांमध्ये बदल झालेले नाहीत. आता चिन्हांवरुन संघर्षाने नवे आयाम धारण केले आहे. मग त्यासाठी दिवंगतांच्या स्मृतीस्थळांचाही वापर होऊ लागला आहे. त्या स्थळांचे नामकरणही केले जाते. राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या समाधीवर 'हे राम' हे शब्द आहेत. ह्यामध्ये कुणालाही धार्मिकता दडलेली आहे असे वाटलेले नाही. कारण सामान्य माणसे महात्मा गांधींचे चरित्र जाणून असतात. त्यामुळे नंतर आलेल्या रथयात्रा असोत किंवा मंदिरे असोत त्यात धार्मिक ताकदीला आवाहन करुन सत्तेचे सोपान गाठण्याचे प्रयत्न दिसतात. आता तर २१ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकात प्रतिमा घडविणे महत्त्वाचे ठरु लागले आहे. आपण पंतप्रधानांना किती वेशात किती ठिकाणी सतत बघत असतो. सीमेवरील जवानांबरोबर ते थेट मातोश्रींच्या चरणी लीन होणारे मातृभक्त. सर्वसामान्यांना एक भावनिक हाक दिली जाते आणि सादही उत्तम मिळतो. दर वर्षी २६ जानेवारी ह्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात अनेक राज्यांची कलापथके आपल्या संस्कृतीचे दर्शन विविध देखाव्यांसह परेडमध्ये घडवत असतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पंतप्रधान ह्या सर्व कलाकारांची भेट घेतात. मग कुणी आसाम सारख्या राज्यातून आलेलं पथक त्यांची प्रसिध्द मोठी टोपी वेश पंतप्रधानांना देतात. त्यांच्या समवेत मग पंतप्रधानही नृत्यात सहभागी होतात. ह्यामध्ये आपुलकी जिव्हाळा दिसायचा पण आता राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक हळूहळू विरळ होत चाललेय अशी जाणीव होत आहे. ब्रिटीशांच्या काळात एखादा कायदा लोकविरोधी असेल तर त्याची होळी केली जायची. त्या भावनेला स्वातंत्र्यलढ्याचे वलय होते. पण आजकालच्या आंदोलनात गवत भरुन





तयार केलेले नेत्यांचे पुतळे जाळण्याचे जणू काही पेवच फुटले आहे. ह्यापुढे जाऊन अनेक जागी तर प्रतिकात्मक प्रेतयात्रा सुध्दा काढल्या जातात. खरच गर्दीच मानसशास्त्र इतकं कस बदलत आहे. त्यामधून मग पुढे हिंसाचार, जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान वाढीला लागले आहे. मग एकछत्री अंमल असलेल्या राज्यांमध्ये आंदोलन मोडून काढण्यासाठी बुलडोजरचा वापर सुरु झाला आहे. आंदोलनकर्त्यांच्या घराची व्यवसायाची राखरांगोळी होतानाची दृष्ये मग आपण सगळ्या चॅनलवर बघत असतो. कुणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात. पण न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी असल्याने न्याय मिळण्याची शक्यता मात्र धुसर होत चालली आहे. 'बळी तो कानपिळी'या प्रवृत्तीमुळे हकनाक गरीब साध्या नागरीकांचे जीवन उध्वस्त केले जात आहे. आपल्या नेत्यांना तर इतिहासाचे दाखले देण्याचे व्यसन लागले आहेत. पण पुरेसा अभ्यास नसतांना केलेली विधाने अंगलट येण्याचे प्रकारही सर्रास घडू लागले आहे. नव्या नवलाईचे नऊ दिवस सध्या राज्यात बघायला मिळत आहेत.

नुकतीच आषाढी एकादशी संपन्न झाली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी देवा पांडुरंगाला साकडे घातले. 'राज्य सुजलाम सुफलाम होऊ दे' केवढा मोठा विचार. गोरगरीबांचे कल्याण करण्याच्या निर्णयांचा आता महापूर येणार. आपण तयारीत राहिले पाहिजे. आता संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरु होईल. त्याअगोदर लोकसभा अध्यक्षांचा फतवा जाहीर झाला पाहिजे. आता संसदेच्या आवारात जमावबंदी लागू करण्यात आली आहे. लोकसभेत जाणारा प्रत्येक खासदार हा किमान ५ ते ७ लाख नागरीकांचा प्रतिनिधी असतो. त्यांच्यावतीने त्याचा देशाच्या सर्वोच्च सभागृहात सहभाग असतो. त्याच्यावरही आता आंदोलनबंदी, घोषणाबंदी लागू करण्यात आली आहे. इतक्या प्रचंड वेगाने जर व्यक्ती स्वातंत्र्य आक्रसलं जाऊ लागलं तर भविष्य किती अंध:कारमय आहे ह्याची कल्पना येते. हे सगळं होत असतांना सत्ताधारी ज्यांच्यापाशी मोठ्या बहुमताचे पाठबळ आहे ते मात्र हाताची घडी तोंडावर बोट ठेवून गप्प बसले आहेत. त्यांचा काही बोलण्याचा अधिकार शिल्लक राहीलेला नाही आणि हा बंदीवास त्यांनी राजीखुशीने स्विकारला आहे. मग उरलेले विरोधक तरी एकजुटीने सामना करतील का ? त्या सर्वांनी एकत्र येऊन कृतीशिल होण्याची गरज आहे. सत्तेचे संपुर्ण केंद्रीकरण झाल्यावर लोकशाहीच्या मूळ संकल्पनेलाच घाव घातला जात आहे. सामान्य जनतेलाआभासी जगतात सातत्याने ठेऊन भ्रम निर्माण करण्याची मोठी मोहीमच हाती घेतल्याचं लक्षात येतं. 'नाद करायचा नाही' असं एका नाटकाचं शिर्षक होतं. नाद कशाचा करायचा नाही ? विचार स्वातंत्र्याचा, अभिव्यक्तीचा, जुलुमशाही विरोधी लढण्याचा.



एकेकाळी स्वराज्याच्या निर्मितीसाठी 'आराम हराम है' असा नारा होता. आता रंजलेल्या गांजलेल्या जनतेने कोणता नारा द्यायचा ? अस म्हटलं जातं की माणसांच्या तीन मुलभूत गरजा असतात अन्न, वस्त्र, निवारा. आपल्या देशातील नागरीकांचे खरचं हे प्राधान्य आहे का ? बर, घटकाभर समजू हा नियम आपल्यालाही लागू आहे. पण त्यानंतर काय हवं असतं. तर सिनेमा, राजकारण आणि क्रिकेट. एका देशप्रेमी हिरो निर्मात्याने तर 'रोटी कपडा और मकान' ह्या नावाने सिनेमाच काढला तो प्रचंड लोकप्रियही झाला.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात पंडित नेहरूंच्या विचार सरणीचा जनमानसावर अमल होता. मग बॉलीवूडने तशा प्रकारचे सिनेमा काढायला सुरुवात केली. 'नया दौर'हे त्या काळचे अपत्य. माणसाच्या मेहनतीचं मोल सांगणारं अखेर यंत्रावर सुध्दा विजय मिळवता येतो हा संदेश देणार. पुढाऱ्यांइतकीच सिनेकलाकारांना प्रसिध्दी मिळायची पुढे राजकारण बदलत गेलं. तसेच सिनेमेही बदलत गेले. तरुणाईला साद घालणारे गोरे गोरे पान, फुलासारखे छान सारखे नट नट्या अवतरल्या. पुढे जमाना आला तो ॲन्टी हिरोचा म्हणजे दबलेल्या जनतेचा हुंकार आणि सिनेमा पोहचला दिलीपकुमार पासून अमिताभ बच्चन पर्यंत. तो ही काळ मागे पडला. मग चाणाक्ष राजकारण्यांनी पुलवामा सारखा युध्द सदृष्य गोष्टींवर देशप्रेमाचे सिनेमे तयार केले. अशा सिनेमांवर प्रेक्षकांच्या उड्या पडल्या. ह्या काळात दृकश्राव्य कलेला जी प्राथमिक कसदार साहित्याची बैठक लागते तीच कुठेतरी अडगळीत पडली. मग दिल्लीत झालेल्या 'हिनाबाग' किंवा 'किसान आंदोलनाला' रुपेरी पडद्यावर जागा मिळाली नाही. प्रवाहाच्या विरुध्द जाऊन जाती पातीचे तेढ अजुनही कशी मुळं धरुन आहे यावर कादंबरी लिहिणाऱ्या एका तामिळी लेखकाला बहिष्कृत करण्यात आलं त्याची कादंबरी बाद करण्यात आली. अखेरीला त्यानं आपल्या मधला लेखक मेला आहे असं जाहीर केलं. प्रख्यात निर्माते दिग्दर्शक व्ही शांताराम यांचा अतिशय गाजलेला चित्रपट'दो आँखे बारह हात' सहा कैदी आणि एक जेलर. जेलर एक नवा प्रयोग करतोय. गुन्हेगारी प्रवृत्तीवर मात करुन एका नव्या सकारात्मक जगण्याची उर्मी निर्माण करण्याचा. तुरुंगात दिवसभर खडी फोडल्यानंतर

**नवी दिल्लीच्या सीमेवर तीन कृषी बिले मागे घेण्यासाठी झालेले शेतकरी आंदोलन**



रात्री ते पळून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या पायात सदैव बेड्या घातल्या जायच्या. पण जेव्हा जेलरने त्यांना बेड्यातून मुक्त केले तर त्यांना झोप येईना.

अखेरीला ते कैदी स्वतः पायात बेड्या घालून घेतात. तेव्हा कुठे त्यांना झोप मिळते. आज आपली अवस्था खरच त्या कैद्यासारखी झाली आहे. आपल्याला जोखडाखाली जगण्याची इतकी सवय लागली आहे की, ते नैसर्गिकच वाटू लागले आहे. त्यामुळे बंधमुक्त होण्याचा विचार डोक्यात येण्याची शक्यता मावळून गेली आहे. जी काही थोडी माणसं या बंधनातून मुक्त होऊ शकतात त्यांना समाज वेड्यात काढायला सरसावलेला असतो. त्यामुळे सत्ताधाऱ्यांचे 'गुण गाईन आवडी' प्रमाणे सांस्कृतिक भवताल निर्माण होतो. सगळा इतिहास नव्याने सोईस्कर पध्दतीने लिहिण्याची नियोजनबध्द कारवाई आता सुरु झालेली आहे. औरंगाबादचे नामांतर करतांना सत्ताधारी नेत्याने म्हटले आहे गुलामगिरीच्या खुणा पुसुन टाकायच्या आहेत. समाजातील अनेक लोक ह्या गोष्टींना पाठींबा देण्यासाठी उत्साहात पुढे येण्याचे चित्र दिसू लागले आहे. प्रवाहाविरुध्द पोहण्यासाठी कणखर व्यक्तीमत्त्वाचे बुलंद लोक हवे असतात. पण नष्ट होत जाणाऱ्या काही वनस्पती सारखे हे एक्सटिन्ट होत चाललेत. ह्या आवर्तनात आपण कुठपर्यंत जाणार आहोत. १५० वर्षाची ब्रिटीश राजवट असताना त्यांना अनुकूल असलेला समाज अस्तित्वात होताच ना ? अखेरीला काय आपल्याला कुणीतरी 'गुलाम' करायला हवे अशी मानसिकता रुजली आहे. समाज असा वरुन खुप शांत भासत असला तरी ह्या अस्वस्थतेत एक ज्वालामुखी कुठेतरी खोल रुतून बसलेला असल्याची शक्यताही आहे. केव्हातरी त्याचा मोठा उद्रेक होईल आणि एक नवीन स्वातंत्र्याचं आकाश अवतरेल त्याची वाट पहायला हवी. अवघ्या जगात सध्या हवामान बदलामुळे नष्ट होत जाणाऱ्या निसर्गाबद्दल आपण चिंताग्रस्त असतांना सांस्कृतिक पर्यावरणाची, अविष्कार स्वातंत्र्याची फिकीर का कुणी कशासाठी करायची ? आपलं जगणं, आपलं असणंचआता एका मोठ्या प्रश्नचिन्हासारखे सामोरे आल्यावर हतबलता घालवण्यासाठी पाऊलं टाकायला हवीत हे मात्र खरे. बऱ्याचशा भरकटलेल्या मानसिक अवस्थेत हे सर्व माझ्याकडून लिहीले गेले. त्यात सुसुत्रता नसेल. अनेक वेळा ते असंबध्द सुध्दा वाटेल. पण शब्दांद्वारे व्यक्त झाल्यावर मी एका तणावमुक्त मानसिकतेचा अनुभव घेत आहे. माझ्या आयुष्यातल्या काही चांगल्या क्षणांची सोबत रहावी म्हणून न थकता पुढेही काही लिहीता येईल ही उमेद बाळगून थांबतो.

■■




केंद्र सरकारच्या नागरिकत्व कायद्यातील दुरूस्तीला विरोध करण्यासाठी देशभर सर्वत्र मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली.




# राज्यसभेचे भावी सभापति

भाजप आघाडी पुरस्कृत उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार जगदीप धनखड यांचा विजय हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट व स्वच्छ वास्तव!

हे धनखड आहेत कोण? त्यांची राजकीय पार्श्वभूमि काय? त्यांना विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी निवडलेले असल्याने हे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. धनखड हे राजस्थानचे आहेत. ते जाट आहेत. वकिलीचा व्यवसाय ते करीत होते.

भाजपच्या सध्याच्या रचनेत जाट समाजाला फारसे महत्व दिले गेलेले नाही. हरयानासारख्या जाट वर्चस्व असलेल्या राज्यात देखील या समाजाला मुख्यमंत्रीपद नाकारण्यात आले.

तीन वादग्रस्त कृषि कायद्यांच्या मुद्यावरुन झालेल्या शेतकरी आंदोलनाचे नेतृत्व या समाजाने केले. त्यांच्या आंदोलनापुढे ब्रह्मांडनायकांना झुकावे लागले होते आणि कायदे मागे घ्यायला लागले होते. पण त्यांना या समाजाच्या एकजुटीचे महत्व बहुधा कळलेले असावे. पश्चिम उत्तर प्रदेश, राजस्थानातील काही जिल्हे आणि हरयाना व पंजाब ही याठिकाणी या समाजाचे वर्चस्व आहे.

बहुधा ते लक्षात घेऊन धनखड यांची निवड करण्यात आल्याचे मानले जाते. पण त्याहीपेक्षा त्यांचा एक मोठा गुण आहे. 'पडत्या फळाची आज्ञा' किंवा आपल्या नेत्याला पाहिजे ते अत्यंत कोडगेपणाने अमलात आणण्याचा त्यांचा गुण ब्रह्मांडनायकांना चांगलाच आवडला. त्यांना असे 'आज्ञाधारक' अवतीभवती लागतातच! त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्याला इतरही समानार्थी विशेषणे लावणे शक्य आहे. पण तो मोह टाळलेला बरा!



धनखड हे पश्चिम बंगालचे राज्यपाल होते. कोणताही विधिनिषेध न पाळता आणि अत्यंत कोडगेपणाने त्यांनी तेथे कारभार केला. कारभार म्हणजे काय? तर, ममता बॅनर्जी सरकारला छळून काढणे! ते काम त्यांनी केंद्राच्या सांगण्यानुसार ईमानइतबारे पार पाडले. त्याचे बक्षीस त्यांना मिळाले.

आपल्या नेत्याची आज्ञा बिनबोभाट अमलात आणणे आणि त्यासाठी कोणत्याही बऱ्यावाईट, उचित-अनुचित मार्गाचा अवलंब करणे एवढेच त्यांना कळते. त्यामुळे राज्यसभेचे संचालन करताना त्यांची कामकाजपध्दती कशी असू शकेल याचे उत्तर येणारा काळच देईल.

कानोकानी आलेल्या माहितीनुसार मावळते उपराष्ट्रपति वेंकय्या नायडू यांनी राज्यसभेचे संचालन त्यांना मिळणाऱ्या आदेशानुसार केले असले तरी विरोधी पक्षांना पाहिजे त्या पध्दतीने वठणीवर आणणे किंवा त्यांना धडा शिकविण्याचे उद्दिष्ट त्यांना पार पाडता आले नव्हते. त्यांनी विरोधी पक्षांबाबत काहीसा मवाळपणा दाखविला अशी त्यांच्याबद्दल सर्वोच्च नेतृत्वाची नाराजी होती व त्यामुळेच त्यांना बढती दूरच पण मुदतवाढही न देता बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला.

आणखी एक महत्वाची बाब म्हणजे एकेकाळी ते लालकृष्ण अडवानी गटाचे मानले जात. त्यांच्या बहिर्गमनाने अडवानी गटाचे उरलेसुरले अवशेषही ब्रह्मांडनायकांनी पुसून टाकले आहेत.

१९८८-८९ यावेळी राजीव गांधी यांच्या विरोधातील आणि विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या लाटेत धनखड हे लोकसभेवर निवडून आले. नथुराम मिर्धा हे राजस्थानातील जाट समाजाचे अनभिषिक्त नेते होते. त्यांच्या बरोबरीने ते आले पण प्रत्यक्षात ते हरयानाचे जाट नेते देवीलाल यांच्या मागेमागे करीत



असत. कुणीही पत्रकार त्यांना फारसे गांभीर्याने घेत नसत. निव्वळ कोहीतरी विनोद करुन हसत राहण्याचा प्रकार ते करीत असत.

यानंतर ते राजकीय वनवासातच राहिले आणि मग त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करुन आपल्या राजकीय जीवनाला फेरप्रारंभ केला. स्वामीनिष्ठेमुळे त्यांना पदे मिळत गेली आणि अचानक पश्चिम बंगालचे राज्यपालपद त्यांना देण्यात आले आणि मग त्यांनी स्वामीनिष्ठेचे असे असे काही प्रदर्शन

केले की ब्रह्मांडनायकांना त्यांची दखल घ्यावीच लागली. स्वामीनिष्ठेने त्यांना उपराष्ट्रपतिपदापर्यंत पोहोचवले आहे.

आता तर त्यांना स्वर्ग दोन बोटे उरलेला असेल!

## प्रादेशिक अस्मिता कुठे गेली?

राष्ट्रपतींची निवडणूक नुकतीच पार पडली.

निवडणुकीचा निकाल जो अपेक्षित होता तोच लागला. भाजप पुरस्कृत उमेदवार द्रौपदी मुर्मु या निवडून आल्या. त्या देशाच्या पहिल्या आदिवासी व दुसऱ्या महिला राष्ट्रपति आहेत. विरोधी पक्षांचे संयुक्त उमेदवार यशवंत सिन्हा होते. ते भाजपचे माजी नेते, माजी केंद्रीय अर्थ तसेच परराष्ट्रमंत्री होते. विरोधी पक्षांमधील विखुरलेपण, विस्कळितपणा आणि समन्वय व एकजुटीचा अभाव त्यांच्या पराभवाला कारणीभूत ठरला.

यशवंत सिन्हा हे मूळचे बिहारचे पण बिहारच्या विभाजनानंतर झारखंडमधील हजारीबाग मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत असत. त्यामुळे प्रादेशिक अस्मितेच्या मुद्यावर किमान या दोन राज्यांमधून तरी त्यांना भाजपच्या मित्रपक्षांकडून मते मिळणे अपेक्षित होते.

प्रत्यक्षात तसे घडले नाही.

प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवली होती त्यावेळी शिवसेनेने भाजपपेक्षा वेगळी भूमिका घेऊन 'महाराष्ट्र-कन्या' प्रतिभाताईंना पाठिंबा दिला होता. एवढेच काय पण त्यानंतर





काँग्रेसचे प्रणव मुखर्जी यांनाही असाच पाठिंबा दिला होता. ते धैर्य शिवसेनेने दाखवले होते. आताच्या निवडणुकीत देखील द्रौपदी मुर्मु यांना ओडीशातील सत्तारूढ बिजु जनता दलाने पाठिंबा दिला कारण त्या ओडीशाच्या कन्या आहेत.

झारखंडमधील सत्तारूढ झारखंड मुक्ति मोर्च्याने देखील मुर्मु या आदिवासी असल्याने त्यांना अनुकूल भूमिका घेतली. याच न्यायाने सिन्हा यांनी बिहारमधील आमदार त्यांना 'बिहार-पुत्र' म्हणून मतदान करतील अशी अपेक्षा बाळगली होती.

भाजपचे आमदार सोडा पण किमान संयुक्त जनता दलाचे आमदार आणि मुख्यमंत्री नीतीशकुमार तरी त्यांना पाठिंबा देतील, मदत करतील अशी त्यांची रास्त अपेक्षा होती. पण ती फोल ठरली.

निवडणुकीनंतर सिन्हा यांनी त्यांच्या व्यथेला वाट करुन दिली.

'मी नीतीशकुमार यांना अनेक फोन केले पण त्यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. मग मी त्यांना निरोप पाठवून भेटण्याची इच्छा व्यक्त करुन वेळ मागितली. पण त्यालाही त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही किंवा उत्तरही दिले नाही. कदाचित त्यांच्या दृष्टीने मी त्यांच्या तोलामोलाचा नसावा आणि फारच लहान माणूस असावा' अशा शब्दात सिन्हा यांनी व्यथा व्यक्त केली. सिन्हा हे बोचऱ्या टिप्पण्या करण्यात पटाईत आहेत. त्यांची जीभ तिखट आहे.

ते पुढे म्हणाले, 'बहुधा नीतीशकुमार आता कुणा अन्य व्यक्तीचे ऐकत असावेत.(मोदींकडे रोख). बिहारबद्दल त्यांच्या मनात खरोखरच चिंता असती तर त्यांनी मला पाठिंबा दिला असता. आता त्यांना बिहार समजेनासा झाला असावा अन्यथा त्यांनी बिहारच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे महत्व जाणले असते. त्यांनी ओडीशाच्या मुख्यमंत्र्यांकडून काही शिकण्याची गरज आहे. मुर्मु या ओडीशाच्या असल्याने तेथील मुख्यमंत्र्यांनी त्यांना पाठिंबा दिला.'

सिन्हा यांनी त्यांची मनोवेदना जाहीरपणे व्यक्त केली आहे.

ती प्रामाणिक आहे पण तो सात्विक संताप आहे.

वर्तमान राजवटीची सूडबुध्दीची मनोवृत्ती आणि लोकशाही संकेत



व संस्कृती न जुमानण्याची प्रवृत्ती व संख्याबळाचे व्यस्त गणित हे वास्तव आहे. सिन्हा यांनाही त्याची जाणीव आहे. परंतु त्यांना त्यांची व्यथा व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळेच आणीबाणीविरोधातील जयप्रकाश आंदोलनाचा वारसा मिरविणाऱ्या नीतीशकुमार यांच्यासारख्या भ्याड नेत्यांचा खरा चेहराही उघडकीस येतो. म्हणूनच वर शिवसेनेचे उदाहरण दिले!

## शाकाहाराचा विजय असो!

राष्ट्रपति निवडणुकीचा विषय निघालाच आहे तर जाताजाता आणखी एक विषय! द्रौपदी मुर्मु या राष्ट्रपति झाल्या आहेत. त्या राष्ट्रपति भवनात राहूही लागल्या आहेत. साहजिकच नवीन राष्ट्रपति आल्यानंतर त्यांच्या आवडीनिवडी, सवयी यांचा प्रभाव राष्ट्रपति भवनावर पडणे स्वाभाविक असते. द्रौपदी मुर्मु या पूर्ण शाकाहारी असल्याने त्यांनी राष्ट्रपति भवनाच्या बल्लवाचार्यांना शाकाहारी पदार्थच कटाक्षाने तयार करण्याचा आदेश दिला आहे. किंबहुना त्यांच्या काळात राष्ट्रपति भवनात शाकाहारी पदार्थच भोजनात सादर केले जातील असे





सांगण्यात येते.

मुर्मु या एकेकाळी मांसाहारी होत्या. परंतु कालांतराने त्यांनी ब्रह्मकुमारी प्रजापिता संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर त्या पूर्णपणे शाकाहारी झाल्या. त्यामुळेच आता त्यांच्या कारकिर्दीत राष्ट्रपतिपद पूर्णपणे शाकाहारी होणे अपेक्षित आहे.

राष्ट्रपति किंवा कुणीही अतिविशिष्ट व्यक्ती शाकाहारी असणे यात आश्चर्यकारक काही नाही.

शंकर दयाळ शर्मा किंवा एपीजे अब्दुल कलाम यांच्यासारख्या राष्ट्रपतींचाही शाकाहारावरच भर असे.

यामध्ये प्रश्न एवढाच निर्माण होईल की परदेशी पाहुणे म्हणजेच बाहेरच्या देशांचे राष्ट्रप्रमुख भारतभेटीवर आल्यास त्यांना कोणते पदार्थ सादर केले जातील? शाकाहारी की मांसाहारी?

मनमोहनसिंग यांनी मांसाहार सोडल्यानंतर ते अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असता व्हाईटहाऊस या अमेरिकी राष्ट्राध्यक्ष निवासातील शाही मेजवानीत त्यांच्यासाठी खास शाकाहारी पदार्थ सादर करण्यात आले होते. अर्थात अन्य सामिष आहारी मंडळींसाठी मांसाहारी पदार्थ उपलब्ध होते. त्यामुळे द्रौपदी मुर्मु यांनी शाकाहारावर भर देण्याचे ठरवले असले तरी बाहेरच्या देशातील राष्ट्रप्रमुखांसाठी त्यांना शाही-भोजन आयोजित करावे लागल्यास त्यामध्ये त्यांना दोन्ही प्रकारचे पदार्थ उपलब्ध करुन द्यावे लागतील.

कारण 'अतिथि देवो भव' हा भारतीय संस्कृतीचा महत्वाचा पैलू आहे. भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपति होण्याचा मान महाराष्ट्राच्या प्रतिभाताई पाटील यांना मिळाला होता.

त्यांनी त्यांच्या काळात राष्ट्रपति भवनात साबुदाण्याची खिचडी आणि साबुदाण्याचे वडे पाहुण्यांना देण्याचा प्रयोग केला होता. त्याची वाहवाही झाली होती. त्यामुळेच आता द्वितीय महिला राष्ट्रपति कोणते नवे भोजन-प्रयोग करतात याची सर्वांनाच प्रतीक्षा आहे.

## श्रेयाची स्पर्धा?

'यशाचे पालकत्व अनेकजण घेतात पण अपयश अनाथ असते' अशी म्हण प्रचलित आहे. तसेच एखाद्या चांगल्या घटनेचे श्रेय घेणारे अनेक असतात आणि त्यांच्यात त्याबाबत स्पर्धाही असते. भारताच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपति होण्याचा मान द्रौपदी मुर्मु यांना प्राप्त झाला.

भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने ही एक ऐतिहासिक बाब मानली जाते.

याचे श्रेय कुणाला?

राष्ट्रपतिपदाची निवडणूक झाल्यानंतर ही स्पर्धा सुरु होणे स्वाभाविक होते.

भाजप आणि सरकारमधील द्वितीय क्रमांकाचे नेते, द्वितीय पोलादी पुरुष आणि प्रति सरदार वल्लभभाई पटेल उर्फ वर्तमान गृहमंत्री अमित भाई शहा यांनी ओडीशामधील एका नामांकित व मोठ्या खपाच्या उडिया दैनिकात उडिया भाषेत(अर्थातच भाषांतरित) लेख लिहिला. या लेखामध्ये त्यांनी मुर्मु यांची उमेदवारी व विजयाचे श्रेय भाजपकडे घेताना नरेंद्र मोदी सरकार अदिवासी कल्याण आणि उत्थानासाठी कसे बांधील आहे याचा हा पुरावा असल्याचे म्हटले होते. मुर्मु या ओडीशाच्या आहेत आणि त्यांना सत्तारूढ बिजु जनता दलाने पाठिंबा दिला होता. पक्षप्रमुख



व मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी राज्यातील सर्व पक्षांना मुर्मु यांना मतदान करण्याचे स्वतः आवाहन केले होते. ओडीशातील काँग्रेस आमदारांना व नेत्यांनाही देखील त्यांनी व्यक्तिशः फोन केले होते.

आता, नवीनबाबूंना अमित शहांचा हा श्रेयाचा दावा कसा सहन होणार?

अमित शहांच्या लेखा पाठोपाठ त्यांनीही त्याच दैनिकात आणि शहांचा लेख ज्या संपादकीय पानावर छापण्यात आला होता त्याच जागी स्वतःचा लेख छापवून आणाला. या लेखात त्यांनीही ते व त्यांचा पक्ष आदिवासी कल्याणासाठी कसा बांधील आहे याचे दाखले दिले.

सन २००० मध्ये ते प्रथम मुख्यमंत्री झाले तेव्हापासून त्यांनी आदिवासी व महिला कल्याणासाठी किती प्रयत्न केले. याची माहिती देतानाच २०१२ मध्ये विरोधी पक्षांतर्फे उभे करण्यात आलेले राष्ट्रपतिपदाचे उमेदवार पी.ए.संगमा यांना देखील त्यांनी पाठिंबा दिला होता याची आठवणही दिली. मनमोहनसिंग यांच्या काळात संगमा हे राष्ट्रपतिपदासाठी भाजप आघाडी पुरस्कृत उमेदवार होते व ते हरले होते.



भाजपला ओडीशामध्ये मुसंडी मारण्याची इच्छा आहे. परंतु नवीन बाबू यांची जनतेवर अशी काही मोहिनी पडलेली आहे की गेली २२ वर्षे ते मुख्यमंत्रीपदावर टिकून आहेत.

त्यामुळेच अमित शहांसारखे नेते तेथल्या प्रादेशिक दैनिकात लेख लिहिण्याचे कष्ट करीत असावेत!



## करोना-कोविदचा सोयीस्कर बहाणा??

करोना किंवा कोविदचा आजार हा अतिसंसर्गजन्य श्रेणीत समाविष्ट आहे. त्यामुळेच ज्या कुणाला हा आजार होतो त्या माणसांना एकांतवासात जावे लागते. राजकारणी मंडळींना व




विशेषतः मंत्री वगैरे असलेल्यांना तर ही एक पर्वणीच मिळाली आहे.

कुणाला चुकवायचे असेल आणि विशेषतः लोकांपासून दूर पळायचे असेल तर त्यासाठी करोनाची लागण झाल्याचा एक अत्यंत चांगला आणि अत्यंत सोयीस्कर असा उपाय त्यांना सापडला आहे.

'साहेबांना करोना झाला आहे' असे सांगितल्यावर लोकं आपोआपच भेटायला येण्याचे थांबवतात. ही ट्रिक अनेक नेतेमंडळी वापरु लागली आहेत.

बिहारच्या नीतीशकुमारांचेच उदाहरण घ्या. सध्या ते करोनामुळे ग्रस्त झाल्याने त्यांनी स्वतःला एकांतवास दिला आहे. कुणालाही त्यांना भेटण्याची परवानगी नाही.

करोना कुणालाही होऊ शकतो. तो वादाचा किंवा शंकेचा मुद्दा नाही. पण नीतीशकुमार यांना झालेल्या करोनाच्या लागणीच्या 'वेळ' किंवा 'टायमिंग' बद्दल शंका व्यक्त केली जात आहे.

नीतीशकुमार यांनी पत्रकारांना त्यांचे जनता दरबार आणि इतर कार्यक्रमांपासून दूर ठेवण्याचे आदेश दिल्यानंतर माध्यमांचे कुतुहल चाळवले.

अनेक पत्रकारांनी मग या गोष्टीचा माग काढण्यास सुरुवात केली.

त्यात असे आढळून आले की नीतीशकुमार यांनी त्यांच्या मुलाचा वाढदिवस साजरा केला होता. त्यासाठी त्यांनी त्यांचे नातेवाईक, कुटुंबिय आणि त्यांच्या विश्वासू वर्तुळातील निकटवर्तीयांनाच फक्त आमंत्रित केले होते. त्यानंतर एक-दोन दिवसातच त्यांना करोनाची लागण झाल्याचे निदर्शनास आले आणि त्यांनी स्वतःला दरवाजा-बंद करुन घेतले.

यामुळे त्यांच्या सरकारमध्ये सहभागी भाजपमध्ये काहीशी अस्वस्थता निर्माण झाली.

भाजपतर्फे बिहारची राजधानी पाटणा येथे त्यांच्या पक्षाच्या सर्व आघाड्या व शाखा(महिला मोर्चा, युवा मोर्चा वगैरे) यांचे संयुक्त संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनास द्वितीय पोलादी पुरुष उर्फ केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा, भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा आणि भाजपची वरिष्ठ नेतेमंडळी हजर राहणार आहेत.

बिहारमध्ये नीतीशकुमार यांचे सरकार फक्त आणि फक्त भाजपच्या पाठिंब्यावर चालले आहे कारण नीतीशकुमार यांच्या पक्षाला भाजपपेक्षा कमी जागा आहेत. त्यामुळे भाजपचे वरिष्ठ नेते पाटण्यामध्ये येणार असतील तर त्यांच्यासमोर नीतीशकुमार यांनी हजर राहून त्याना कुर्निसात करण्याची भाजपची अपेक्षा आहे. पण आता तर त्यांना करोना झालेला आहे. त्यामुळेच नीतीशकुमार यांच्या करोनाच्या टायमिंगमुळे भाजपची बिहारमधील मंडळी साशंक आणि अस्वस्थ झाली आहेत.

गेल्या काही दिवसांपासून नीतीशकुमार व भाजपमधील संबंध फारसे मधुर राहिले नसल्याची बाब सर्वश्रुतच आहे. त्यातच या प्रसंगामुळे भर पडणार हे निश्चित!




# भाजपमध्ये नंबर २ कोण?

कर्नाटकात मंगलोर हे ठिकाण कट्टर हिंदुत्ववादी संघटना आणि त्यांच्या विरोधातील संघटना यांच्यातील सततच्या संघर्षामुळे नेहमीच चर्चेत असते. ताज्या घटनांमध्ये भाजपशी निगडित तिघांची झालेली हत्या आणि त्याच्या उत्तरादाखल एका अल्पसंख्यक युवकाची झालेली हत्या यामुळे हे शहर तंग आहे. हे प्रकरण एवढे पेटलेले आहे की भाजपच्या तीन कार्यकर्त्यांची हत्या होऊन आणि राज्यात भाजपचे सरकार असूनही अपराध्यांना पकडण्यात यश न आल्याने संतप्त भाजप युवक मोर्च्याच्या पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामेही दिले. भाजपसारख्या शिस्तबध्द पक्षात असा प्रकार क्वचितच होतो.

परंतु हे प्रकरण आपल्यावर शेकते आहे असे पाहिल्यानंतर मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी अपराध्यांना सोडून कडक कारवाई होईल अशी घोषणा केली. ही घोषणा करताना त्यांनी एक महत्वाचे वाक्य उच्चारले. ते म्हणाले, 'उत्तर प्रदेशातील योगी मॉडेल योग्य असून त्याचप्रकारे किंवा त्याहून अधिक कठोर मॉडेल कर्नाटकात अमलात आणले जाईल'!

उत्तर प्रदेशातील 'योगी मॉडेल' काय आहे? याला 'बुलडोझर सरकार' असेही म्हटले जाते.

म्हणजे उत्तर प्रदेशात केवळ मुस्लिम अपराध्यांना लक्ष्य करण्यात येऊन त्यांच्या मालमत्ता बुलडोझरने जमीनदोस्त करणे, कुठे दंगा झाल्यास त्यामध्ये दंग्याशी संबंधित फक्त मुस्लिमांनाच पकडणे आणि त्यांच्यावर कारवाई करुन तुरुंगात खितपत टाकणे असे प्रकार सर्रासपणे केले जात आहेत. यामध्ये कोणताही विधिनिषेध बाळगला जात नाही.

उत्तर प्रदेशच्या या एकतर्फी कारवायांची दखल घेऊन सुप्रीम कोर्टाने देखील विनाचौकशी आणि कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता राज्य सरकारतर्फे मालमत्ता पाडणे किंवा विनाचौकशी तुरुंगात डांबणे असे प्रकार अनुचित आहेत, कायद्यानुसार नाहीत असे उत्तर प्रदेशाला खबरदार केले होते.

आता बोम्मई यांनी त्या मॉडेलचे अनुकरण करण्याची घोषणा केल्यानंतर कर्नाटकात काय होणार हा एक प्रश्नच आहे. परंतु खुद्द भाजपमध्ये त्यांच्या या घोषणेवरुन अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



कारण???

भाजपमध्ये केवळ दोनच नेते अनुकरण-पात्र आहेत.

सर्वप्रथम विश्वप्रिय ब्रह्मांडनायक आणि दुसरे द्वितीय पोलादी पुरुष उर्फ केंद्रीय गृहमंत्री!

ब्रह्मांडनायकांचे वारसदार म्हणून द्वितीय पोलादी पुरुषांचे नावे घेतले जाते. अशीही चर्चा कानावर येते की या वारश्याच्या लढाईत 'द्विपोपु'(द्वितीय पोलादी पुरुष) आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगीमहाराज आदित्यनाथ यांच्यात स्पर्धा लागलेली आहे. ब्रह्मांडनायकांनंतर हिंदुत्वाचा कट्टर चेहरा, रक्षणकर्ता, हितकर्ता म्हणून योगीमहाराजांनी स्वतःला 'प्रोजेक्ट' केले आहे. मुस्लिमांना लक्ष्य करणारे त्यांचे 'बुलडोझर धोरण' हा त्याचाच भाग आहे.

थोडक्यात भाजपमध्ये वारश्याची ही सुप्त व अंतःस्थ लढाई सुरु आहे. त्यामुळेच एका राज्याचा मुख्यमंत्री योगीमहाराजांचा आदर्श घेण्याची भाषा करीत असेल तर ते सर्वोच्च जोडगोळीला कितपत रुचणार आहे हे येणारा काळच सांगेल. तोपर्यंत वाट पाहू!

# शेवटचे पान



# पराभव आणि निष्ठा



लहान मुलांसाठी चित्रमय कथा असलेला 'चांदोबा' हे मासिक खूप लोकप्रिय आहे. अनेक भाषांमधून हे अत्यंत देखणे आकर्षक मासिक छापले जाते. मासिकाचा खप एवढा प्रचंड आहे की, आता चेन्नईमधल्या या मासिकाच्या मालकांनी ते इंटरनेटवर प्रसिद्ध केल्यामुळे 'ई-बुक' म्हणून मोफतसुद्धा वाचता येते. एक अंक चाळावा म्हणून मी उघडला आणि त्याच्यात अतिशय लोकप्रिय 'विक्रम आणि वेताळ' ची कथा मला खूप भावली तीच कथा मी आज तुम्हाला सांगणार आहे.

आटपाट नगर होतं. तिथे एक अतिशय लोकप्रिय महाराज'विक्रम' सम्राट पदी होते व त्यांचा कारभार लोकांना खूप आवडायचा. दर आठवड्याला बहुतेक बुधवारी ते आपल्या राजदरबारात सहकारी मनसबदार सरदारांबरोबर बैठक घ्यायचे. यामध्ये आपल्या राज्यात वेगवेगळ्या प्रश्नांबद्दल चर्चा व्हायची आणि खूप महत्वाचे लोकपयोगी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जायची. महाराजांचा आपल्या सरदारांवर खूप विश्वास होता. त्यामुळे त्यांनी आपल्यावरील बऱ्याच जबाबदाऱ्या सहकाऱ्यांना वाटून दिल्या होत्या. महाराजांच्या हे कधीच लक्षात आले नाही. त्यांचा अत्यंत जवळचा व लाडका सहकारी सम्राट पदाची आकांक्षा बाळगतो आहे आणि त्यादृष्टीने गेल्या काही दिवसात त्याने जमवाजमव केली आहे, अशी गुप्तवार्ता महाराजांपर्यंत पोहचली होती. महाराज भोळेभाबडे असल्यामुळे आपले कोणीही सहकारी दगा देणार नाही याबद्दल त्यांना खात्री होती. म्हणून ते काहीसे निर्धास्तपणे आपला कारभार करत होते. राज्यावरच नव्हे तर सर्व जगावर महामारीचे संकट आले त्याकाळात महाराजांनी सामान्य माणसांना दिलासा दिला त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली.

दुर्दैवाने महाराज स्वत: आजारी पडले त्यामुळे दैनंदिन कारभारापासून दुरावले. याच संधीचा फायदा घेऊन त्या महत्वकांक्षी सरदाराने सिंहासन काबीज करण्याचा डाव रचला हे सर्व बघून महाराज विषंन्न झाले व त्यांनी अधिक विचार करण्यासाठी जंगलामध्ये सफर करण्याचे ठरविले. सर्व लवाजमा सोडून महाराज एकटेच पायी-पायी चालू लागले. फक्त महाराजांना माहीत असलेले एक गुपित होते ते म्हणजे जंगलाच्या वाटेवर पिंपळवृक्षावर एक वेताळ बसलेला असतो आणि महाराजांनी इशारा केल्यावर तो त्यांच्या पाठीवर बसतो. वेताळाला महाराजांची समस्या पूर्णपणे ठाऊक असते. त्यामुळे थोड पुढे गेल्यावर वेताळ महाराजांना प्रश्न विचारतो राजन अगदी जवळच्या सहकाऱ्याने दगा दिल्यामुळे तु दु:खी झाला आहे. कदाचित तुला सिंहासनावर हक्क सुद्धा सांगता येणार नाही. तु कितीही उदार अंत:करणाने सहकाऱ्यांना मोठे केले तरी ते कधीही पुन्हा फणा काढून तुला दंश करतील. परंतू अशा परिस्थितीत तु डगमगलास तर थोरल्या महाराजांनी एक कणखर राज्य निर्माण केले त्याच्यापासून तू दूर जाऊ नकोस. संकटे आली तरी हिमतीने सामना कर. जय पराजय होत असतात. पण स्वाभिमान आणि निष्ठा अजिबात सोडू नको.वेताळाचे म्हणणे विक्रमराजाने मनोमन स्वीकारले आणि त्याच्या पाठीवर शाब्बासकी दिली. खुश होऊन वेताळ परत आकाशात उडून पिंपळावर जाऊन बसला. आता विक्रम राजा पुढे प्रवासाला निघाला आहे.

ही प्राचीन गोष्ट आहे. सध्या आपल्याकडे असेच काहीसे कथानक सुरू असावे असे जर आपल्याला वाटले तर तो योगायोग नक्कीच नाही.

